

# श्री साईलीला

शिरडी संस्थानचें अधिकृत त्रैमासिक

या अंकांत—


- तमसो माऽज्योतिर्गमय
- सद्‌गुरूचा शोध
- आत्मानुभवाचें शास्त्र
- संतकवि श्री दासगणूमहाराज
- साईबाबांचा कर्मयोग
- विश्वरूपदर्शन
- आत्मानुसंधान
- रवीन्द्रनाथांचें सुवर्ण–गीत
- संपादकीय निवेदन
- बाबांची लीला, शिरडी–वृत्त वगैरे.
  आणि
- श्रीसाईनाथांच्या समाधि–मंदिरांतील मूर्तीचें अप्रतीम तिरंगी चित्र.



# श्री साईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत त्रैमासिक ]

वर्ष ३२ वें : अंक २ रा

वार्षिक वर्गणी रु. २-४-० (ट. ख. सह)

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९५६

★

स्वरूपाचें जें विस्मरण ।
तेंचि मायेचें अवतरण ।
शुद्ध पूर्णानंदस्मरण ।
तोचि मी चैतन्य घनरूप ॥
ॐ प्रणव हा माझा वाचक ।
वाच्य तयाचा मीच एक ।
विश्वाकार वस्तु अनेक ।
त्यांतही मी एक भरलेला ॥

—श्री साईचरित



संपादक—
नागेश आत्माराम सावंत

व्यवस्थापक—
रामचंद्र महादेव राणे

कार्यालय—
ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग,
४२।२५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १

# संपादकीय निवेदन

'श्रीसाईलीला' हें त्रैमासिक आहे. म्हणजे दर तीन महिन्यांनीं एकदां अंक निघतो. अंकाची पृष्ठसंख्याहि मर्यादित आहे. साधारण अठ्ठेचाळीस ते चौसष्ट. तेव्हां अंकांतलि विषयाचें स्वरूप व त्यांतील विविधता जास्तींत जास्त आकर्षक कशी करतां येईल याकडे आमचें सदैव लक्ष असतें. अनेक लेखकांकडून जो मजकूर येतो त्याची निवड करतांना लेखकाचा तद्विषयक अभ्यास, व्यासंग आणि भाषाशैली यांना साहजिकच महत्त्व दिलें जातें. 'नापसंत' लेख परत केल्यावर 'हा लेख का नापसंत केलात तें कृपा करून कळवा' अथवा 'आमचा लेख दुरुस्त करून कां छापीत नाहीं' अशा तऱ्हेचीं त्या लेखकांचीं पत्रें येतात. श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध होत असलेलें साहित्य सदरहू लेखक अभ्यासाच्या दृष्टीनें वाचतील तर त्यांना आपोआपच साईलीलेला कुठल्या प्रकारचें लेखन सहाय्य हवें आहे याची सहज कल्पना येऊं शकेल असें आम्हांला वाटतें. कविता फार येतात. त्यांत अनेक वृत्तदोष, भाषादोष असतात. श्रीसाईबाबांचें त्या कवितेंत नामस्मरण आहे, एवढ्यावरून तें 'काव्य' ठरत नाहीं! त्याच प्रमाणें—अनुभव. अनुभव देतांना अवास्तव पाल्हाळ फार असतो. श्रीसाईनाथांवर ज्यांची अलोट श्रद्धा आहे त्यांच्या दैनंदिन जीवनांत अनेक तर्कातीत घटना घडतात हें मान्य आहे. पण त्या अद्भुत-रम्य घटनांची पार्श्वभूमि शुद्ध हेतूंनीं प्रेरित झालेली असावी! आपल्या व्यक्तिगत दुःखांचा व संकटांचा परिहार करण्यासाठीं ज्यांनीं बाबांना आळविलें आणि करुणा भाकली त्यांच्या हांकेसरशीं बाबा धांवून आले असा अनुभव आल्यानंतर त्या भक्तांनीं बाबांवरची ही श्रद्धा अधिक व्यापक करायला नको का? व्यक्तिगत दुःखापेक्षां समष्टिगत दुःखांचा परिहार व्हावा म्हणून कधीं आम्हीं बाबांना हाक घातली आहे? गुजराथेंत धरणीकंपानें गांव उध्वस्त झाला, अति वृष्टीनें पंढरपूर क्षेत्राची मोडतोड झाली, हैद्राबादेजवळ भीषण रेल्वे अपघात घडला; या अघटित आपत्तींचें वर्णन वाचून आमचें मन व्यथित होतें. अशा-वेळीं एखाद्या भक्तसंघानें, तिथल्या जनतेची संकटांतून मुक्तता व्हावी म्हणून श्रीसाईनाथांना आळविलें, हाक घातली, नवस केला असें अनुभव—वृत्त कांहीं आम्हांला वाचायला मिळत नाहीं!

आधिभौतिक, अध्यात्मिक आणि आधिदैविक दुःखें निर्माण करणारी विश्वंभर शक्तीच त्या दुःखांचा एका अन्य मार्गानें आणि संकल्पानें परिहार करीत असते. दुःख आकाशाएवढें मोठें असतां मुंगीएवढा माणूस काय करूं शकणार, हें खरें आहे. पण परमेश्वरावरची अथवा श्री सद्गुरु-वरची श्रद्धा, कितीहि थोर दुःख असो तें सहन करण्याची अथवा त्या दुःखावर मात करण्याची बुद्धि, शक्ति आणि स्फूर्ति देते यांत तिळमात्र संशय नाहीं.

तेव्हां अनुभव पाठविणाऱ्या लेखकांनीं अनुभवाची ही एक महत्वाची बाजू आहे हें लक्षांत ठेवावें.

× × ×

यंदांच्या गुरुपौर्णिमेचा उत्सव फारच गाजला. दिवसेंदिवस अशा उत्सवांना होणारी वाढती गर्दी लक्षांत घेऊन भक्तांना कांहीं सूचना कराव्याशा वाटतात. भक्तांची राहण्याची आणि जेवण्याची व्यवस्था संस्थाननें जी केली आहे त्यांत कांहीं उणिवा आहेत याची आम्हांला जाणीव आहे. त्यांतल्या त्यांत दूरवरून मुद्दाम आलेल्या परस्थ भक्तांची जितकी सोय करतां येईल तितकी करण्याची संस्थान पराकाष्ठा करीत असते. पण 'एक-मेकां सहाय्य करूं' अशी भक्तांना भावना नसेल तर कांहींच सुव्यवस्था होऊं शकणार नाहीं, विनाकारण हेवेदावे आणि गैर-समज मात्र माजतील.

अशा उत्सवाच्या वेळीं सुविचारी समंजस, आणि शिस्तबद्ध स्वयंसेवकांची गरज असते. उत्सवास आलेल्या प्रत्येक भक्तानें तो भक्तहि आहे आणि बाबांचा स्वयंसेवकहि आहे, असें मानावें असें आम्हाला वाटतें. संयम, शांतता, शिस्त, स्वच्छता आणि समजूतदारपणा या सद्गुणांचा आम्ही हरेकानें अंगिकार केला तर आम्हास स्वयंसेवकांचीहि गरज लागणार नाहीं !

× × ×

समाधिमंदिरांत उपासनेच्या वेळीं होत असलेली गडबड आणि गबाळेपणा यांना आम्हींच आळा घातला पाहिजे. उपासना काय एकट्यानें म्हणतां येत नाहीं ? पण ज्यावेळीं आम्ही संघरूपानें एकत्र येतों तेव्हां संघात्मतेचे नियम आम्हीं पाळले पाहिजेत माझ्यामुळें माझ्या शेजारीं उभे असलेल्या उपासकाला अडचण होत नाहीं ना, त्याची तल्लीनता भंग पावत नाहीं ना, या बाबतींत आम्ही सावधचित्त असायला हवें. उपासना म्हणजे 'नादब्रह्म'! उपासना म्हणजे शाळेंतील उजळणी अथवा परवचा नव्हे !... साधकांची वृत्ति स्थिर, सावध आणि तद्रूप झाल्याखेरीज त्या नादब्रह्माची आम्हाला प्रचीति येणार नाहीं कीं साक्षात्कार घडणार नाहीं.

× × ×

श्री. शिर्डी संस्थानतर्फे या वर्षी विद्यार्थ्यांना आणि शिक्षण संस्थाना किती आणि कशी मदत केली गेली याचा सविस्तर तक्ता या अंकांत आम्ही दिला आहे. मदतीचा हा आंकडा असाचें वाढत ठेवणें हे सर्वस्वी भक्तांच्या दातृत्वावर अवलंबून आहे. कितीतरी विद्यार्थ्यांचे अर्ज आले होते. कर्तृत्वशाली आणि गरीब अशा विद्यार्थ्यांना मदतीचा हात देतांना शिर्डी संस्थानला किती समाधान वाटलें हें शब्दांत व्यक्त करतां येत नाहीं. पण हें सारें श्रेय बाबांचें. तेच कर्ते आणि करविते आहेत !

× × ×

श्रेष्ठ साईभक्त श्री. ना. वा. गुणाजी यांचा 'श्रीसाईगाथामृत (प्रकरण २ रें) भक्तसखा शामा' हा लेख गेल्या अंकांत प्रसिद्ध झाला होता. त्या लेखांत श्री. माधवराव देशपांडे (शामा) यांच्या वयासंबंधीं उल्लेख आलेला आहे. त्यांत चुकून एक चूक राहिली आणि कांहीं वाचकांचा गैरसमज झाला. त्याला श्री. गुणाजी यांनीं खुलासेवजा उत्तर धाडलें आहे. तें असें—

' माधवरावांचा जन्म १८८० इसवींत झाला नसून तो १८६० सालीं झाला. १८८० हा आंकडा चुकून पडला आहे. शके १८७२ म्हणजे सन १८६० सालीं त्यांचा जन्म झाला आणि १९४० सालीं मृत्यु. मृत्युसमयीं त्यांचें वय ८० वर्षांचें होतें.'

× × ×

श्री क्षेत्र हरिहरेश्वर येथें 'महाराष्ट्र साईबाबा सेवा संघ' नांवाची एक कसलीशी संस्था आहे. त्या 'संघाचा प्रचार करणार (फिरतीवर एकटेच) बुवा नारायण लक्ष्मण निंबाळकर' नांवाचे कोणसे गृहस्थ आहेत. या निंबाळकरबुवांनीं काढलेली आणि वाटलेली एक विलक्षण जाहिरात नुकतीच पाहण्यांत आली. या जाहिरातींत वाचकांची दिशाभूल अथवा गैरसमज करणारा बराच मजकूर आहे. जनतेकडून आर्थिक मदतीची याचना करणाऱ्या या पत्रकांत कांहींतरी अचाट आणि भलतीच विधानें केली गेलीं आहेत. तरी श्री. क्षेत्र हरिहरेश्वर येथील श्रीसाईबाबा मंदिराचा अथवा तेथील श्रीसाईबाबा अनाथ आश्रमाचा अथवा नारायण लक्ष्मण निंबाळकरबुवांचा आणि श्री शिरडी संस्थानचा कांहींहि संबंध नाहीं असें आम्ही स्पष्ट करूं इच्छितों !

× × ×


**संतकवि श्री. दासगणू महाराज व्यक्ति आणि वाङ्मय**

लेखक

**डॉ. अ. दा. आठवले**

**मूल्य रु. ७॥**

प्रकाशक

**डॉ. अ. दा. आठवले**

५९३ सदाशिव पेठ, पुणे. २




• पैसा मिळत नाहीं, मूल होत नाहीं म्हणून लोक रडून रडून आंसवांचे पाट वाहवतात. पण भगवंताचा लाभ झाला नाहीं किंवा त्याच्याविषयींची अन्तःकरणांत भक्ति उत्पन्न होत नाहीं म्हणून कितीकांच्या डोळ्यांवाटे एक टीप तरी गळलें आहे ?



जरी हें शरीर गेलों मी टाकून। तरी मी धांवेन भक्तासाठीं ॥
जो जो, मज भजे, जैशा जैशा भावें। तैसा तैसा पावें, मीही त्यासी ॥
माझा जो जाहला काया वाचा मनीं। तयाचा मी ऋणी सर्वकाळ ॥

# बाबांची लीला

[ या अंकांत श्री बाबांच्या लीलेचा एक अनुभव आम्हीं देत आहों. ज्यांना हा अनुभव आला त्यांच्याशीं पत्रव्यवहार करून त्यांत असत्य वा अतिरंजित विधान नाहीं ना याची आम्ही पूर्ण चौकशी केली आहे. अनुभव देणाऱ्या व्यक्तींनें आपलें नांव जाहीर करूं नये असें मुद्दाम कळविलें म्हणून तें गाळलें आहे. साक्षात्कार, दृष्टांत किंवा अनुभूति ही वैय्यक्तिक स्वरूपाची असते. त्यांतलें पावित्र्य अवश्य राखलें जावें असें आम्हालाहि वाटतें. ]

## नाहीं मरणास उधार

माझे वडील श्री साईभक्त म्हणून नांवाजलेलें मोठे कार्यकर्ते होते. श्री साईबाबांवर त्यांची अनन्य श्रद्धा होती. वय झालें तोंच त्यांना पोटाच्या दुर्धर रोगानें पछाडले. खूप उपचार केले, बाबांना आळविलें पण गूण येईना. हें पाहून माझी साईबाबांवरील श्रद्धा उडूं लागली. मी हळूहळू श्रद्धाहीन व नास्तिक बनूं लागलों. माझ्या वडलांचे दुखणें वाढतच चाललें. उतार म्हणून पडेना! शेवटीं डॉक्टरी औषध, आमची सुश्रुषा व बाबांची सेवा सर्वांचा कांहींच उपयोग न होता त्यांनीं परलोकाचा मार्ग धरला! आमचें घर दुःखसागरांत बुडून गेलें. मला तर फारच दुःख झालें. ज्या बाबांची अनंत भावें माझ्या वडलांनीं भक्ती केली त्या बाबांनीं माझ्या वडिलांना वाचविलें नाहीं, मग त्यांची भक्ति कां करायची, असे विचार मनांत येऊन श्रीसाईबाबांचें एकहि चिन्ह घरांत ठेवायाचें नाहीं असा मी निश्चय केला. तसा विचार मी घरांत व्यक्त करतांच सर्वांनी मला परोपरीनें तसा अविचार न करण्याविषयीं विनविलें. पण मी वडिलांच्या दुःखानें जवळ जवळ विवेकशून्य झालों होतों. मी सर्वांना धुडकावून लावलें. आणि श्री बाबांच्या प्रतिमा, तसबिरी यांना समुद्रांत नेऊन बुडविण्यासाठीं त्या एकत्र गोळा केल्या. बाबांच्या प्रतिमेसाठीं जो चौरंग ठेवला होता त्याला एक चोर खण होता. या खणांत काय आहे तें पहावे असें मनांत घेऊन, मी तो

उघडून पाहिलीं तों त्यांत एक श्रीसाई सच्चरित्राची पोथी व त्यांत एक उदीची पुडी ठेवलेली आढळली. पुडी ठेवलेले पोथीचें पानच प्रथम उघडलें गेलें आणि सहज म्हणून तें पान मी वाचूं लागलों. त्या पानांवर जीवन-मरणाविषयीं माणसानें कसें स्थितप्रज्ञ असावें आणि जीवनमरणा सारख्या क्षुल्लक बाबीबद्दल तुम्हीं परमेश्वराला का दोष देता, त्याला जबाबदार का धरता, असा श्री बाबांनी त्या ओव्यांत प्रश्न केलेला मला आढळला! आणि माझे डोळे साफ उघडले! मी तावडतोब बाबांची क्षमायाचना केली आणि परमभक्तीभावानें सर्व प्रतिमा व तसबिरी जागच्या जागेवर ठेवून दिल्या. आणि पूर्ववत त्यांची पूजाअर्चा सुरूं केली. माझ्या मनाला आवरून धरणारा व मला सन्मार्गी लावणारा तो बहुमोल उपदेश मी कधींच विसरणें शक्य नाहीं!


## श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीस असलेलीं पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित (मराठी) | किंमत रु. | ७-०-० |
| (२) | सच्चरित (इंग्रजी) | ,, ,, | ४-०-० |
| (३) | दासगणूकृत श्रीसाईनाथ-स्तवनमंजरी | ,, ,, | ०-२-० |
| (४) | ,, (अध्याय ४) | ,, ,, | ०-८-० |
| (५) | सगुणोपासना | | ०-३-० |
| (६) | प्रधानकृत पुस्तक (A glimpse of Indian spirituality) | ,, ,, | १-०-० |
| (७) | श्री साई-लीलामृत | ,, ,, | २-०-० |
| (८) | श्री साई-सुमनांजली | ,, ,, | ०-१-० |
| (९) | कीर्तन-पंचक (श्री साईलीलांनीं नटलेलें) | ,, ,, | १-८-० |
| (१०) | शीलधी (शिरडी वर्णन) | ,, ,, | ०-१२-० |
| (११) | श्रीसाईबाबा-अवतार व कार्य | ,, ,, | २-०-० |
| (१२) | श्रीसाई गीतांजली | ,, ,, | ०-२-० |
| (१३) | हिंदी श्रीसाईसच्चरित | ,, ,, | ४-८-० |

वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील:—

(१) सर कारकून, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, पोस्ट-शिरडी, जि. अहमदनगर.

(२) श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, मुंबई ऑफिस : ईस्ट अँड वेस्ट इं. कंपनी बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई. १

आध्यात्मिक मार्गांत गुरूची फार जरूरी असते असें सर्व संत मंडळी सांगतात. तेव्हां गुरु भेटावा अशी सामान्य मनुष्याला घाई होतें. त्याचा फायदा घेणारी धूर्त मंडळी तयारच असते. ते अशा भोळ्या लोकांना नादीं लावून 'गुरुबाजींचा' धंदाच सुरू करतात. त्यांचें कपटमार्ग व भोळ्या लोकांना आपल्या कळपांत ओढण्याचें प्रयत्न यापासून फार सावध राहिलें पाहिजे.

# सद्‌गुरूचा शोध

लेखक : आचार्य भागवत

संकुचित अशा वैयक्तिक स्वार्थांचा पूर्ण त्याग करून जेव्हां एखाद्या महान् ध्येयाकरितां मनुष्य आपले तन, मन, धन अर्पण करीत असतो तेव्हां तें ध्येय हाच त्याचा गुरु होतो.

परंतु ध्येय किंवा तत्त्व हें अमूर्त असतें. त्यानें सर्वांचेंच समाधान होईल असें नाहीं. मूर्त स्वरूपांत गुरु मिळावा अशी पुष्कळांची अपेक्षा असतें. मनुष्य स्वरूपांत योग्य गुरु न भेटल्यास आपल्या आवडीचा एखादा "ग्रंथ" आपण गुरु म्हणून मानूं शकतों. त्यां ग्रंथाचीं पारायणें करतो. त्यांतील शिकवण आत्मसात करण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. श्रीसमर्थ रामदासस्वामींचा प्रयाण–काळ जवळ आला तेव्हां शिष्यांनीं त्यांना विचारलें, 'तुमच्या मागें आम्हांला आधार काय?' त्यावर समर्थ म्हणाले, 'दासबोध व आत्माराम हे दोन ग्रंथ पहावे व त्यांचीं पारायणें करावीं म्हणजे आम्हांशीं प्रत्यक्ष भाषण केल्यासारखें होईल.' तेव्हां एखाद्या ग्रंथाला गुरु मानून त्याची सेवा करावी हें उचित होय. अशा प्रकारें श्रीगीता, भागवत किंवा ज्ञानेश्वरीसारखे ग्रंथ गुरुस्थानीं मानून आपली आध्यात्मिक उन्नति साधल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. सेवादि उपायांनीं ज्याप्रमाणें मानवी स्वरूपांतील गुरु प्रसन्न करून घेतां येतो, त्याचप्रमाणें आपल्या पूज्य ग्रंथाचाही '**प्रसाद**' आपणांस त्याचें मनन चिंतनानें मिळवितां येतो.

अशा या दोन प्रकारच्या गुरुरूपांचा आश्रय करून आध्यात्मिक उन्नति साधतां येते; पण त्याला पूर्वपुण्याई लागते. मनुष्यरूपानें नांदणाऱ्या गुरूचीच सामान्यांना जरूर आहे. आपणाला गीतेंतील विश्वरूपदर्शनानंतर अर्जुनाची झालेली स्थिति माहीत आहे. श्रीकृष्णाचा आवडता भक्तसखा असूनही त्याला तें दर्शन सहन करतां येईना व शेवटीं त्यानें 'आपलें नेहमींचें चतुर्भुज रूपडेंच दाखवा' असें श्रीकृष्णाल

विनविलें. यावरून आपल्या लक्षांत येईल कीं विशाल, व्यापक अशा वस्तूचें आकलन करणें मानवी बुद्धीला कठीण जातें. आपण तर सामान्य माणसें, तेव्हां आपणाला मानवी स्वरूपांत दिसणाऱ्या गुरूची आवश्यकता भासणारच.

मनुष्यरूपानें अवतार घेणाऱ्या गुरू-मध्येंही सामान्यतः दोन प्रकार दिसून येतात. पहिला म्हणजे श्रीकृष्ण, गौतम बुद्ध, येशू खिस्त, श्रीशंकराचार्य किंवा आपले श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचा. हे जगद्-गुरू आहेत. त्यांचा उपदेश सार्व-जनिक व सार्वकालिक आहे. मेघ ज्या-प्रमाणें आपलें पाणी मुक्तहस्तानें वांटीतच जातो मग तें खडकावर पडून वाहून जावो किंवा सुपीक जमिनींत पडून फल-द्रूप होवो, त्याप्रमाणें या जगद्गुरूंच्या उपदेशाचें असतें. ते नवीन तत्त्वज्ञानाचा प्रसार करितात. त्याचे प्रकाशानें अज्ञा-नांधःकार नष्ट होऊन सर्वत्र सुखाचेंच पीक येतें. असे पुरुष म्हणजे युगपुरुष. ते वरचेवर अवतीर्ण होत नाहींत. त्यांची शिकवण म्हणजेच आपले ' धर्मग्रंथ '. हे ग्रंथहि गुरुरूपच आहेत हें पूर्वी सांगि-तलेंच आहे.

स्वादिष्ट स्वयंपाकासाठीं
प्रताप
छाप हिंग वापरा
गोपालजी आणि कं.
सेन्ट्रल स्ट्रीट, वडगादी, मुंबई ३.

मानवी स्वरूपांत अवतीर्ण होणाऱ्या गुरूंचा दुसरा प्रकार कोणता तें आतां पाहूं. महाराष्ट्रांत "श्रीगुरुचरित्र" हा ग्रंथ सर्वांच्या परिचयाचा आहे. त्या ग्रंथांत ज्या सत्पुरुषांचें वर्णन आहे ते **श्रीपाद श्रीवल्लभ** किंवा **श्रीनृसिंहसरस्वति** हे या दुसऱ्या प्रकारचे गुरु होत. आपले श्रीसाईबाबा याच वर्गांत येतात. तेव्हां त्यांच्या कार्यपद्धतीचें स्वरूप काय आहे, तें थोडक्यांत पाहूं. प्रत्येक भक्तीचे जीवनांत कांहीं प्रसंग असे येतात कीं, त्या वेळीं त्यांची विचारशक्ती पुरी पडत नाहीं व त्याला बाहेरच्या आधा-राची जरूर भासते. अशा आणीबाणीचे वेळीं हे सत्पुरुष संकटांतील मनुष्याला मदत करितात व योग्य मार्ग दाखवितात. अशा प्रकारे त्यांचे आकर्षण एकदां सुरू झालें म्हणजे मग हळूंहळूं ते त्याला सन्मार्गाला लावतात. अधिकार असेल त्या प्रकारची उपासना सांगतात व अध्यात्म-मार्गाची गोडी लावितात. ते मोठमोठ्या तत्त्वांचा उपदेश करीत बसत नाहींत. रोजच्या व्यवहारांतील सामान्य गोष्टींतूनच सुरुवात करून मोठमोठी तत्त्वें कशीं आत्मसात करावींत याची गुरुकिल्ली त्यांचेजवळ असते. कुशल वैद्य ज्याप्रमाणें रोग्याला नीट तपासून औषधयोजना करतो त्याप्रमाणें प्रत्येक शिष्याचा अधिकार काय ? त्याची शक्ति किती ? याचा सूक्ष्म विचार करून योग्य अशीच साधना त्याला देतात. सामान्य जनता, 'चमत्कारा-शिवाय नमस्कार' करीत नाहीं हें त्यांना पटविण्याकरितां जरूर तर ते 'चमत्कारहि' करून दाखवितात. अशा प्रकारची शक्ति विशेष परिश्रमानें संपादन करावी लागते किंवा ती गुरुपरंपरेनें मिळतें. 'शक्तिपात' करून गुरु आपली शक्ति शिष्याला देऊं

शकतो, याचीं उदाहरणें आधुनिक काळांतहि आढळतात. ही शक्ति फार संभाळून वापरावी लागते, पण हें सत्पुरुष तिची सर्व पथ्यें नीट सांभाळतात व प्रसंगविशेषी शिष्याच्या कल्याणाकरितां तिचा उपयोगहि करितात. अशा सत्पुरुषाची परंपरा अखंडित चालू असते. ज्या काळाला जी शिकवण योग्य ती त्या काळीं ते देत असतात. उदाहरणार्थ इंग्रजी राज्य हिंदुस्थानांत स्थिर झालें, त्या सुमारास या नव्या संस्कृतीचें झगझगाटानें पुष्कळ विद्वान् समजल्या जाणाऱ्या लोकांचेसुद्धां डोळे दिपून गेले. आपल्या संस्कृतींतील शाश्वत मूल्यें त्यांना दिसेनाशीं झालीं. अशा वेळीं या देशांत श्रीरामकृष्ण परमहंस विवेकानंद, श्रीरामतीर्थ वगैरे सत्पुरुषांनीं आणि रानडे, टिळक यांसारख्या राष्ट्रपुरुषांनीं योग्य मार्ग जनतेला दाखवून दिला. त्याचबरोबर व्यक्ती—व्यक्तीला हाताशीं धरून तिला योग्य मार्गावर आणण्याचें काम अनेक सत्पुरुषांनीं केलें. आपल्या महाराष्ट्रापुरतेंच बोलावयाचें तर निजामशाहींत 'श्रीमाणिकप्रभु', अक्कलकोटचे स्वामी महाराज, शिर्डीचे श्रीसाईबाबा व गुलाबराव महाराज असे अनेक सत्पुरुष कार्य करीत होते. व आजहि असे सत्पुरुष आहेत व ते आपलें कार्य मुकाट्यानें करीत आहेत. आपणाला तितकी निकड असेल; व आपली पूर्व तयारी झाली असेल तर ते आपणांस जरूर भेटतील. योग्य पूर्वतयारी झाली म्हणजे आपलें इष्ट दैवतहि आपला नियत गुरु आपणांत कसें दाखवून देतें याचें एक उदाहरण अलीकडेच मला माहीत झालें आहे तें मी तुम्हांला सांगतों. श्रीगोंदें येथें श्रीनानामहाराज नांवाचे एक सत्पुरुष रहातात. त्यांची लहानपणापासून श्रीगणपतीवर मोठी श्रद्धा. अत्यंत बिकट परिस्थितीवर सुद्धां त्यांनीं आपली उपासना चालू ठेविली. अथर्वशीर्षाचीं अनेक पुरश्चरणें केलीं. शेवटीं श्रीगजानन प्रसन्न होऊन त्यांनीं स्वतः त्यांचे मानवी गुरु त्यांना दाखवून दिले. अशीं आणखीहि उदाहरणें मला माहीत आहेत. तेव्हां आपली पूर्वतयारी झाली म्हणजे गुरु भेटतोच. पुष्कळ वेळां तोच तुम्हांला शोधून काढतो.

मात्र या बाबतींत एक सावधगिरीचा इषारा द्यावासा वाटतो. पुष्कळ लोक आपली पूर्वतयारी होण्याला लागणारा दीर्घकाल पाहून उतावीळ होतात. आध्यात्मिक मार्गात गुरूची फार जरूरी असते असें सर्व संत मंडळी सांगतात. तेव्हां गुरु भेटावा अशी सामान्य मनुष्याला घाई होतें. त्याचा फायदा घेणारी धूर्त मंडळी तयारच असते. ते अशा भोळ्या, लोकांना नादीं लावून 'गुरुबाजीचा' धंदाच सुरू करतात. त्यांचे कपटमार्ग व भोळ्या लोकांना आपल्या कळपांत ओढण्याचे प्रयत्न यापासून फार सावध राहिलें पाहिजे. ढोंगी गुरू कोण व खरे कोण हें कसें ओळखावें, याच्या खाणाखुणा श्रीरामदासांनीं चांगल्या वर्णन केल्या आहेत, त्या सर्व नीट पाहून, तपासून, पारखून गुरूचा स्वीकार करावा. भपक्याला भुलून सोन्याऐवजीं पितळ किंवा हिऱ्याऐवजीं गारगोटी पदरांत घेऊं नये. सुमारें वीस वर्षांपूर्वी ढोंगी गुरुविरुद्ध महाराष्ट्रांत मोठी चळवळ झाली, ती कांहीं अंशीं योग्यच होती. म्हणून आपले 'साईबाबा' 'श्रद्धे' बरोबरच 'सबूरी' ची शिकवण देत. तिचें रहस्य लक्षांत घ्या. 'सबुरी' चे हें पथ्य पाळलेंत म्हणजे योग्य काळीं तुमच्या श्रद्धेला साद देणाऱ्या सद्गुरुची भेट नक्की होईलच होईल.

---

**तमसो माऽज्योतिर्गमय**

# श्रीसाईनाथ शिष्यवृत्त्या
# आणि
# शैक्षणिक मदत

[ संस्थानच्या नवीन उद्देशाप्रमाणें शिक्षणास उत्तेजन देण्यासाठीं या वर्षापासून संस्थाननें गरजू व लायक विद्यार्थ्यांस व शिक्षण संस्थांस शिष्यवृत्त्या व मदत देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. या वर्षासाठीं व्यवस्थापक समितीनें खालील योजना मंजूर केली आहे. ]

**शिष्यवृत्त्यासंबंधीं योजना**

१. प्राथमिक इयत्ता १ ते ३ यांतील विद्यार्थ्यांस वार्षिक पुस्तकें पाट्या इत्यादि उपकरणें प्रत्येक वर्गांतील चार चार विद्यार्थ्यांस देण्यांत येतील.

२ प्रा. इ. ४ ते ६ यांतील विद्यार्थ्यांस फी व पुस्तकांसाठीं वार्षिक रुपये १०, १५, २०, याप्रमाणें रोख प्रत्येक इयत्तेंत चार चार विद्यार्थ्यांस देण्यांत येतील.

३ इ. ७ यांतील चार विद्यार्थ्यांस फी व पुस्तकांसाठीं वार्षिक रु. २५ याप्रमाणें रोख देण्यांत येतील.

४ माध्यमिक इ. ८ ते ११ यांतील विद्यार्थ्यांस फी व पुस्तकांसाठीं वार्षिक रोख रु. ४०, ५०, ६०, ७० याप्रमाणें प्रत्येक इयत्तेंतील पांच विद्यार्थ्यांस देण्यांत येतील.

५ विद्यापीठांतील विद्यार्थ्यांस परत फेडीच्या अटीवर वार्षिक रु. १५० ते ३०० पर्यंत वैयक्तिक लायकी व गरजेनुसार चार शिष्यवृत्त्या देण्यांत येतील

६ शाळांस मदत, तालुक्यांत किंवा किंवा मागसलेल्या भागांत चालविलें जाणाऱ्या माध्यमिक शाळा व हायस्कुले यांना वार्षिक मदत म्हणून प्रत्येकीं रु. ५०० पर्यंत एक वर्षांत चार शाळांना त्याच्या लायकी व गरजेप्रमाणें देण्यांत येतील.

७ शिष्यवृत्त्या समितीनें अर्ज मागवून त्यांची चांचणी करून शिष्यवृत्त्या व मदत द्यावी.

या योजनेप्रमाणें गरजू विद्यार्थी व शाळांकडून अर्ज मागविणेंत आले. एकंदर १३५ विद्यार्थ्यांकडून अर्ज आले व ६ शाळांकडून मदतीची मागणी आली. त्यांचा विचार शिष्यवृत्त्या पोट समितीनें करून सर्व अर्जदारांस मदत करणें नसल्यानें पुढील धोरण ठरविलें.

(१) १ ते ३ इयत्तेंतील सर्व अर्जदार विद्यार्थ्यांस पुस्तकें पाटी यांसाठीं मदत द्यावी.

(२) ह्याच्या पुढील इयत्तेंत, त्या त्या इयत्तेच्या गरजेप्रमाणें रकमेंत फेरफार

करून मंजूर रकमेच्या आंत जास्तीत जास्त गरजू व लायक विद्यार्थ्यांस मदत करावी.

(३) ज्या अर्जदार विद्यार्थ्यांचे पालकांची कमाई फारच कमी असेल त्यांस प्रथम मदत द्यावी.

(४) संस्थानच्या नोकरांकडून आलेल्या अर्जांचा सहानुभूतीपर विचार करून त्यांस मदत द्यावी.

(५) प्रत्येक गटांत शिर्डीस किती व इतर भागांत किती याचे प्रमाण ठरवून त्या प्रमाणांत शिष्यवृत्या द्याव्यात.

(६) शाळांना मदत देतांना इमारत फंडासाठीं मदत देण्याची तूर्त जरूरी नाहीं.

(७) विश्वविद्यालयाचे विद्यार्थ्यांचे बाबतींत मदत परतीचा करार पालक व विद्यार्थी यांचे कडून लिहून घ्यावा.

वरील धोरणान्वयें खालीलप्रमाणें शिष्यवृत्त्या व मदत देण्यांत आली:—

## शाळांस मदत

१ बांदा एज्युकेशन सोसायटी, भायखळा मदत रु. ५००

२ ब्राम्हण विद्यालय, ठाणें ,, ,, ५००

३ शिर्डी माध्यमिक शाळा (फर्निचर वगैरेसाठीं) ७५०

## विश्वविद्यालयांचे विद्यार्थ्यांस परत फंडांची मदत

१ श्री. वसंत लक्ष्मण वाघ, मेडीकल १ लें वर्ष, अहमदनगर, रु.२५०

२ ,, रमाकान्त बाळकृष्ण पाताडे, इंजीनी. २ रें, परेळ, रु. २००

३ ,, शरद् सिताराम कुर्लेकर, इंजीनी. १ लें, अहमदनगर रु. २००

४ ,, श्रीकांत भालचंद्र चौबळ, लॉ १ लें, अंधेरी, रु. २००

५ कु. सुनन्दा शंकर हळदीपूर बी. ए.–ब्रह्मपुरी, २०० रु.

६ श्री रमेश शिवराम गांवकर बी. एस्सी.–Sr–दादर, २०० रु.

७ श्री. महादेव अप्पासो निंबाळकर आर्टस् Fy–मुंबई, १५० रु.

८ कु. विजया केशव रसाळ आर्टस्–इंटर–मुंबई, १५० रु.

९ श्री. श्रीहरी शंकर थिटे कॉमर्स-इंटर–अहमदाबाद, १५० रु.

१० श्री. मधुकर शंकर बेलेकर ऑर्किटेक्ट JJ ,, १५० रु.

११ ,, रामचंद्र जोतीबा मुंगुर्डेकर–सायन्स-इंटर ,, १५० रु.

१२ श्री. हरीभाऊ विष्णु शेवते एफ्. वाय. आर्टस–मुंबई, १५० रु.

१३ श्री. रामदास सयाजी दारके टेक्नी–स्कूल–धुळें, १५० रु.

## माध्यमिक विद्यार्थ्यांस शिष्यवृत्या

१ श्री. भाऊ सो सखाराम नायकवाडी कोपरगांव इ ११ वी रु. ६०

२ प्रभाकर दत्तात्रय बाक्रे, कुडाळ ११ वी रु. ६०

३ कु. सुलभा प्रभाकर दोंदे, माटुंगा ११ वी रु. ६०

४ श्री. शशीकांत बाळकृष्ण पाताडे, परेल ११ वी रु. ६०

५ राम गणेश पाध्ये–शहापूर, १० वी रु. ५०

६ श्री. मनोहर विनायक प्रधान मुंबई, ११ वी रु. ५०

७ श्री. रविंद्र गणेश आराध्ये, भुसावळ, १० वी रु. ५०

८ श्री. लखाराम का. सोनवणे
शिर्डी, ११ वी रु. ३०
९ श्री, प्रकाश भिमय्या कंवेरांदा
दादर, १० वी रु. ५०
१० श्री. रमेश देवराव परभाने
भिंगार, १० वी रु. ५०
११ विष्णु दामोदर रोकडे, शिर्डी
१० वी रु. ५०
१२ श्री. बाबू बाराजी वैद्य, शिर्डी
९ वी रु. ५०
१३ ,, विजयकुमार कृष्ण देशपांडे
अहमदनगर ,, ५०
१४ ,, शांताराम बाबूराव टकले ,, ५०
१५ ,, शांताराम सखाराम इंदूलकर,
अलिबाग ,, ५०
१६ कु. सिंधु धोंडो औटे,
अहमदनगर ,, ५०
१७ श्री. शांताराम रंगनाथ भिराणे
शिर्डी इ. ८ वी ४०
१८ ,, तात्याराम गंगाधर गोंधकर ,, ४०
१९ ,, सुधाकर नागनाथ रोंघे,
श्रीगोंदे ,, ४०
२० ,, लक्ष्मण गंगाधर कुळकर्णी,
नांदूर ,, ४०
२१ ,, नामदेव दत्तात्रय हावरे,
मुंबई ,, ४०
२२ ,, द्वारकानाथ गोपाळ खेरे,
कर्जत इ १० वी ४०
२३ ,, मधुकर नरसिंग पंडीत,
चिंचली इ. ८ वी ३०

**प्राथमीक विद्यार्थ्यांस शिष्यवृत्या**

१ ,, बाळाजी सावळेराम आरणे,
शिर्डी इ. ७ वी. १६
२ ,, विष्णू माधव वाघचौरे,
,, ,, १६
३ कु. आशालता मधुकर दुर्वे,
ठाणे ,, १६
४ ,, मीरा उ. मराठे,
गिरगांव–मुंबई ,, १६
५ ,, श्री. रामभाऊ राघू कहार
कोपरगांव ,, १६
६ ,, दत्तात्रय मुरलीधर जोशी
७ ,, हबीब दादाभाई मन्यार ,, १६
८ ,, विश्वनाथ महादु नायकवाडी,
,, ,, १६
९ ,, सोपान गंगाधर गोरे,
लोणी ,, १६
१० ,, दिलीप दामोदर ठाकूर,
परेल ,, १६
११ श्री. ज्ञानदेव यशवंत भागवत–
शिर्डी इ. ६ वी १४
१२ ,, सुधाकर वसंत देवभानकर–
शिर्डी इ. ६ वी १४
१३ ,, देवराम दारकू पोहे–
राहते इ. ६ वी १४
१४ ,, भवानी दगडू तुपे–
राहते इ. ६ वी १४
१५ ,, बाळू बंडू लांडगे–
राहते इ. ६ वी १४
१६ ,, खंडू सोमाजी सोसे–
डिग्रस इ. ६ वी १४
१७ कु. शोभा प्रभाकर दोंदे–
माटुंगा इ. ६ वी १४
१८ श्री. काशिनाथ कृष्णा पाटील–
भिवंडी इ. ६ वी १४
१९ ,, भाऊ शंकर पिलगर–
राहते इ. ५ वी १२
२० ,, वसंत बबन जाधव–
राहते इ. ५ वी. १२

२१ ,, भानुदास सावळेराम रोहम—
राहते इ. ५ वी १२
२२ ,, गजरतसींग धनुसींग परदेशी—
कोपरगांव इ.५ वी १२
२३ ,, सुधाकर भिकाजी खरे
ठाणे इ ५ वी १२
२४ कु. रजनी गणेश मुळे
अहमदनगर, इ. ५ वी १२
२५ श्री. सखाराम बगाजी डोके
शिर्डी इ. ५ वी १२
२६ ,, अंबादास उमाजी मेहेत्रे
शिर्डी इ. ५ वी १२
२७ कु. स्नेहलता दामोदर ठाकूर
परेल इ. ५ वी १२
२८ ,, ललिता व्यंकटराव नायडू
बडोदे इ. ४ थी १०
२९ ,, माधवसींग शंकरसींग परदेशी
कोपरगांव इ. ४ थी १०
३० श्री. रंगनाथ लक्ष्मण शिंदे
शिर्डी इ. ४ थी १०
३१ ,, अर्जुन लक्ष्मण डुकर
शिर्डी इ. ४ थी १०
३२ ,, रविंद्र अनंत देशपांडे
ठाणे इ. ४ थी १०
३३ ,, एकनाथ शंकर भोत
ठाणें इ. ४ थी १०
३४ ,, सुरेश पांडुरंग जोशी.
ठाणे इ ४ थी १०
३५ ,, प्रदीप नारायण पत्की.
,, ,, १०
३६ ,, शिवाजी शंकर गायकवाड
शिर्डी इ. ३ री ५
३७ ,, निजाम महिताब पठाण
,, ,, ५
३८ दामू काशिनाथ बच्छू
,, ,, ५
३९ बाजीराव बाळा भासले
,, ,, ५
४० कु. निशा मधुकर दुर्वे
ठाणें ,, ५
४१ ,, हिराबाई हेमचंद्र गवंडी
,, ,, ५
४२ ,, सुधा अनंत महाजन
,, ,, ५
४३ श्री. आण्णा पुंजा गोंदकर
शिर्डी इ. २ री ४
४४ ,, मेघराज बट्टू राठोड
,, ,, ४
४५ ,, विनयकुमार बळवंत वाघुंडे
,, ,, ४
४६ श्री. पंडित भिमाजी लहिरे
शिर्डी ,, ४
४७ ,, प्रकाश पंढरीनाथ भडकमकर
ठाणें ,, ,, ४
४८ ,, नामदेव बाळाजी धामणसे
ठाणें ,, ,, ४
४९ ,, काशिनाथ लक्ष्मण भिडे
ठाणें ,, ,, ४
५० कु. शशीकला मधुकर दुर्वे
ठाणें ,, ,, ४
५१ श्री. जयप्रकाश मधुकर नारविलकर
दादर ,, ,, ४
५२ ,, प्रकाश व्यंकट नायडू
बडोदें इ. १ ली ,, २
५३ ,, सोपान शामराव शिंदे
शिर्डी ,, ,, २
५४ कु वत्सला सदाशिव क्षीरसागर
,, ,, ,, २

५५ श्री, नामदेव गंगाराम शेजवळ

" " " २

५६ ,, अशोक नाना कोराटे

" " " २

५७ कु. स्मृति व्यंकट नायडू

बडोदें बालमंदिर ,, २

या शिवाय शिर्डी येथील माध्यमिक शाळेच्या ८ व्या इयत्तेच्या नवीन वर्गासाठीं शास्त्रीय उपकरणें व इतर वस्तू घेण्यास रुपये पांचशे व डिपॉझिट ठेवण्यास रुपये पांचशे देखील दिले आहेत.

यावर्षी संस्थाननें एकंदर रुपये ६३४५ शैक्षणिक बाबत खर्च केले आहेत व त्याचा उपयोग ३ शाळा व ९३ विद्यार्थ्यांस झाला आहे.

आपले नम्र साई–सेवक

**डी. बी. राणे**

**सी. बी. वेलकर**

संयुक्त चिटणीस,

श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी.

१४–९–१९५६

★

# साईभक्तांस खास सूचना

श्री साईबाबांची महति वाढत्या प्रमाणांत असल्यामुळें, जागोजागीं श्री साईच्या नांवाच्या संस्था स्थापल्या जात आहेत व त्यांचेसाठी पत्रकें काढून फंडहि गोळा होत आहेत. कांहीं भक्तांनी यासंबंधी पृच्छा केली असून या ठिकाणीं येथें पुन्हां नमूद करण्यांत येतें कीं, त्या फंडाशीं किंवा कोणत्याहि इतर संस्थांशीं शिर्डी संस्थानचा कोणत्याहि प्रकारचा संबंध नाहीं. श्री साईबाबा संस्थानची शाखा कोठेंहि नाहीं. म्हणून भक्तांनीं गैरसमज करून घेऊं नये. साईबाबा संस्थान शिर्डीच्या अधिकृत कचेऱ्या शिर्डी, जि. अहमदनगर व मुंबई ५५ अपोलो स्ट्रीट येथेंच फक्त आहेत. 'महाराष्ट्र साईसेवा संघ हरीहरेश्वर'ची एक पत्रिका आमच्या पाहण्यांत आली आहे. अर्थातच तिचा साई संस्थानशीं कांहीं संबंध नाहीं हें निराळें कळविण्याची गरज नाहीं.

**द. ब. राणे**

**चं. बा. वेलकर**

**सं. चिटणीस**



● जिथें गैरविश्वास आहे तिथें प्रेम नांदणें शक्य नाहीं. जिथें प्रेम नाहीं तिथें स्वार्थनिरपेक्षतेची तुम्ही का अपेक्षा करावी ? कसल्याहि महान् कार्यांचा विध्वंस, गैरसमजाची बारीकशी ठिणगी पडली तरी होऊ शकतो हें विसरूं नका !

**—श्री गौरांग प्रभु चैतन्य**

# आत्मानुभवांचें शास्त्र

भक्तांचे अनुभव हे आत्मप्रवण असल्यामुळें सर्वस्वी श्रेयस असेच असतात. म्हणून भक्तांनी अगदीं मोकळेपणें व निःसंकोच वृत्तीनें आपले अनुभव प्रसिद्ध करणें हें कार्य भक्तीला व श्रद्धेला वृद्धिंगत करणारें आहे. लोकलज्जेच्या भीतींतच भक्तीची माती होते. लज्जेच्या परिसमाप्तींतच खऱ्या भक्तीची उत्पत्ति व वाढ होते.

लेखक : वाङ्मयप्रभु त्रिलोकेकर

श्री साईलीला मासिकांत भक्तांचे अनुभव म्हणून एक सदर असतें. बाबांचे भक्त हे अनुभव मोठ्या आस्थेनें वाचतात. पण भिन्न भिन्न भक्तांचे अनुभव केवळ कपोलकल्पित थापा आहेत असें म्हणण्यापर्यंतही कांहीं स्थूल–बुद्धिप्रामाण्य लोकांची मजल जाते. अशा स्थूलबुद्धि-प्रामाण्य लोकांत बरेचसे इंग्रजींत बटवट करणारे व स्वतःस सुशिक्षित म्हणविणारे लोक असल्यामुळें लोक–लज्जेस्तव कांहीं भाविक माणसें आपले अनुभव उघडपणें बोलण्यास धजत नाहींत. त्यांना असें वाटतें कीं आपण जर आपले हे अनुभव प्रसिद्ध केले तर आपली अडाणी लोकांत गणना होईल. पण ही त्यांची भीति निराधार आहे. इतकेंच नव्हे तर उलट भक्तांच्या आत्मानुभवाच्या गोष्टींवर विश्वास न ठेवणाऱ्या लोकांचीच आध्यात्मिक दृष्टीनें अज्ञानी लोकांत गणना करावी लागेल.

सिद्धांचे मनोरथ, केवळ सिद्धींच्या जोरावर करणाऱ्या साधकांचे चमत्कार आणि भक्तांचे आत्मानुभव–ह्या तिन्ही गोष्टी भिन्न आहेत. सिद्धींच्या जोरावर साध्य होणाऱ्या शक्तींची माहिती श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं श्री ज्ञानेश्वरीच्या ६ व्या अध्यायांत व श्री एकनाथांनीं आपल्या एकनाथी भागवतांत सविस्तरपणें दिलेली आहे. पण ह्या सिद्धींचा भक्तांच्या आत्मानुभवाच्या घटनांशीं कांहींएक संबंध नाहीं, ही गोष्ट ध्यानांत ठेवणें जरूर आहे. भक्तांचे आत्मानुभव हे सद्गुरूच्या कृपेनें, संतांच्या सान्निध्यानें किंवा परमेश्वरी प्रसादानें येत असतात. कित्येक वेळां तर हे अनुभव केवळ 'चक्षुर्वैसत्यं' अशा वृत्तीच्या माणसांना अगदीं असंभाव्य

वाटतात. अशा परिस्थितींत भक्तांचे अनुभव किंवा आत्मानुभव हे सुद्धां इतर शास्त्रांप्रमाणें एक संभाव्य व विश्वासनीय शास्त्र आहे हें लक्षांत घ्यावें. धार्मिक दृष्टीनें अशा तऱ्हेचे अनुभव आपणांस जितके जास्त संग्रहित करता येतील तितके केल्यानें ह्या शास्त्रांत एक अमूल्य भर पडणार आहे.

ह्या आत्मानुभवाच्या शास्त्रीय मीमांसेचा येथें विचार करण्याच्या आधीं ह्या आत्मानुभवाचे कांहीं प्रकार (Norms) वाचकांपुढें मांडणें जरूर आहे.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं पहिल्याच अध्यायांत म्हटलें आहे–

' इये गीताचार्यांची थोरी ।
स्वयें शंभू विवरी ।
तेथ भवानी प्रश्न करी ।
चमत्कारौनी ॥
तेथ हर म्हणे नेणिजे ।
दैवी जैसें कां रूप तुझें ।
तैसें नित्य नूतन देखिजे ।
गीतातत्त्व ॥

प्रत्यक्ष शंकर पार्वतीला गीतेचा अर्थ समजावून सांगत असतांना देवीनें शंकरास गीतेची थोरवी काय आहे, असा प्रश्न केला. त्यावर शंकरानें दिलेलें उत्तर अत्यंत मार्मिक आणि रहस्यपूर्ण आहे. शिवानें उत्तर दिलें कीं, "हे देवी! जसें तुझें रूप नित्य नव्या सौंदर्यानें भरलेलें आहे तसेंच गीतेच्या थोरवीचें स्वरूप आहे."

भक्तांचे अनुभवसुद्धां अशाच प्रकारें आध्यात्मिक सौंदर्यानें भरलेले व नित्य नवे असे असतात. जितके भक्त तितके आत्मानुभव. ज्याप्रमाणें जितकी माणसें तितके त्यांच्या आंगठ्यांचे ठसे, त्याचप्रमाणें जितके भक्त तितके त्यांचे आत्मानुभव वेगळे वेगळे आढळतात. फक्त एक भक्तीच्या केंद्राभोंवतींच हीं आत्मानुभवांचीं सारीं चक्रें फिरत असतात. माझ्या लेखांत स्थलसंकोचास्तव मी दोन चारच आत्मानुभवाचे प्रकार विचारांत घेणार आहें. त्यांतील पहिलें उदाहरण श्री. नामदेवांची दासी जनाबाई हिचें होय. अखिल संतांत अत्यंत प्रेमळ भक्त म्हणून नामदेवाची ख्याति; पण प्रेमळपणांत जनाबाईनें आपल्या धन्यावरसुद्धां मात केली. जनाबाईच्या आत्मानुभवाचे अभंग अत्यंत रसाळ व प्रेमळ आहेत. किंबहुना मराठी साहित्यांत रसाळ काव्यांत जनाबाईच्या अभंगांचें स्थान अद्वितीय आहे. जनाबाईच्या आत्मानुभवाचे दोनच भिन्न भिन्न अनुभव पहा.

तुळसीचे वनीं ॥
जनी उकलीत वेणी ॥ १ ॥
हातीं घेउनियां लोणी ॥
डोई चोळी चक्रपाणी ॥ २ ॥
माझे जनीला नाहीं कोणी ॥
म्हणुनी देव घाली पाणी ॥ ३ ॥
जनी सांगे सर्व लोकां ॥
न्हाऊं घाली माझा सखा ॥ ४ ॥

आतां जनाबाइचा दुसरा अनुभव पहा.

एके दिवशीं न्हावयास ॥
पाणी नव्हतें विसणास ॥१॥
देव धांवोनियां आले ॥
शीतळ उदक घे घे बोले ॥२॥
आपुल्या हातें विसाणीं ॥
घाली जनीच्या डोयी पाणी ॥३॥

माझ्या डोईच्या केसांस ॥
न्हाणें नव्हतें फार दिवस ॥४॥
तेणें मुरडी केसांस ॥
कां गे म्हणे उगीच बैस ॥५॥
आपुल्या हातें वेणी घाली ॥
जनी म्हणे माय झाली ॥६॥

'जनी' म्हणजे निवृत्तिज्ञानदेवांपासून तो साऱ्या संतजनापर्यंत कौतुकाचें स्थान, पांडुरंगाच्या लाडक्या 'जनी'चा अधिकार सुद्धां तितकाच थोर होता. वरील अभंगांत पांडुरंगानें प्रत्यक्ष येऊन जनाबाईचे केंस विंचरले, तिला आंघोळ घातली वगैरे सर्व प्रकार झूट आहेत असें म्हणणें म्हणजे जनाबाईवर आत्मवंचनेचा आरोप करून स्वतःचें अज्ञान प्रदर्शित करणेंच होय. श्री. बाळाराम धुरंधर ह्यांनी लिहिलेल्या श्री. तुकाराम महाराजांच्या चरित्रांत श्री. धुरंधरांचें चरित्र जोडलें आहे. त्यांत लेखक म्हणतात कीं, 'जनाबाईच्या अभंगांतील वर्णन केवळ कविकल्पनात्मक नाहीं. त्याचप्रमाणें हें भक्तिबळ केवळ गतकालीन संतांच्याच अंगीं होतें असेंही नाहीं, तर हल्ली देखील त्याची प्रचीति येते, या गोष्टीची साक्ष त्यांचे (चरित्रविषयक धुरंधरांच्या) मनास पटली.' ह्याच चरित्रांत कै. बाळाराम धुरंधर ह्यांनीं आपला आत्मानुभव दिलेला आहे तो सुद्धा येथें अभ्यासू वाचकांच्या माहिती करितां देणें जरूर आहे. हा आपला अनुभव सांगतांना धुरंधर म्हणतात, 'कीर्तन बहुतेक आटपत आलें होतें व लवकरच आपण 'श्रीज्ञानेश्वर माउली ×××××' अशी जोरानें ××××× हांक मारली. मीही 'ज्ञानेश्वर माउली ×××××' असें तोंडानें म्हणत होतों. तोंच अति तरुण, सुंदर, गौर वर्णाचे, अंगांत लाल झगा घातलेले, श्रीज्ञानेश्वर महाराज येऊन ××××× मला त्यांनीं दोन्हीं हातांनीं घट्ट धरून दृढ अलिंगन दिलें. ×××× त्यांचा उजवा गाल माझ्या डाव्या गालाला लागून त्यांची मान माझ्या खांद्यावर होती.' धुरंधरांच्या आत्मानुभवाचे असे अनेक प्रसंग त्याच्या चरित्रांत दिलेले आहेत. चिकित्सकांची ह्यांवर श्रद्धा बसणार नाहीं पण श्रद्धाळू भक्तांच्या भक्तीला पोषक असेच हे अनुभव आहेत. आत्मानुभवाच्या शास्त्राचा ज्याचा अभ्यास असेल त्याला हे अनुभव शक्य आणि स्वभाविक वाटतील. श्रद्धाळू भक्तांना ह्यांत असंभाव्य असें कांहींच वाटणार नाहीं. वर दिलेले जनाबाईचे अनुभव हें ६०० वर्षां पूर्वीचे अनुभव असले तरी परमेश्वराची सर्वज्ञता व सर्वसाक्षित्व हीं अनंत आणि अनुस्यूत आहेत. आतां कै. धुरंधरांच्या प्रमाणें अगदीं अलीकडचे असे कांहीं इतर भक्तांचे अनुभव घेऊं. त्यांपैकीं पहिला, माझे मित्र ह. भ. प. श्री. दादासाहेब सबनीस, एक सुप्रसिद्ध श्रीज्ञानेश्वरभक्त ह्यांनीं मला सांगितलेला होय. श्री. सबनीस ह्यांच्या गुरुंनीं समाधी घेतल्यानंतर त्यांच्या जीवनांत अकस्मात् एक पोकळी पडल्यासारखें त्यांना झालें. अशा उदास मनःस्थितींत ते शिर्डीस गेले. शिर्डीस जाऊन द्वारकामाईंत बसून ज्ञानेश्वरी वाचण्याचा त्यांनीं संकल्प केला. ज्ञानेश्वरी वाचण्यापूर्वी त्यांनीं श्री साईबाबांची अशी प्रार्थना केली केली कीं, बाबा! मी ज्ञानेश्वरी वाचणार आहें पण तुम्हीं ती ऐकतां कीं नाहीं, हें मला कसें कळणार! त्याचप्रमाणें

श्री साईंबाबांच्या निकट सान्निध्यांत असलेल्या भक्तांचें दर्शन व्हावें अशी सुद्धां त्यांनी इच्छा केली. त्यांच्या श्री ज्ञानेश्वरीच्या पारायणच्या वेळीं डोकीस शुभ्र रुमाल बांधलेली अशी एक तेजस्वी व्यक्ति त्यांचें पारायण ऐकून गेली. त्या व्यक्तीची माहिती गांवांतील तेथें हजर असलेल्या माणसांस नव्हती. तसेंच भक्त अबदुल्ला आणि श्रीमति लक्ष्मीबाई शिंदे ह्या सुद्धां तेथें त्यांना भेटून त्यांच्या इच्छा पूर्ण झाल्या. जया मनीं जैसा भाव। तया तैसा अनुभव॥ ह्या कव्युक्तीचें हें एक मजेदार उदाहरण होय. आत्मानुभवाचा एक विशिष्ट मासला म्हणून श्रीसाईबाबांच्या समाधीच्या वेळीं तीन भक्तांना निरनिराळे झालेले दृष्टांत खरोखरच रोमहर्षक आहेत. इकडे शिर्डीस साईबाबांनीं समाधि घेतली त्या वेळींच तिकडे पंढरपुरांत ह्या गोष्टीचा ह. भ. प. दासगणूंना स्वप्नांत साक्षात्कार झाला. संत्ताक्रुझ येथील रहिवासी सुप्रसिद्ध भक्त कै. ॲडव्होकेट, श्री. बाळाराम धुरंधर ह्यांचा दम्याचा विकार श्रीबाबांच्या चिलमीच्या झुरक्यानें थांबला हें कथानक श्रीसाई सच्चरितांत दिलेलेंच आहे. पण बाबांच्या समाधीच्या वेळीं त्यांचा दम्याचा विकार एकाएकीं पुन्हा उद्भवला आणि त्याचवेळीं त्यांना श्रीसाईंच्या समाधीचें वृत्त कळलें. ह्या बाबतींत तिसरा अनुभव माझे बाळमित्र व श्रीसाई–संस्थानचे आद्यविश्वस्त श्री. वसंतराव नारायण गोरक्षकर ह्यांचें होय. श्रीसाईबाबांनीं ज्यावेळीं समाधी घेतली त्यावेळीं श्री. वसंतराव हे पूजेस बसले असतां देव्हाऱ्यांत असलेली श्रीसाईबाबांची रुप्याची मूर्ति काळी-ठिक्कर पडली होती. पूजा आटोपून ह्या घटनेचा विचार करण्यांतच त्यांच्या घरांतील मंडळीचा दिवस गेला. दुसऱ्या दिवशीं त्यांना श्रीसाईसमर्थांच्या समाधीचें वृत्त कळलें!

२० व्या शतकांतील सुप्रसिद्ध अमेरिकन तत्त्ववेत्ता विलियम जेम्स, ह्यानें ह्या विषयांवर बराच अभ्यास करून 'व्हेरायटीज ऑफ रिलिजस एक्सपिरियन्स' म्हणून एक ग्रंथ लिहिलेला आहे. ह्या ग्रंथांत त्यांनी भक्तांच्या विविध अनुभवांचा तौलनिक व सांगोपांग विचार केला आहे. ग्रंथकार स्वतः भक्त नसून केवळ एक संशोधक आहे. Pragmatism ह्या तत्त्वज्ञानाचा हा प्रणेता आहे. प्रारंभीं हा मानसशास्त्रांचा प्राध्यापक होता. नंतर त्यांनीं भक्तांच्या धार्मिक अनुभवांचा सूक्ष्म अभ्यास करून त्यावर निश्चित व निर्णयात्मक असे कांहीं सिद्धांत मांडून ह्या आत्मानुभवाच्या शास्त्राची सिद्धता केली आहे. ह्या सिद्धांताच्याद्वारें त्यांनीं 'चक्षुर्वैसत्यं' वृत्तीच्या लोकांचीं तोंडें बंद केलीं आहेत. त्याचा निष्कर्ष मी थोडक्यांत मांडणार आहे. त्याचा पहिला सिद्धांत असा आहे कीं, व्यक्त जग हें एका पवित्र अशा अव्यक्त जगाचा भाग आहे. त्या आध्यात्मिक अव्यक्ताबरोबर व्यक्त जगाचा दुवा सांधणें हें जीवनांतील अंतिम कार्य होय. प्रार्थना किंवा भक्तीच्या द्वारें आत्मानुभवाच्या प्रसादानें अव्यक्त घटना आणि व्यक्त घटना ह्यांच्या संगमामुळें एक शक्ति निर्माण होऊन भक्तांच्या अनुभवांत अघटित अशा घटना घडून येत असतात.

आर्त, साधक आणि आत्मानुभवी भक्तांना तो 'द्विज' Twice born असें मानतो. ज्यांना असे अनुभव सर्वथा अपरिचित आहेत त्यांना तो स्थूलबुद्धि म्हणून मानतो. श्वेताश्वतरोपनिषदांतील आठवा मंत्र, विलियम जेम्स ह्यांच्या 'व्हरायटीज ऑफ रिलिजस एक्सपिरियन्सिस' ह्या प्रबंधांतील निर्णयात्मक सिद्धातांना सर्वस्वी पोषक असाच आहे. तो मंत्र असाः—

संयुक्त मेतत्क्षरमक्षरं च—
व्यक्ताव्यक्तं भरते विश्वमीशः।
अनीशश्चात्मा बध्यते भोक्तृ भावा—
ज्ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः ॥८॥

'क्षर आणि अक्षर, व्यक्त आणि अव्यक्त अशा प्रकारें संयुक्त असें हें विश्व ईश्वर संभाळतो. ईश्वराविरहित मी आहें व मी भोक्ता आहे असें जो समजला तो बद्ध झाला. देवाचें ज्ञान झाल्यावर सर्व पाशांपासून तो मुक्त होतो.'

ह्या वरील विवेचनावरून भक्तांचे अनुभव हे आत्मप्रवण असल्यामुळें सर्वस्वी श्रेयस असेच असतात. म्हणून भक्तांनी अगदीं मोकळेपणे व निःसंकोच वृत्तीनें आपले अनुभव प्रसिद्ध करणें हें कार्य भक्तीला व श्रद्धेला वृद्धिंगत करणारे आहे. लोकलज्जेच्या भीतींतच भक्तीची माती होते. लज्जेच्या परिसमाप्तींतच खऱ्या भक्तीची उत्पत्ति व वाढ होते. हें सर्व ध्यानांत ठेवलें कीं आत्मानुभवाचें महत्त्व मनावर पटतें. श्रीसाईमहाराजांची शिकवण देखील हीच आहे. म्हणून श्रीसाई संस्थानच्या चालकांनीं श्रीसाईभक्तांचे मिळतील तेवढे अनुभव एकत्र करून प्रसिद्ध करणें हें श्रीसाईसंप्रदायाच्या दृष्टीनें सर्वस्वी इष्ट आहे.



- पाप आणि पारा कुणींच पचवूं शकत नाहीं. चोरूनही पारा खाल्ला तरी कधीं न कधीं तरी अंगांतून फुटून बाहेर पडेलच. पाप केल्यास कोणत्या ना कोणत्या दिवशीं फळ हें भोगावें लागणारच!

# श्री दासगणूमहाराज

# व्यक्ति आणि वाङ्मय

'व्यक्ति व वाङ्मय' हें पुस्तक लिहून आयुर्विद्यापारंगत श्री. अनंतराव आठवले यांनीं संत-वाङ्मयविषयक व चारित्र विषयक ग्रंथांत एका उत्कृष्ट ग्रंथाची भर घातली आहे यांत शंका नाहीं व त्याबद्दल त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करणें अवश्य आहे.

**तेंहि प्राणापरौतें।**
**आवडती हें निरुतें।**
**जे भक्तचरित्रातें।**
**प्रशंसती॥**

ज्ञा. अ. १२–२२७

['आधुनिक महिपति' म्हणून उभा महाराष्ट्र ज्यांना ओळखतो त्या श्रीदासगणू–महाराजांच्या चरित्राची व वाङ्मयाची ओळख करून देणारें पावणेसहाशें पानांचें 'संतकवि श्रीदासगणूमहाराज–व्यक्ति व वाङ्मय' हें पुस्तक लिहून आयुर्विद्यापारंगत श्री. अनंतराव आठवले यांनीं संतवाङ्मयविषयक व चरित्रविषयक ग्रंथांत एका उत्कृष्ट ग्रंथाची भर घातली आहे यांत शंका नाहीं व त्याबद्दल त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करणें अवश्य आहे.]

गणित, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान इत्यादि शास्त्रीय विषयांवर स्वतंत्र ग्रंथ लिहिण्यापेक्षां एका दृष्टीनें चरित्र—मग तें 'आत्मचरित्र असो अथवा दुसऱ्याचें असो' लिहिणें सोपें वाटतें हें खरें आहे. पण त्यालासुद्धां एका विशिष्ट प्रकारच्या मनोरचनेची व साहित्याची गरज असल्यानें चरित्र लिहिणें हें सुद्धां नाजुक व अवघड असें काम आहे.

ज्या थोर पुरुषांचीं चरित्रें लिहिलीं जातात त्यांमध्यें आपली माहिती स्वतःच देणारे फारच थोडे असतात. जे कांहीं थोडे माहिती देतात ते आपल्या आयुष्यांतील कांहीं घटनांचा प्रसंगोपात्त कोठेंतरी उल्लेख करतात. पण त्यांनीं अशा सांगितलेल्या फुटकळ माहितीबद्दल त्या घटना कां, कशा, कोठें व केव्हां घडल्या ह्यांचा विचार करून एक सुसंगत अशी गोष्ट तयार करून एक संपूर्ण जीवनचरित्र तयार करणें हें एक अवघड काम होऊन बसतें. कारण, जे फार मोठे लेखक आहेत त्यांना जगाला जो संदेश द्यावयाचा असतो त्यांतच ते इतके विरून गेलेले असतात कीं त्यांना आपल्या स्वतःच्या वागणुकींतील सुसंगता दाखविण्यास फुरसतच नसते. ज्या अतिशय मोठ्या व्यक्ति आहेत त्यांच्यांत तर ती दाखववावी अशी वृत्तीच नसते, ह्यामुळें त्यांच्या जवळ बरींच वर्षें राहणारा चरित्रलेखक लाभला तरच त्यांचें चरित्र जगाच्या पुढें सुसंगतपणें येण्याचा संभव असतो.

— लेखक —

## प्राचार्य शं. वा. दांडेकर

श्री. आठवले यांनीं चरित्रविषयक ग्रंथास आवश्यक असणारी सर्व सामग्री कसोशीनें गोळा केली आहे व तिची निवड करून वाचकांच्या समोर हें भक्तिरसानें भरलेलें ताट ठेवलें आहे. वाचकवर्ग याचा आस्वाद घेऊन ' अन्नदाता ' सुखी होवो आणि त्याच्याकडून अशीच श्रीपांडुरंगाची सेवा घडो असा आशीर्वाद देईल अशी माझी खात्री आहे.

पण खरें सांगावयाचें तर नुसता मोठ्या लोकांच्या जवळ बरींच वर्षें राहणारा असा नुसता मनुष्य मिळूनहि खरें चरित्र जगास मिळेलच असें नाहीं. कारण, थोर पुरुषाच्या जवळ राहणाऱ्या सर्वांनाच त्याच्या थोरवीची खरी किंमत कशांत आहे हें ठाऊक असतेंच असें नाहीं. उदाहरणार्थ म्हणून मी पुढील गोष्ट सांगतों. त्या योगानें माझ्या वरील म्हणण्याचा अभिप्राय वाचकांच्या लक्षांत येईलः—

माझे गुरुजी कै. जोग महाराज ह्यांना पीनस होता, त्यामुळें ते तपकीर ओढत असत. ते वैकुंठवासी झाल्यानंतर एका त्यांच्या भक्ताची व माझी गांठ पडली व त्यांनीं माझ्यापुढें ओढण्याकरितां तपकिरीची डबी केली. त्यावर मीं सांगितलें. ' मी तपकीर ओढत नाहीं.' तेव्हां तो मनुष्य माझ्याकडे आश्चर्यानें बघूं लागला, व मला म्हणाला, " काय, तुम्ही जोगमहाराजांचे शिष्य आणि तपकीर ओढत नाहीं ? " वाचकांच्या लक्षांत आलें असेल कीं मला भेटलेल्या या भक्ताच्या दृष्टीनें जोगमहाराजांच्या जीवनांत ज्ञानेश्वरी, अनुभवामृत ह्यांना जितकें स्थान तितकेंच तपकीर ओढण्यासहि असावें. ह्याचा अर्थ असा कीं मोठ्या मनुष्याच्या जवळ राहूनसुद्धां मोठ्या मनुष्याचा मोठेपणा कशांत आहे हें सर्वांनाच कळतें असें नाहीं. म्हणून तुकारामबुवांनींसुद्धां उपरोधयुक्त विनोदानें म्हटलें आहे कीं " संत संगतीं न करावा वास। एखादा गुणदोष येईल अंगा ॥ "

थोर पुरुषाचें चरित्रलेखक होण्यास त्यांच्याजवळ राहण्याचें भाग्य लागतें, एवढेंच नव्हे तर त्यांची योग्यता जाणण्याची चरित्रलेखकाच्या अंगीं पात्रताहि लागते हें खरें. पण एवढ्यानेंहि काम भागत नाहीं. आणखी दोन तीन गुणांची ह्या गोष्टीस जोड लागते. त्यांतील पहिला गुण असा कीं जवळ राहणाऱ्या मनुष्यास ह्यांचें चरित्र आपणांस कळावें अशी तळमळ लागते. तसेंच तें आपण लोकांस सांगावें अशी इच्छा लागते. ह्यांच्या अभावीं तो जवळ असून व अंगीं जाणण्याची पात्रता असूनसुद्धां व त्या थोर

पुरुषाच्या आयुष्यांतील घटना, त्यांच्या डोळ्यादेखत घडत असूनसुद्धां तो त्यासंबंधीं स्वतः विचार करणार नाहीं अथवा त्या थोर पुरुषांसहि विचारणार नाहीं. मग त्या आठवणींत ठेवून, लिहून काढून लोकांच्या समोर मांडायची गोष्ट विचारावयास नको.

चरित्रलेखकांत वरील प्रकारची तळमळ व इच्छा असूनहि भागत नाहीं. त्याची वृत्ति साक्षेपी लागते. कारण थोर पुरुषांच्या चरित्रांतील नमूद करण्यासारख्या घटना ज्या स्थळीं व ज्या कालीं घडत राहतील त्या स्थळीं व त्या कालीं सर्वच प्रसंगीं लेखक जातीनें हजर राहूं शकेलच असें नाहीं. उदाहरणार्थ, थोर पुरुषांचा जन्मकाल अथवा लहानपण ह्याविषयींची माहिती चरित्रलेखकास सामान्यतः दुसऱ्याकडूनच गोळा करावी लागते. चरित्र–नायकापेक्षां वयानें मोठे व नात्यानें जवळचे असे चरित्र-लेखक मिळणें अत्यंत दुर्लभ आहे, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. चरित्र-नायक प्रसिद्धीला येण्याच्या पूर्वींच्या लहानसहान गोष्टींची दखल कोण ठेवणार? कारण, त्यांची गरज तरी कशी भासलेली असणार? यामुळें चरित्र–लेखकांस त्या थोर पुरुषांचा ज्यांच्याशीं संबंध आला त्यांच्या त्यांच्या गांठी घेऊन माहिती मिळविणें आवश्यक असतें. पण हें काम अत्यंत अवघड असें आहे. कारण अशीं माहिती देणारीं माणसें मिळणें जरूर आहे. मिळाल्यास, त्यांना मागच्या गोष्टींची स्मृति असणें कठीण. स्मृति असूनसुद्धां त्यांत आत्मश्लाघा न येतां जशी घटना घडली असेल तसें सांगण्याचें सत्यावरील प्रेम त्यांच्यांत असणें जरूर आहे. यामुळें हें काम फारच अवघड होऊन बसतें.

तात्पर्य (१) चरित्रलेखकाला चरित्र-नायकाचा बहुतकाल सहवास घडण्याचें सुभाग्य असणें, (२) त्याला चरित्र-नायकाची योग्यता कळण्याची पात्रता असणें, (३) चरित्र कळावें अशी तळमळ असणें, (४) तें लोकांना सांगण्याची इच्छा असणें, (५) व इतरांकडून माहिती गोळा करण्याकरितां करावे लागणारे कष्ट सहन करण्याचें अंगीं धैर्य व उत्साह असणें–ह्या गोष्टी चरित्र-लेखकाकडून उत्कृष्ट चरित्रलेखन होण्यास आवश्यक असतात.

जगांतील उत्कृष्ट चरित्रग्रंथांमध्यें आंग्ल–साहित्यिक डॉ. जॉन्सन् ह्यांचे बॉस्वेलनें लिहिलेलें चरित्र मोडतें. त्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत बॉस्वेलनें आपलें एतद्विषयक भाग्य वर्णन करितांना पुढील प्रमाणें उद्गार काढले आहेत. 'As I had the honour and happiness of enjoying his friendship for upwards of twenty years; as I had the scheme of writing his life constantly in view; as he was well apprised of this circumstance, and from time to obligingly satisfied my inquiries, by communicating to me the incidents of his early years; as I acquired a facility in recollecting, and

was very assiduous in recording, his conversation of which the extraordinary vigour and vivacity constituted one of the first features of his character, and as I have spared no pains in obtaining materials concerning him, from every quarter where I could discover that they were to be found, and have been favoured with the most liberal communications by his friends; I flatter myself that few biographers have entered upon such a work as this with more advantages; independent of literary abilities, in which I am not vain enough to compare myself with some great names who have gone befor me in this kind of writing.'

श्रीदासगणूमहाराजांचे चरित्रलेखक वैद्य श्री. अनंतराव आठवले यांच्या ठिकाणीं हे सर्व सुयोग जुळून आलेले दिसतात.

( १ ) त्यांना अगदीं जन्मापासून तों या क्षणापर्यंत संत श्रीदासगणूमहाराज यांच्या सहवासांत राहण्याचें सौभाग्य प्राप्त झालें आहे. श्रीयुत अनंतराव हे श्रीदासगणूमहाराजांच्या मानसपुत्राचे पुत्र असल्यानें त्यांच्या कुटुंबियांपैकींच एक आहेत. ( २ ) श्री. अनंतरावांच्या मनांत बरींच वर्षें चरित्र लिहावें असें वाटत होतें व त्या दृष्टीनें त्यांची तयारी बरींच वर्षें चालली होती. ( ३ ) श्रीयुत अनंतराव हे आयुर्विद्यापारंगत आहेत. त्यांचा संस्कृतचा अभ्यास उत्तम आहे. ते उत्तम कीर्तन करतात. स्वतः आख्यानें रचतात व काव्य करतात. ह्यामुळें श्रीदासगणूमहाराजांच्या चरित्रांतील गोष्टी व काव्यांतील मर्म समजण्याची त्यांच्या ठिकाणीं पात्रता आहे. ( ४ ) त्याचप्रमाणें श्रीदासगणूमहाराज यांच्या संबंधित जीं माणसें त्यांच्या गांठी श्री. अनंतराव हे घेऊं शकले व त्या मंडळींनींहि मोठ्या प्रेमानें व आदरानें पुसलेली माहिती पुरवली. ( ५ ) व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांपैकीं कांहीं मंडळी लिखाणाचा खरेखोटेपणा सांगण्यास आज हयात आहेत.

श्रीदासगणूमहाराज यांच्या चरित्रांत असा कांहीं भाग आहे कीं त्या ठिकाणीं या जिवंत माणसांच्या शब्दावरून गोष्ट बरी वाईट ठरणारी आहे. उदाहरणार्थ, श्रीदासगणू हे 'दासगणू' होण्यापूर्वी व कवित्व करूं लागल्यानंतरहि कांहीं वर्षे तमाशे करीत, करवीत, लावण्या तयार करीत व म्हणवीत. अर्थातच तमाशांत डफ वाजवणारे साजिंदे, नाचणाऱ्या गाणाऱ्या बाया यांच्याशीं त्यांचा नित्याचा संबंध असावयाचा व असा संबंध असल्यानें सामान्य मनुष्यानें जर अशी कल्पना केली कीं पूर्व आयुष्यांत दासगणूमहाराज यांना कांहीं दोष लागला असावा तर ती कल्पना अगदींच अवास्तव ठरणार नाहीं. पण वस्तुस्थिति अगदीं उलट होती.

दासगणू हे 'पद्मपत्रमिवांभासि' असे शुद्ध राहिले व यास साक्ष—त्यावेळचे त्यांचे अनेक मोठ्या अधिकाराच्या जागेवर असणारे स्नेहीसोबती त्याचा शुचिपणा अथवा पावित्र्यरक्षण सांगण्यास आज हयात आहेत.

इतका गोष्टींचा मेळ होणें हा सुयोग या चरित्राच्या बाबतींत जुळून आल्यानें हें चरित्र सर्वांगसुंदर झालें आहे असें वेगळें सांगण्याची गरज नाहीं.

माझा व श्रीदासगणू यांचा स्नेहसंबंध गेल्या चाळीस वर्षांचा आहे व तो आजहि वाढता आहे. सन १९११।१२ च्या सुमारास श्री. बाळासाहेब ढमढेरे मामलेदार पंढरपुरांत प्लेग असल्यामुळें गांवाबाहेर असतांना दासगणूमहाराजांच्या कीर्तनाचा वरचेवर थाट चालायचा व प्लेगच्या दिवसातसुद्धां हजारोंनीं श्रोते जमा व्हावयाचे. त्यावेळीं श्री. अनंतराव यांच्या वडिलांनीं गायिलेलें 'पाटिल झाला पिसा। दिसतो वैदु जसा' हें पद, तसेंच त्यावेळचें बोधलेबोवांचें दासगणूमहाराजांचें आख्यान कानांत आजहि गुणगुणत आहेत. परवांपरवांपर्यंत सवड साधेल तेव्हां श्रीदासगणूंच्या कीर्तनास मी जात असें व अजूनहि अशी प्रथा चालू आहे, कीं पंढरपुरीं अगर पुण्यांत त्यांना भेटावयास गेलों म्हणजे श्री. छगनसारख्याकडून त्यांचें एक आख्यान ऐकल्यावांचून परत यावयाचेंच नाहीं.

चरित्र लिहिणें हें एका दृष्टीनें सोपें पण दुसऱ्या दृष्टीनें नाजुक व अवघड असें काम आहे. कारण, दुसऱ्याचें चरित्र कळण्यास त्याच्याशीं समरस होण्याची पात्रता अंगीं लागते. एरवीं त्याच्या वागणुकीची आपणांस कल्पना येणार नाहीं. आपण त्या जातीचें व्हावें तेव्हां त्यांचें महिमान कळतें हें खरें आहे. व्यवहार करणाऱ्या माणसाचें चरित्र कळणें सोपें आहे. कारण आपण व्यवहारी असतों व आपल्या वृत्ति आपणांस ठाऊक असतात. आपण त्यावरून व्यवहारी मनुष्याच्या वृत्तीची कल्पना करूं शकतों. पण व्यावहारिक लाभ दिसत असतांना पारमार्थिक अदृश्य लाभाकरितां चालून आलेला लाभ टाकणारा दिसला कीं व्यवहारी मनुष्यास त्याची उपपत्ति लावणें कठिण जातें. तो त्याला वेड्यांत तरी काढतो अथवा ती गोष्ट जुनी असली तर कपोलकल्पित तरी ठरवतो. घरांत खायला नाहीं, पोरेंबाळें, बायको अन्नविना रडत आहेत अशा स्थितींत तत्त्वपरिपालन म्हणून पायां पडून आलेलें मोहरांचें ताट लाथाडणाऱ्या तुकारामबोवांची, कवडी सकाळच्या प्रहरीं दिसली कीं कपाळाला लावणारा जो द्रव्यलोभी, त्याला कशी कल्पना येणार? त्यानें ही कथा ऐकली कीं तो म्हणणार, 'अहो हीं कथेकरी कवि यांनीं रचलेलीं आख्यानें! असें कोठें घडतें आहे?' आतां हा तुकारामबोवांचें चरित्र काय जाणणार व कसें लिहिणार? तात्पर्य, संतांचें महिमान कळण्यास संतांची ईश्वरनिष्ठा, तपश्चर्या, जिव्हाळ्याची भक्ति, त्याग, प्राणिमात्रांविषयींचें प्रेम व त्यांच्या कल्याणाची काळजी इत्यादि गुण अंगीं लागतात. तरच संतांचें महिमान खरें कळेल. तुकारामबोवांनीं म्हटलें आहे:—

'भक्तांचा महिमा भक्तचि जाणती।
दुर्लभ या गती आणिकांसी॥

तुका म्हणे अंगें व्हावें तें आपण ।
तरीच महिमान येईल कळों ॥ १ ॥'

श्रीदासगणू यांच्या ठिकाणीं ईश्वरनिष्ठा, जिव्हाळ्याची भक्ति वगैरे गुण असल्यानें व त्यांच्यावर श्रीसाईमहाराज व श्रीवामनशास्त्री इस्लामपूरकर या साधूंची कृपा झाल्यानें त्यांना हीं संतचरित्रें गाणें सहज झालें व त्यांना गोडी आली.

या संतचरित्राच्या बाबतींत त्यांचें कार्य व प्रसिद्ध कै. ह. भ. प. लक्ष्मणरावजी पांगारकर व नुकतेच कैलासवासी झालेले श्री. आजगांवकर या संतचरित्रलेखकद्वयांच्या कार्यांची तुलना करण्यासारखी आहे. कै. पांगारकर व कै. आजगांवकर आपआपल्या परीनें थोरच आहेत. व संतचारित्रांच्या बाबतींत त्यांचें कार्यहि मोठें आहे. पण संतचरित्रें सुशिक्षित—अशिक्षित सर्वांस आवडतील अशीं करणें हें कार्य श्रीदासगणूंनीं जितक्या प्रमाणावर केलें इतकें या दोघांना करतां आलें नाहीं, हें कोणीहि सांगेल. कारण श्रीदासगणूंनीं संतचरित्रें रचलीं व गायलीं व इतर लेखकांनीं लिहिलीं. कै. तात्यासाहेब केळकर यांनीं म्हटल्याप्रमाणें श्रीदासगणु यांनीं शक्य तितकी माहिती मिळवून ती गायलीं असल्यामुळे 'सोन्यास सुगंध' यावा तसा प्रसंग घडून आला आहे. श्रीदासगणूंनीं संतचरित्रे उत्कृष्ट अशा काव्यांत गुंफलीं, स्वतः आख्यानरूपानें कथेंत वर्णिलीं, यामुळे तीं जिवंत अथवा चैतन्ययुक्त झालीं व तीं श्रोत्यांच्या हृदयाचा ठाव एकदम गाठूं शकलीं. श्रीदासगणूंच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या, दामुबोवा राग आळवूं लागले कीं श्रोतेहि भक्तिरसांत बुडून जात. यामुळें त्यांच्या काव्याचा वेगळा परिणाम होई व म्हणूनच त्यांना संतांच्या चरित्राचा मोठा प्रसार करतां आला.

तात्पर्य, श्रीदासगणूमहाराजांनीं जुन्यानव्या सर्व संतांचीं चरित्रें प्रसादयुक्त गायिलीं व जुन्या संतचरित्रांचें आयुष्य वाढविलें. अर्वाचीन संतांचीं चरित्रें तर या आधुनिक महिपतीच्या इतकीं माहितीपूर्वक व प्रसादपूर्ण भाषेंत वर्णन केलेलीं दुसरीकडे आढळणारच नाहींत असें म्हटलें तरी चालेल.

श्रीदासगणू हे जसे कवि म्हणून प्रसिद्ध आहेत. तसे ते कीर्तनकार म्हणूनही प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कीर्तनास हजारोंनीं श्रोतृवृंद उपस्थित असतो व त्यांत पंडित, ज्ञानी, शेतकरी, सुशिक्षित, अशिक्षित, सुधारक, सनातनी, मोठीं माणसें, मुलें, बायापुरुष सर्व प्रकारचे लोक असतात. श्रीदासगणूंचें कीर्तन म्हणजे ज्याच्यांत गहन वेदान्तविषयक पूर्वपक्ष उत्तरपक्ष आहेत, संस्कृतांतील श्रुतिस्मृति, आचार्यांचे ग्रंथ यांच्यांतील पंक्तीच्या पंक्ति श्रोत्यांसमोर ओतल्या जात आहेत, दोन दोन तीन—तीन आख्यानें एकदम लावताहेत, असें विद्वत्तापूर्ण ज्याला म्हणतां येईल असें कीर्तन नव्हे. बरें ते स्वतः मोठे पट्टीचे गवई आहेत व नानाप्रकारचे राग छेडताहेत असेंहि नव्हे. अशा स्थितींत त्यांच्या कीर्तनास हजारोंनीं श्रोते ओढले जातात, ही वेध लावण्याची जी त्यांत शक्ति आहे तिची मीमांसा लेखकाच्या मतें थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहे.

श्रीदासगणूंचें कीर्तन हें हरिदासी कथा अथवा भजनीनिरूपण याहून थोडें वेगळ्या स्वरूपाचें आहे. भजनीनिरूपणांत पूर्वरंग–उत्तररंग नसतो. श्रीदासगणूंच्या कीर्तनांत पूर्वरंग उत्तररंग असतो व या बाबतींत त्यांच्या कीर्तनाचा थाट हरिदासी-कथेसारखा आहे. पण पुरा 'हरिदास' ही नाहीं. कारण श्रीदासगणू हे स्वतः कवि असल्यानें व आख्यानें रचण्याची त्यांना आवड असल्यानें कीर्तनांत ते स्वतःचेंच कवित्व उपयोगांत आणतात. क्वचितच इतर कवींच्या ओव्या, आर्या अगर दिंड्या घेतात. त्यांच्या कीर्तनाचें लोकांना वेड लागतें याचे मर्म, प्रसादयुक्त पण अगदीं आधुनिक भाषेंत ते आपले विचार मांडतात व ते गेयस्वरूपाचे असल्यानें गातात, यांत आहे. अलिकडे साहित्यसंमेलनांतून कवीनें आपली कविता स्वतः गाण्याचा एक कार्यक्रम असतो. त्या कार्यक्रमास किती गर्दी लोटते हें ज्यानें पाहिलें असेल त्याला वरती लिहिलेली गोष्ट चटकन् पटेल.

श्रीदासगणू यांचीं कीर्तनें हजारों श्रोत्यांना आपलें वेड लावतात याचें वर सांगितलेलें हें एक प्रमुख कारण आहे. पण त्यास तशींच दुसरींहि महत्त्वाचीं कारणें आहेत. त्यांच्या कीर्तनांत कटाव, दिंड्या, श्लोक वगैरे जुन्या कीर्तनकारांच्या चालीतीलच कवनें पुष्कळशीं असतात. पण त्यांच्या कीर्तनाचा मुख्य गुण म्हणजे इतर कथांतून क्वचित् आढळून येणारा असा 'साधेपणा' त्यांच्या कीर्तनांत आढळून येतो. त्यांचे कीर्तन म्हणजे 'एकांकीं नाटक' होत नाहीं. तें दंभ टाकून तळमळीनें केलेली देवाची प्रार्थना अथवा जगास तळमळीनें केलेला उपदेश अशा स्वरूपाचें असतें. त्यांत कृत्रिमतेचा लेश नसतो. कीर्तनांत जरी पूर्वरंग असला तरी तो वर म्हटल्याप्रमाणें क्वचितच घटप्राभाव प्रध्वंसाभाव वगैरे सारख्या विवादविषयक तत्त्वांचा असतो. पंडित्य दाखवण्याचें कीर्तन तें नव्हेच, त्यांच्या कीर्तनांतून नीति, धर्म, सदाचार यांचाच प्रामुख्यानें उपदेश ते करीत असल्यानें तशाच जातीचा साधा पूर्वरंग असतो व हें करीत असतांना साधी सरळ भाषा व आंतबाहेर कांहीं न ठेवतां सत्यकथन केलेलें असतें. त्यांत पुष्कळ वेळेला सामाजिक दोषाची निर्भिडपणें चिरफाड, दंभस्फोट असतो; मग तो सनातन्यांतील दंभाचा असो वा सुधारकांच्या दंभाचा असो. श्रीदासगणू यांना खोट्याची चीड किती होती व तें उघडकीस आणण्यांत आपणांस व्यक्तिशः कितीहि त्रास झाला तरी तो सहन करण्याची त्यांची कशी तयारी असते याचीं उदाहरणें त्यांच्या चरित्रांत कितीतरी सांपडतील. येथें पुस्तकांतील 'दंभस्फोट' या प्रकरणांतील ठळक उदाहरणांकडे बोट करतां येईल. फार महत्त्वाची व म्हणून लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं हा दंभस्फोट जे परके असतील त्यांचा करावयाचा व आपले आहेत त्यांच्यावर पांघरूण घालावयाचें असा जसा कित्येक वक्त्यांचा स्वभाव असतो तसा श्रीदासगणूंचा नव्हे. आपल्या घरांतील म्हणून त्यांनीं कोणाची गय केली नाहीं.

तात्पर्य, श्रीदासगणूमहाराजांचें कीर्तन सर्वांना आवडतें याचीं कारणें अशीं आहेत

कीं त्या कीर्तनांत सर्वांना आवडणारा भोळा भाव आहे, यामुळें तें आबालवृद्ध भाविक जनांना प्रिय होतें; खोट्याचा—दंभाचा—स्फोट व सत्याचें मंडन असल्यानें चिकित्सक सुधारकांना तें प्रिय वाटतें; जुन्या संस्कृतीचा अभिमान यांत व्यक्त होत असल्यानें तें सनातन्यांना आवडतें, पण अगदींच जुन्या चाकोरीला धरून 'तातस्य कूपोयमिति ब्रुवाण: क्षारं जलं कापुरुषाः पिबन्ति' या वर्गातील तें नसल्यानें जुन्यास उद्‌बोधक नवें घेऊन पुढें जाणें अवश्य असा जुन्या नव्याचा ते समन्वय करतात म्हणून नवीन सुधारकांनाहि पसंत पडतें. निरपेक्षपणानें देवाला आळवणें व सदुपदेश करणें याच हेतूनें कीर्तन होत असल्यानें त्यांची टीकाहि बोचक वाटत नाहीं व स्वतःचें उत्कृष्ट कवित्व स्वतःच म्हणत असल्यानें रसिकांना तें प्रिय आहे. थोडक्यांत श्रीदासगणूंच्या कीर्तनाचें वर्णन करावयाचें म्हणजे श्रीएकनाथांनीं पुढील अभंगांत म्हटल्याप्रमाणें त्यांचें 'संतघराच्या मर्यादेंत' कीर्तन होतें व म्हणून सर्वांना प्रिय होतें.

"सगुणचरित्रे परम पवित्रे सादर वर्णावीं।
सज्जनवृन्दे मनोभावे आधीं वंदावीं ॥ १ ॥


संतसंगे अंतररंगे नाम बोलावे।
कीर्तनरंगीं देवासन्निध सुखेंचि डोलावें ॥२॥

भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतरां न कराव्या।
प्रेमभरें बा वैराग्याच्या युक्ति विवराव्या ॥३

जेणें करुनी मूर्ति ठसावी अंतरी श्रीहरीची।
ऐसी कीर्तनमर्यादा आहे संतांच्या घरचीं॥४

आटीव गाईचें दूध, त्यांत खडीसाखर, वर केशराची काडी व वेलदोड्याची पूड असावी म्हणजे त्या दुधास गोडी येऊन तें सर्वांनाच किती प्यावे असे वाटते अशा गोदुग्धामृताप्रमाणें श्रीदासगणू याचे

(पान ३० पहा)



● ईश्वराकडे मन कसें लागलें पाहिजे? जसें सतीचें पतीकडे, कृपणाचें धनाकडे किंवा विषयीं माणसाचें विषयाकडे असतें तसें. ईश्वरासंबंधीं ज्या वेळीं असला ओढा उत्पन्न होईल त्या वेळींच ईश्वराचा लाभ होईल.

कीर्तन मसालेदार गोड आहे व म्हणूनच ते पुनः पुनः श्रवण करावे असें सर्वांना वाटते.

रत्नांत ज्याप्रमाणें हिरे, माणिक, पाच वगैरे प्रकार असतात तसे यांच्या ग्रथांत आहे. श्री. आठवले यांनीं जें वर्गीकरण केलें आहे त्यांत पंधरा वर्ग सांगितले आहेत. त्यांत संतचरित्रें, टीकात्मक ग्रंथ, स्फुट पदें, आरत्या, अष्टकें, स्तोत्रें, पोवाडे, खंडकाव्य, सुभाषितें, कीर्तनोपयोगी आख्यानें इत्यादि प्रकारें आहेत. नुसतीं आख्यानें पुरीं ५९ व अपूर्ण ४ मिळून ६३ आहेत. ओवीबद्ध टीकाग्रंथ आठ आहेत. संतचरित्रात्मक ओवीबद्ध ग्रंथ ११ आहेत. व अजूनहि यांत ८८ व्या वर्षी भर पडतच आहे! महाराजांचे श्वासोच्छ्वासादि प्रबंध व्हावेत अशी श्रीपांडुरंगाची कृपा असल्यामुळेंच एवढी ग्रंथरचना होऊं शकली यांत शंका नाहीं.

श्रीदासगणू यांच्या काव्याची चर्चा श्री. आठवले यांनीं १८० पानांत केलेली आहे. साहित्यशास्त्राच्या कसोटीला लावून बघितलें असता त्यांच्या काव्यांत किती गुण उतरतात, हें श्री. आठवले यांनीं उत्कृष्टपणें दाखवलें आहे.

श्रीदासगणूंच्या काव्यासंबंधीं आणखी एक गोष्ट सांगणें आवश्यक वाटतें. कित्येकांना वाटतें कीं लोकगीत होण्याकरतां काव्याचा विषय शृंगारच लागतो. अध्यात्मासारख्या 'नीरस' विषयावर काव्य रचून काय उपयोग ? 'कोण वाचणार' असें कित्येक लोक म्हणतात. तसेंच कित्येक म्हणतात, 'अहो, ईश्वर, संत, त्यांचें चमत्कार हे आतां शिळे जुनाट विषय झाले. याला आतां गिऱ्हाईक नाहीं. 'डोळ्यांनीं बघतो ही ईश्वराची कृपा' अथवा 'आई थोर तुझे उपकार' इत्यादि काव्यांना आतां हल्लींच्या समाजांत

॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥
बॉम्बे सिल्व्हर शॉप
टेलिफोन ३८८६२
शुद्ध चांदीचा हरेक तऱ्हेचा माल बनविण्याचें व ऑर्डरप्रमाणें माल करून देण्याचें विश्वासलायक ठिकाण. त्याचप्रमाणें सोन्याचाही माल ऑर्डरप्रमाणें करून देण्यांत येतो. एकदां भेट देण्याची तसदी घेऊन खात्री करून घेण्याची विनंती आहे.
बा. गो. जुवेकर
मालक
गिरगांव, मांगलवाडी,
श्री धूतपापेश्वर प्रासाद, मुंबई नं. ४

॥ विमलेश्वर प्रसन्न ॥
भा. रा. रेवणकर सराफ
ठळकवाडी (बेळगांव)
सोन्या-चांदीच्या तयार दागिन्यांचे व्यापारी
आमचेकडे खडे मोत्यांचे सेटिंग्जचे आधुनिक पद्धतीचे दागिने, लफ्फे, तन्मणी, नेकलेस इअरींग्ज वगैरे तयार होतात.
बाहेरगांवच्या व्यापाऱ्यांचे ऑर्डरीकडे विशेष लक्ष दिलें जातें.


स्थान नाहीं.' या असल्या सर्व शंकांना श्रीदासगणूंच्या काव्यासंबंधीं लोकांनीं दाखवलेली रुचि ही उत्कृष्ट उत्तर आहे. जुनेच विषय पण मांडणी अशी सुंदर, भाषाहि ठसकेबाज, वर्णनें अशीं हुबेहुबे कीं श्रोत्यास वाटावें आपण नव्यानेंच हें चरित्र ऐकत आहोंत. ज्याला स्फूर्ति आहे. ज्याला प्रतिभा आहे, त्यांना जुना विषय सुद्धां चालतो. त्याला अध्यात्म आड येत नाहीं. 'शृंगाराचिया माथा' पाय ठेवीत अध्यात्म डौलानें तेथें वावरतें.

श्री. अनंतराव यांनीं या ग्रंथांत प्रथम विभागांत श्रीदासगणूंचें चरित्र २१७ पानें दिलें आहे. दुसरा विभाग वाङ्मयपरिचय यामध्यें त्यांची भूमिका देऊन त्यांच्या वेगवेगळ्या काव्यप्रकारांशीं वाचकांचा परिचय करून दिला आहे. 'एक गहूं प्रकार बहु' अशांतलाच हा प्रकार आहे. जसे गव्हाचे 'मांडे', 'घीवर', 'पुऱ्या' 'गव्हले' वगैरे प्रकार करतात, तसेंच 'भगवद्भक्ती'चे वेगवगळ्या रूपांत हे अविष्कार आहेत. सर्वच गोड आहेत पण प्रत्येकाची चव वेगळीं आहे. हा भाग २१९ व ४०८ पर्यंत दिला आहे. पुढें काव्यग्रंथांची यादी ओवीसंख्या व पंक्तिसंख्येसह दिली आहे. शेवटीं वाचकांना इतका हा दूधसागर पिण्यास सवड नसणार म्हणून कांहीं निवडक वेंचें देऊन श्रीदासगणू महाराज यांच्या व्यक्तित्वाचा आणि वाङ्मयाचा परिचय करून देण्याचें कार्य संपवलें आहे.

श्री. आठवले यांनीं चरित्रविषयक ग्रंथास आवश्यक असणारी सर्व सामग्री कसोशीनें गोळा केली आहे व तिची निवड करून वाचकांच्या समोर हें भक्तिरसानें भरलेलें ताट ठेवलें आहे. वाचकवर्ग याचा आस्वाद घेऊन 'अन्नदाता' सुखी होवो आणि त्याच्याकडून अशीच श्रीपांडुरंगाची सेवा घडो असा आशीर्वाद देईल अशी माझी खात्री आहे.

या ग्रंथाचे विषय श्रीदासगणूमहाराज यांना ८८ वें वर्ष लागलें आहे. या उतार वयांतहि ते विचारसागरासारख्या शारीरभाष्यांतील प्रक्रिया सांगणाऱ्या ग्रंथास ओव्यांचें रूप देतच आहेत. हें पाहून श्रीनामदेवरायांनीं जी श्रीरुक्मिणीरमण पांडुरंगाची प्रार्थना केली तिची आठवण होते.

'आकल्प आयुष्य व्हावें तया कुळां।
माझिया सकळा हरिच्या दासां॥'




नवसास माझी पावेल समाधी । धरा दृढ बुद्धी माझ्या ठायीं ॥

> दुसऱ्याचा धर्म कितीहि श्रेष्ठ वाटला तरी तो त्याचा धर्म असतो, तुझा नव्हे. प्रत्येक व्यक्तिचे धर्म निरनिराळे असतात. ते त्या त्या व्यक्तिच्या बेताचे असतात. माशाचा धर्म पाण्यांत रहाण्याचा. दुध फार मोलाचे म्हणून तो दुधांत राहिला तर त्याची प्रगति होणार नाहींच पण तो मरून जाईल. म्हणूनच प्रत्येक व्यक्तिनें स्वकर्म करावयाचें आणि तें करीत असतांना त्या कर्मांत चित्त ओतावयाचें म्हणजे त्याचें विकर्म होतें.

★

# साईबाबांचा कर्मयोग

★

लेखक : श्री. अ. य. धोंड

तुमच्या संस्थेचें ध्येय कोणतें ? तुमच्या नियतकालिकाचें धोरण कोणतें ? तुमच्या पक्षाची तात्त्विक भूमिका कोणती ? असें नेहमीं विचारलें जातें, तसेंच परंपरेंत अध्यात्मज्ञान हेंच खरें तत्वज्ञान असल्याची जाणीव आहे, त्यामुळें एखाद्या संताच्या-बाबतींत त्या संताचें तत्त्वज्ञान कोणतें असा प्रश्न विचारला जातो; आणि प्रत्येक संताचें वेगळें तत्त्वज्ञान असलें पाहिजे अशी अपेक्षा केली जाते. वास्तविक प्रत्येक संताचें वेगळे तत्त्वज्ञान तें काय असणार ? जनतेमध्यें धर्म जागृती करणें हें संताचें ध्येय ! आणि त्याला अनुसरून कार्य केलें जाते. ते जर या एकाच ध्येयानें अवतीर्ण होतात तर तत्त्वज्ञान वेगळें कसें असेल ? मात्र कार्यपद्धति वेगळी असल्यामुळें सबंध तत्त्वज्ञानच वेगळें आहे असा भास होतो इतकेंच.

शाळांशाळांतील शिक्षणक्रम एकच असतो. पण वेगवेगळ्या शाळांतलि वेगवेगळ्या शिक्षकांची शिकविण्याची शैली वेगवेगळी असते. कांहीं शिक्षक परीक्षा हें ध्येय दृष्टीपुढें ठेवून विद्यार्थ्यांची तयारी करून घेतात. तर कांहीं शिक्षक विद्यार्थीत माणूसकी निर्माण होण्याइतकी त्याची बुद्धि विकसित व्हावी असा प्रयत्न करतात. कांहीं पुराणिकबुवा असतात तर कांहीं शिक्षक सर्वांत मंदबुद्धी विद्यार्थ्याला समजेल अशा पद्धतीनें शिकवितात. त्याच्या बुद्धीचा विकास होत असतांच परीक्षेची तयारी होतेंच. केवळ परीक्षेची तयारी करून घेतल्यानें शिक्षणाचें ध्येय कांहीं साध्य होत नाहीं.

शिक्षकांच्या या प्रकारांप्रमाणेंच संतांचेहि प्रकार आहेत, मानवी जीविताचें साफल्य मोक्षांत आहे पण कांहीं संतांनीं

या ध्येयाकडे लोकांना फरफटत नेण्याचा प्रयत्न केला तर कांहींनीं त्यांना हाताशीं धरून एक एक पाऊल टाकण्यास शिकविलें. ज्यांनीं फरफटत नेण्याचा प्रयत्न केला त्यांनीं तेंच तत्त्वज्ञान अत्यंत गूढ भाषेंत मांडलें. पहिल्या इयत्तेंतल्या विद्यार्थ्याला एम. ए. च्या अभ्यासक्रमाचे धडे देण्यासारखें होतें तें. त्यामुळें विद्यार्थ्याला पहिली सुद्धां पास होता येत नाहीं. उलट विद्याभ्यासालाच कंटाळतो तो. या पद्धतीमुळें म्हणजे एकदम मोक्ष प्राप्त करून घेण्याच्या प्रयत्नामुळें मोक्ष बाजूलाच राहिला पण निवृत्ति आणि व्यक्तिवाद यांनीं थैमान घातलें.

"संसारांतून मुक्त हो. माता, पिता, पत्नी, पुत्र, मित्र, सगेसोयरे यांपैकीं कोणीहि तुझें नाहीं. हे सर्व या जन्मापुरते एकत्र जमलेले वाटसरू आहेत. त्याचा तुझा कांहींहि संबंध नाहीं. त्यांचा विवेकानें त्याग कर आणि तुझा तूं उद्धर करून घे" अशी कांहीं संताची घाई आहे. यांतून आम्ही जीवनाबद्दल उदासित, गलितमात्र आणि दुर्मुखलेले बनलों. आम्हाला जीवनाबद्दल गोडी नाहीं. सारें जीवन अर्थहीन आहे. असें आम्हीं नकळत मानीत आलो आहों आणि जगण्यांत आनंद आहे याची फारशी कधीं जाणीव ठेवली नाहीं. पण कांहीं झाले तरी ऐहिक सुखांत गुरफटून गेलेला, त्यांनां लालचावलेला मनुष्य त्यापासून एकदम परावृत्त व्हावा कसा हा प्रश्न आहे. हें तत्त्वज्ञान कितीहि गोंडस असो, कितीहि अर्थपूर्ण असो पण ऐहिक सुखांतील आकर्षणांपुढें तें फिकें पडतें. त्यापासून परावृत्त करणें हें पहिलें कार्य जाणून कांहीं संतांनीं मनुष्याला संसारांत ठेवूनच त्याला भक्तिमार्गाला लावण्याचा मार्ग अंमलांत आणला. श्रीकृष्णानें भगवद्गीतेंत प्रतिपादिलेला कर्मशीलतेचा तो हाच मार्ग !

श्री साईबाबांनीं गीता मार्गाचाच शेवटपर्यंत कटाक्षानें पाठपुरावा केला, संसार सोडून निव्वळ भक्तिमार्गाला लाग असा कधीं त्यांनीं प्रत्यक्ष उपदेश केला नाहीं किंवा तसा अप्रत्यक्ष प्रयत्नहि केला नाहीं. साईबाबाच्या सभोंवतीं गोळा झालेल्या व्यक्तिमध्यें श्रद्धावान व्यक्ति बऱ्याच होत्या. काकासाहेब दिक्षित, काका महाजनी, नानासाहेब चांदोरकर, अण्णासाहेब दाभोलकर, शामराव देशपांडे, म्हाळसापती, तात्या पाटील, देव मामलेदार अशा अनेक व्यक्ति होत्या. काकासाहेब दिक्षितांचा पाय लंडन शहरांत अधू झाला होता. पायाचे लंगडेपण जावें म्हणून त्यांनीं साईबाबांचे दर्शन घ्यावें अशी प्रथम शिफारस केली गेली होती. पण पायाच्या लंगडेपणापेक्षां मनाचें लंगडेपण घालविण्याची माझी तळमळ आहे असें त्यांनीं उत्तर दिलें होतें. याचा अर्थ परमार्थाचें बीज प्रथमपासूनच त्यांच्यामध्यें होतें असा होतो. बाबांच्या सहवासांत ते बीज वाढीला लागलें आणि त्याचा वृक्ष झाला; याचा दाखला सच्चरित्रांत त्यांच्या मृत्यूच्या हकिकतीमध्यें मिळतो. पण हा वृक्ष बाबांनीं त्यांना संसारांत ठेवून वाढविला हें लक्षांत घेण्यासारखें आहे. सांसारिक माणसाची पारमार्थिक प्रगति कितपत झाली आहे हें पाहूनच बाबा त्याची प्रगती साधीत असत. बांद्र्याचे रघुनाथराव तेंडुलकर व

त्यांची पत्नी हीं दोघेंहि बाबांची भक्त होतीं. रघुनाथरावांच्या सेवानिवृत्तिच्या वेळीं त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळें पेन्शन मिळावें म्हणून बाबांना विनंती केली गेली. बाबांनीं त्यांना एकशें दहा रुपये पेन्शन मिळण्याची व्यवस्था केली. पण अण्णासाहेब दाभोलकरांना मात्र चरितार्थाला पुरेल एवढें पेन्शन मिळालें नसल्यामुळें त्यांना एखादी दुसरी नोकरी मिळावी अशी बाबांकडे विनंती केल्यावर मात्र बाबा म्हणतात, 'चाकरी मिळेल रे पण त्यानें आतां माझी चाकरी करावी !' यावरून अण्णासाहेबांची पातळी उंचावली होती. ती तशीच उंचावत न्यावी असा बाबांचा हेतू दिसतो.

तात्या पाटील बाबांबरोबर १४ वर्षे झोंपत. तात्यांबद्दल बाबांच्या मनांत भारी प्रेम पण त्याचें वडिल निधन पावले, ते कुटुंबाचें कर्ते झाले, विवाहित झाले तेव्हां त्यांचें झोपण्यास येण्याचे बंद झाले. बाबांचा शब्द मानण्यास सदैव तत्पर असलेल्या या सद्भक्ताला बाबांनीं विवाहापासून परावृत्त केला नाहीं. त्याला वैवाहिक जीवनाचा पुरेपूर आस्वाद घेऊं दिला. माधवराव देशपांडे उर्फ श्यामा तर बाबांचे लाडके भक्त. श्यामा कांहीं बोलले तरी बाबा रागवत नसत. किंवा त्यांना दूर करीत नसत. श्यामाची आर्थिक परिस्थिती कांहीं समाधानकारक नव्हती. पण बाबांनीं त्यांना कधीं विशेषशी आर्थिक मदत केली नाहीं. वास्तविक बाबा रोज अनेकांना पैसे देत पण त्या यादींत श्यामाचे नांव नव्हतें. इतकेंच नव्हे तर शिंदे सरकारनीं श्यामाची गरिबी पाहून देऊं केलेली पांच हजार रक्कम स्वीकारण्यास बाबांनीं बंदी केली. खरें म्हणजे केवळ बाबांची आज्ञा नाहीं म्हणून गरिबींत वावरणारा माणूस पांच हजार रुपयांवर पाणी सोडण्यास तयार होतो यावरून त्यांची बाबांवर किती श्रद्धा होती हें सिद्ध होतें आणि त्यांतून त्यांच्या भक्तिची पातळी अनुभवास येते. पण एवढ्या या थोर भक्तासहि बाबांनीं संसारांतून उठविलें नाहीं. या लोकांना संन्यास धर्माची दीक्षा देणें सुलभ होतें. पण बाबांनीं तसें कांहीं केलें नाहीं.

बाबांचा हा मार्ग सर्व श्रेष्ठ मार्ग आहे. मोक्षाचा मार्ग सर्वांनाच रुचणारा नाहीं. आणि पेलणारा नाहीं. मला मोक्ष नको, मला ऐहिक सुख पाहिजे असें म्हणणारा बहुसंख्य समाज आहे. मग त्यांचीं नांवें मुक्तिच्या यादींतून पुसून टाकावयाचीं काय ? तसें करतां येणार नाहीं कारण जीवनाची अंतिम परिणती कशी साध्य व्हावी ?

मनुष्य जन्माला आला कीं, त्याच्या आयुष्यभर त्याच्या हातून अनेक क्रिया घडत असतात. खाणें, पिणें, रागद्वेष, स्वप्नें, मानापमान, सुखदुःख अशा सर्वांचे त्याच्या मनावर संस्कार होत राहतात आणि शेवटीं या सर्वांतून बलवान असा एक संस्कार साररूप करतो. तो मृत्यू पावला कीं मृत्यू नंतरच्या चिरनिद्रेनंतर हा पूर्वजन्मीचा संस्कार बरोबर घेऊन तो जन्माला येतो. पूर्वजन्मांतील बऱ्या वाईट संचिताचें गाठोडे सुद्धां तो बरोबर आणीत असतो. त्याला या संस्कारांतून आणि भोक्तृत्वांतूनच आपली या जन्माची प्रगती साधावयाची असते. मानवजन्म म्हणजे पूर्वजन्मीच्या पापपुण्यानुसार दिलेला शिक्षा नव्हे किंवा बढतीहि नव्हे

अथवा पूर्वजन्मानुसार या जन्मीची कसोटीहि नव्हे. तर स्वतःची प्रगति करून घेण्यासाठीं दिली गेलेली संधि होय! ही प्रगति मी माझ्या स्वभावांतून करूं शकेन. जो माझा स्वभाव नाहीं त्यांतून माझा मी विकास कसा काय करणार? तें अशक्य आहे. मला कोणी संन्यासी हो म्हणून आग्रह केला किंवा मला तसें वाटलें म्हणून मी संन्याशाचें सोंग घेईन पण संन्यास धर्म हा माझा स्वभाव, माझें शील, माझा धर्म नसल्यामुळें संन्यास धर्माचें सोंग मला वठवतां येणार नाहीं. धनुर्धारी अर्जुन आप्तइष्टांच्या आसक्तीनें मोहित होऊन संमोहावस्तेंतून तात्पुरत्या वैराग्याकडे झुकूं लागला. पण त्याच्या तात्कालिक संमोहावस्थेचा फायदा घेऊन श्रीकृष्णानें त्याला संन्यासदीक्षा दिली असती तर त्याला संन्याशाचा वेष घेतां आला असतां इतकेंच. संन्याशाची वृत्ति कशी येणार! रानांत शेवटीं त्याची क्षात्रवृत्ति जागृत झाली असती. रानांत तो शिकार करीत राहिला असतां, कारण संन्यास धर्म त्याचा धर्म नव्हता, स्वभाव नव्हता, वृत्ति नव्हती. स्वधर्मांत राहूनच माणसाचा विकास होतो. दुसऱ्याचा धर्म कितीहि श्रेष्ठ वाटला तरी तो त्याचा धर्म असतो, तुझा नव्हे. प्रत्येक व्यक्तिचे धर्म निरनिराळे असतात. ते त्या त्या व्यक्तिच्या बेताचे असतात. माशाचा धर्म पाण्यांत रहाण्याचा. दुध फार मोलाचे म्हणून तो दुधांत राहिला तर त्याची प्रगति होणार नाहींच पण तो मरून जाईल. म्हणूनच प्रत्येक व्यक्तिनें स्वकर्म करावयाचें आणि तें करीत असतांना त्या कर्मांत चित्त ओतावयाचें म्हणजे त्याचें विकर्म होतें. कर्मांबरोबर मनाचा मेळ असला कीं विकर्म होतें. स्वधर्माचरणाची स्थूल क्रिया म्हणजे कर्म आणि त्याला मानसिक अनुसंधानाची जोड मिळाली कीं त्यांत निष्कामता निर्माण होते.

वृत्तींतून स्वभाव बनतो आणि स्वभानुसार क्रिया घडत असते हें जर खरें आहे तर एका वृत्तींतून दुसऱ्या वृत्तीनं पटकन कशी उडी घेतां येईल. त्या वृत्तीला वळण देत, विकास करीत बदलणें हेंच फक्त शक्य आहे. यांतून मनुष्य आपली सुधारणा करूं शकेल हा पटण्यासारखा मार्ग आहे. त्यावरच गीता सांगितली गेली. तोच बाबांचा मार्ग होता. संन्यासधर्माच्या नांवावर निवृत्तिपरतेचें शब्दजाळ पुरवून कृतिहीन शब्दज्ञानी तयार करण्याचा कारखाना साईबाबांनीं काढला नाहीं. अशा शब्दज्ञान्यांवर विश्वासून चालणाऱ्या भोळ्या जनांच्या अपसमजांचा निरास करणारी कर्मशीलता म्हणजेच संसारांत राहून समाजसेवेंत जीवन अर्पण करणें आणि त्यांनं भक्ति ज्ञान यांचा विरोध नाहीं. इतकेंच नव्हे तर हीं कर्तव्यें ईश्वरार्पण बुद्धिनें करणे हा मोक्षाचा मार्ग आहे असें प्रत्ययास येणारी साईबाबांची पद्धत होती. त्यासाठीं त्यांनी आपल्या भोंवती संन्याशांचा तांडा उभा राहूं दिला नाहीं. शिष्यांच्या पलटणी तयार केल्या नाहींत. तर संसारांत राहून त्यांना भूतदया, समबुद्धि, एकेश्वरवाद या सर्वांतून प्रेमाची शिकवण इत्यादि अनेक मार्ग दाखविले. ते दाखवितांना भगवंताच्या अधिष्ठानविरहीत केलेलीं व्यावहारिक कामें व त्यांचे

परिणाम हें आसुरी संपत्तिचें होत, त्यानें समाजाचें खरें कल्याण होत नाहीं; अध्यात्माचा हा पाया सुटला तर समाजाचा तोल सुटून स्वार्थ, अनाचार, भ्रष्टाचार माजतात ही शिकवण निर-निराळ्या प्रसंगांनीं त्यांनीं प्रतिपादलेली आहे. साईसच्चरित्रांत याबद्दलचे अनेक पुरावे आहेत पण विस्तारभयास्तव ते देत नाहीं.

या सर्वांमध्यें साईबाबांच्या कार्यपद्धतीचें एक वैशिष्ठ्य आहे. त्यांना जी गोष्ट पटवावयाची असेल तसा प्रसंग घडावयाचा आणि त्यावेळीं असे चार दोन शब्द बोलावयाचे कीं त्यावेळची कृति, त्या कृतीचे परिणाम व त्यांना अनुसरून उपदेशाचे दोन शब्द यांचा एकत्रित परिणाम त्या व्यक्तिच्या मनावर होण्याचें अचूक कार्य होत असे. तात्त्विक चर्चेंत लोकांना बुचकळून काढण्याचें त्यांनीं अखेरपर्यंत टाळलें हेंच त्यांच्या कार्याचें सौंदर्य आणि ईश्वराची परमभक्ति करून मुक्ति मिळव असें सर्वांस सांगत सुटण्याचे टाळून हेतू साधणें ही त्याची कला. ऐहिक सुखाकडे सारखी ओढ असलेला मनुष्य कोरडे उपदेश आणि ऐहिक सुखापासून दूर नेण्याचे दृष्टोत्पत्तीस येतील असे केलेले प्रयत्न पाहून घाबरतो. तो अशा संताच्या वाऱ्याला जाऊं इच्छित नाहीं. त्याला संन्यासी होण्याची कल्पना भेडसावीत असते. तो जातो ऐहिक सुख मागण्यासाठीं. त्याला एका पैशाच्या साखरेच्या मोबदल्यांत ब्रह्मांडाच्या मोलाचा मोबदला हवा असतो. त्याच्यापुढें भलतेंच कांहीं अतर्क्य, अघटित असें ठेवल्यावर त्यानें तरी काय करावे ! बाबांच्या कार्यांची गोम आणि त्याचे मोल संसारांत राहून कर्मयोग आचाराच्या शिकवणूकींत आहे.



- चकमकीचा दगड शंभर वर्षें पाण्यांत पडून राहिला तरी त्यांतील अग्नि उत्पन्न करण्याची शक्ति नष्ट होत नाहीं. बाहेर काढून लोखंडानें प्रहार करतांच ठिणगी तयार. खरा भक्त वाटेल तेवढ्या कुसंगतींत राहिला तरी त्याची श्रद्धा ढळत नाहीं !

# श्रीसांईविश्वरूपदर्शनाख्यान

कवियित्री— डॉ. मायावती गुर्तु, एल्. सी. पी. एस्.

## नमन

### (१) शार्दूलविक्रीडित

आधीं वंदुनि आदरे तव पदीं
कार्यास आरंभिती ।
होता पूर्ण कृपा तुझी गणपते
राहील तेथें भिती ।
ठेवी हस्त तुझा शिरीं मम सदा
श्रीशारदे प्रार्थना ।
सांई एकच मागते दृढ असो
पायीं तुझ्या भावना ।

### (२) ओव्या

वैजयंती माळ गळां ।
कानीं शोभती कुंडले ।
वैकुंठीचे भगवान ।
शिरडींत मी पाहिले ॥ १ ॥
गोपसखा गोकुळीचा ।
कान्हा यशोदामाईचा ।
कृष्ण राजा द्वारकेचा ।
झाला बाबा शेरडीचा ॥ २ ॥
सेतु बांधिला सागरी ।
शीला अहिल्या उद्धरी ।
दुष्ट राक्षसा संहारी ।
आतां साई गोदा तिरी ॥ ३ ॥
अनसूया पतिव्रता ।
केले तिन्हीं देवा बाळ ।
अवधूत दत्तराज ।
घेई पुन्हां अवतार ॥ ४ ॥
आले यमुनेला पाणी ।
वसुदेव कष्टी मनीं ।
लावी अंगुष्ठ श्रीहरी ।
गोदा हरखली मनी ॥ ५ ॥
रास क्रीडा गोपिकांची ।
पावा वाजवी गोविंद ।
भक्तप्रेमें शीलधीचा ।
सांई प्रभू होई धुंद ॥ ६ ॥
अष्टवरूषांची मूर्ती ।
दिसे देवकी मायेला ।
सोळा वरूषाचा साई ।
शीलधींत प्रगटला ॥ ७ ॥
दिसे बालमुलामध्यें ।
विश्वरूप यशोदेला ।
दाखविलें शीलधींत ।
विश्वरूप देव बाळा ॥ ८ ॥
शत्रु असूर मर्दिले ।
सज्जनास सुखाविलें ।
भक्तकामकल्पद्रुम ।
शीलधींत मी वंदिले ॥ ९ ॥
जप तप साधनांनी ।
योग–ज्ञानाच्या मार्गांनी ।
सांपडेन (ल) शोधोनिया ।
तिन्ही लोकांचा हा धनी ॥१०॥
ठाव लागे न इंद्रिया ।
थकलीही जड काया ।
अणु रेणुंत भरला ।
आडविते परि माया ॥११॥
वंदी पादपद्म तुझे ।
धूळ लावीते कपाळा ।

ब्रह्मांडाचा हा नायक ।
सांई शीलधींत झाला ॥ १२ ॥
तात माता भक्त थोर ।
वाट चालले भक्तीची ।
अर्घ्य देते पदावरी ।
कथा गाऊन साईंची ॥ १३ ॥

(३) भुजंगप्रयात

चलावे वदे शीलधी नित्य जाया ।
प्रभु साइच्या पादपद्मा पुजाया ।
हृदीं भक्तिची ज्योत ती सद्गुजाया ।
नको कांहि दूजे मनाला सजाया ॥

(४) भुजंगप्रयात

डहाणू समुद्रातिरीं एक गांव ।
तिथे रहाती मामलेदार देव ।
मनीं येतसे जाऊनी शीलधीला ।
पहावें गुरू माउलींच्या पदाला ॥

(५) दिंडी

सांइचरणीं दृढ भाव बालकृष्णा ।
लागलीसे उपदेश सांईतृष्णा ।
वाटे पाहे कधिं हेतु पूर्ण होई ।
सग्दुरू तूं तैसाच शिष्य मीही ॥

(६) अंजनीगीत

नितनियमानें ज्ञानेश्वरिला ।
वाचायाचा नियमही केला ।
सिद्धी नाहीं परि तो गेला ।
समजेना कां हे ॥

(७) शार्दूलविक्रीडित

संसारांत असे दिना क्रमितसे
पोटार्थ हो नोकरी ।
न्याया देत असे, दया मनिं वसे,
निष्ठाहि सत्यावरीं ।
गीता वाचितसे मुखोद्गत असें
स्तोत्रें पुराणें किती ।
भार्या नम्र गुणीं सुपुत्र सदनीं
भाग्यास नाहीं मिती ॥

(८) शिखरिणी

रजा घेती मोठी
म्हणति शिरडी जाउं सगळे ।
सवें माता पत्नी
भगिनी सुशिला आणिक मुलें ।
बघूं सांई भोळा
विलसत शशी भालि सुखदा ।
तपश्चर्या केली
सहजेंचि उमा पावत सदा ॥

(९) भुजंगप्रयात

उपाधीं बहू जीवनीं नाहि शांती ।
अती धांवरे, चित्त त्या नाहि भीती ।
नदी ही भवाची तरायास नांव ।
सहा शत्रुंना निर्दळी सांई—नांव ॥

(१०) पद—

तळमळ तळमळ होई ।
येना मजला प्रचीती कांहीं ॥ ध्रु ॥
चातक पाही मेघ कधीं ये ।
वाट तशी मी पाहीं ॥ १ ॥
आवरितों ह्या चंचल चित्ता ।
तिळही ना स्थिर राही ॥ २ ॥

(११) आर्या

ज्ञानेश्वरी तुम्हीं कां वाचित नाहीं
तुम्हा तिची प्रीती ।
बसुनी वाड्यामध्यें देवांना
जोग सहजची पुसती ॥

(१२) दिंडी

नियम करतो परि सिद्धीस जात नाहीं ।
कळेना कां कोपला ज्ञान आई ।
वदति बापू ह्या पोथि सांई हातीं ।
हेच तुमचा पुरवील ज्ञान मूर्ती ।

(१३) शार्दूलविक्रीडित

पोथी देऊनि हाति काय कथु त्या
दे त्वां करे हो मला ।

नाहीं बोलत काय त्या न कळले
हेतू मनी चिंतला।
लोहा स्पर्श घडे नशीब उघडे
होते क्षणी कांचन।
आलो त्वत्पदि मारणें लवकरी
वा तूं करी पावन।

## (१४) आर्या

पुसती बालकरामा कैसी झाली
कृपा तुम्हीं सांगा।
पावन पतिता केव्हां करिते न कळे
गुरुकृपागंगा।

## (१५) अंजनी गीत

आला चंद्रु वदला देवा।
बाबांचा हा निरोप घ्यावा।
मशिदीमध्यें आलो न्याया।
चला उठा वेगे॥

## (१६) दिंडी

रौप्य मुद्रा मज वीस देइ देवा।
दडासि मागे का काय मनीं कावा।
सांगा कोणाचे धन देसि मला बाळा।
बाळ वदती अपुलेंच जगत्पाला॥

## (१७) ओवी

कोठें गेली चिंधी माझी
सांपडे ती न शोधितां।
देइ माझी चिंधी मला।
लाज नाहीं कां रे चित्ता।

## (१८) पद चाल-पंढरीनाथा

चिंधी कशाला, भर जरि शेला।
अमाप देइन तुला सुचतसे।
कसलीही अवळका॥ धृ॥
पक्कान्नाच्या असुनी राशी।
चतकर तुकडा काय चोरिशी।
सौभाग्याचा तिलक कपाळी।
कशास वांछिसि माती काळी।
स्वर्ग तारका तव पायाशीं।
काळे पथ्थर कशा मागसी।
मालक असुनी त्रैलोक्याचा।
भिक्षांदेहि करिसी कशाला॥

## (१९) कटाव

दिले, अमोलिक दिले, बाळ सानुले खेळे।
साइनें विश्वरुप दाविले॥ धृ॥
कोटी रवींचे तेज उसळले।
अग्नी ज्वाला परी भडकलें।
तिन्ही उघडितो शंकर डोळे।
संव्हारी कां विश्वाचि सगळें।
दाहि दिशांना तेज फांकले।
पंच भुतांचे प्रचंड चाळे।
घेई गिरक्या वायु सळसळे।
आकाशाला पाणी भिडले।
दिसे न कांहीं। कळे न कांहीं।
चित्त तेथे गुंतले॥ १॥
प्रल्हादास्तव स्तंभामधुनी।
नारसिंह कां येतो अवनी।
माय यशोदा देखे वदनीं।
दिसेन मूर्ती गोजिरवाणी।
क्रूर काळही भासे हरिणी।
झाली घाबरी रूप पाहुनी।
संभ्रम झाला पायी लागुनी।
हरिली माया रूप दावुनी।
पुरे श्रीहरी रूप आवरी।
पार्थानें प्रार्थिलें॥ २॥
थयथयाट करि मशिद गाजवि।
मोडी तोडी, भांडी फेकिली।
वस्त्रे फाडुनि दूर उधळिली।
माझी चिंधी कशा चोरिली।
दात्री सजन कृतिही असली।
फोडिन मारिन येतां जवळि।
लाज न कृत्यें करितो काळी।
आणी म्हणतो घ्या हो जवळीं।

नाहिं उमजले कां नच पुसले ।
आवडि तव पुरविलें ॥ ३ ॥
रूप पाहिले तुझे भयंकर ।
घाबरले ना तिळही अंतर ।
फसे न मी तूं भोळा शंकर ।
तुझ्या नेत्रिं रें अमृत निर्झर ।
कृपा वर्षते भक्त शिरावर ।
कली काळही कापे थर थर ।
कोपलास तरि तुझा कृपाकर ।
घेशिल जवळि तुच परात्पर ।
तुझ्या कृपेचें लेणें ल्यालो ।
उणें आतां कोठलें ॥ ४ ॥

### ( २० ) पंच चामर

कोपला मी, फार बाळा,
काय चित्तीं घाबरा ।
वाट पाहे जाइ श्यामा,
घेउनी ये वांसरा ।
चूक झाली गोड शब्दें,
बोलतोना त्या जरा ।
शाम बोले काय देवा,
शोभती का या तऱ्हा ॥

### ( २१ ) ओवी

पोथी स्वये वाचावी ।
इतरा वाचोनि दावावीं ।
उलगडे स्वयें चित्ति ठेवी ।
आनंद मिळे निरुपणीं ।

### ( २२ ) पद

विश्वरूप दाविलें क्षणभरी ।
गेला राग कुठें ।
सांग ना गेला राग कुठें ॥
अपराधाला शिक्षा
कांहीं करि अमृत वृष्टितें ॥
अवधूताचें श्रीदत्ताचें,
रुप नित्य पाहिले ।
सीतापतिचें, उमापतिचे
रूप तुझे देखिले ।
चंदन भाळी, गदा चक्र करि,
हास्यमुखीं चमकले ।
श्रीविष्णूचें नयन मनोहर
रूप तदा भासलें ।
विश्वरूप तव बघुनी वैभव,
विरलें मीपण तिथें ॥

### (२३) पद—

वाच जा बाळा ज्ञानेश्वरी ।
संशाया ठेवुं नको अंतरी ॥ धृ ॥
रामविजय हरिविजय वांचिले ।
पुराणहि वांचिले ।
भारतास हो भागवताही ।
वांचोनी पाहिले ।
उपनिषदांचा कीस काढिला ।
नाहीं शांती परी ॥ १ ॥
कशास पुससी इतरा राजा ।
जाणतसे हे तुला ।
कोड पुरवुनी करीन कौतुक ।
सांगतसे हे तुला ।
जरी कोपलो क्षणभरि तरिही ।
प्रेम पुरे अंतरी ॥ २ ॥

### ( २४ ) शार्दूलविक्रीडित

बारा मास पुरे स्वयें कथितसे वांचीत ज्ञानेश्वरी ।
गेले रंगुनि चित्त अर्थ उकले, आनंद हो अंतरी ।
बाबांनीं कथिले, मनासि गमले आतां घडे निश्चिती ।
स्वप्नी येउनि बोलती, पुसति त्या वात्सल्य मूर्तीयती ॥

### ( २५ ) पद

माझा भाग्यरवी उगवला ।
येंउनि स्वप्नीं श्रीसांईनीं
दर्शन दिधलें मला ॥धृ॥
भगवी कफनी, वस्त्र डोइला ।
नयनी शशिशीतला ।

सुहास्य वदनी, वंदन करितां।
मस्तकिं कर ठेविला ॥ १ ॥
ज्ञानेश्वरींचें करि परायण।
पटले तव बुद्धिला।
संशय निरसन होईल सहजाचि
होइ मति निर्मला ॥ २ ॥
ध्यान करावे कसे दाविले,
चित्त बहु चंचला।
भीति कशाला माय उपेक्षी,
काय कधीं लेकरा ॥ ३ ॥

(२६) आर्या

सद्गुरु भेटी झाली, वर्णन करण्या
न बोल सांपडती।
थकले मुनिवर सुरवर, पुनरपि
तरिवर्णनास धडपडती ॥

(२७) पद

तूं माझा साई।
खेळें बाळ तुझ्या पायीं ॥ धृ ॥
मागत नाहीं, विनवित नाहीं।
नको घालु मज भीक।
उतावीळ ना, पुंडलीक हो।
तुला देतसे वीट ॥ १ ॥
ठेवि बांधुनी माय यशोदा।
विसरलास कां सगळे।
ठेवित तुजला हृदयबंधनी।
खपति न मजला चाळे ॥ २ ॥
वात्सल्याची गंगामाई।
दुथडी वाहे हृदयीं।
पाजशील मज दूर लोटितां।
कोणा वद लवलाही ॥ ३ ॥
लाड कुणाचे पुरवशील तूं।
कराशिल कुठुनी सेवा।
तुझ्या कृपेची (पंखरण)
सावलि कोणा।
मस्तकि घालिशि देवा ॥ ४ ॥
तुझ्या स्वरूपी रंगुनि गुंगुनि।
जातां दडशिल कोठें।
प्रगटशील रे धांवत येउनि।
सन्मय कीर्तन जेथें ॥ ५ ॥
तुझ्याविना ना मला आसरा।
तूंच विसावा माझा।
तूंच सदाशिव तूंच श्रीहरी।
दत्तगुरु तूं राजा ॥ ६ ॥
कोप जाणतो तुझा जाणसी।
रुसणे माझे तूं ही।
हुंदडले जरि किती वासरुं।
धांवे पाहुनि आई ॥ ७ ॥


## कै. पंडित मोतीलालजींचा दुसऱ्याच्या 'चष्म्यांतून' पहाण्यास नकार

ब्रिटिश अमदानींतील असेंब्लींत स्वराज्य पक्ष ह्या विरोधी पक्षाचे कै. मोतीलालजी पक्षप्रमुख होते. एकदां पंडितजी चष्मा आणण्यास विसरले असतां एका युरोपियन एक्झिक्युटिव्ह कौन्सिलरनें आपला चष्मा पुढें केला. हजरजबाबी पंडितजी तत्काळ म्हणाले, "माफ करा, मी आपल्या चष्म्यानें (दृष्टीनें) पाहूं शकत नाहीं."

दुसऱ्याच्या चष्म्यानें (दृष्टीनें) पहाणें सदोष आहे. सबब दूरदृष्टि ठेवून निर्दोष चष्म्यासाठीं भेटा.

**शेंडे आणि कंपनी, चष्म्याचे व्यापारी, बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४.**

निरनिराळ्या कालांत घडत आलेली
जगताच्या आदिकारणांची मीमांसा

# आत्मानुसंधान
## अर्थात्
# आत्म्याचा शोध

लेखक :— **गजानन लक्ष्मण रेगे** बी. ए., एस्. टी. सी. डी.

मनुष्यमात्राचा स्वभावच असा आहे कीं, जसजसा त्याचा उत्कर्ष खालच्या पायरीवरून वरच्या पायरीवर सारखा होत असतो, तसतसें त्या सुखाचें कर्तृत्व तो आपल्याकडे घेत असतो. पण एकदा का त्याच्यावर दुःखपरंपरा कोसळूं लागली कीं त्याला आपल्या अगतिक व असहाय्य परिस्थितीची जाणीव उत्पन्न होते, व ह्या विश्वाचें नियंत्रण करणारी आपल्यापेक्षां निराळी व स्वतंत्र अशी फार मोठी शक्ति असली पाहिजे असें त्याला वाटूं लागतें. या ना त्या देवतारूपानें तो त्या शक्तीची पूजा करूं लागतो. सर्वच मानवांच्या बाबतींत अशी स्थिति उत्पन्न होते, व ते ही शक्ति कोणती असावी याबद्दल मोठ्या आस्थेनें विचार करूं लागतात. कोणी त्या शक्तीला ब्रह्म म्हणतात. कोणी त्याला आत्मा म्हणतात, तर इतर कोणी त्याला ईश्वर असें संबोधितात.

## परकीयांच्या कल्पना

निरनिराळ्या देशांत जगताच्या आदिकारणांचा हा विचार त्यांच्या त्यांच्या, आध्यात्मिक प्रगतीच्या मानानें निरनिराळ्या वेळीं सुरू झाला. चीन देशांत कान्फ्युसिअस, इराणांत झोरोस्टर व ग्रीस देशांत थागोरस ह्या तत्त्वज्ञान्यांनीं इ. स. पूर्वी पांचव्या सहाव्या शतकांत ह्या विचाराला जोराची चालना दिली. प्राणतत्त्व हें काय आहे ? या विश्वाची उभारणी कशी झाली असेल, विश्वाचा संहार कांहीं विशिष्ट क्रमानें होतो कीं एकसमयावच्छेदें करून होतो, ह्या विश्वव्यापाराच्या बुडाशीं कोणती दृश्य व अदृश्य शक्ति आहे या सर्वांचा विचार त्यांना करावा लागला. हिंदुस्थानांत त्याच कालांत गौतम बुद्धानेंही ह्या विषयाला चालना दिली. ह्या निरनिराळ्या तत्वज्ञान्यांनीं आपापल्या मगदुराप्रमाणें त्यांचीं उत्तरें देण्याचा प्रयत्न केला. भगवान् बुद्ध ईश्वराचें अस्तित्वच मानायला तयार नाहींत. ते क्षणिक वादाचा पुरस्कार करतात. मनुष्याचें जीवित हें आकाशांतील किंचित्काल दिसणाऱ्या धूमकेतूसारखें क्षणभंगूर आहे. सृष्टि हीच मुळीं संभवनीय गोष्ट नाहीं. प्राणिमात्राला आत्मा आहे. निर्याण प्रसंगीं एखाद्या उल्केप्रमाणें ह्या आत्म्याचें अंतरालांत निर्गमन होतें व त्याच्या कर्मांचा अवशेष मागें रहातो.

पुढील जन्मांत त्याला त्याच्या कर्माप्रमाणें शुभाशुभ फळें मिळत असतात असें त्यांचें मत आहे. मनुष्याच्या उत्पत्तीबद्दल खिश्चन लोकांची कल्पना अशी आहेः—

And the Lord God formed man of the dust of the ground and breathed into his nostrils the breath of life, and man became a living soul.' Genesis V. 3.

The spirit does but mean breath. Human spirit is declared to be a mere breath a void, a phantom. Tennyson's In Memorium.

परमेश्वरानें माणसाला मातीपासून उत्पन्न केलें. नंतर त्याच्या नाकपुडींत प्राणवायूचें श्वसन केलें. आणि काय आश्चर्य ! त्या मातीच्या पुतळ्याचें सजीव माणसांत रूपान्तर झालें !

आंग्लकवि टेनिसन In Momorium ह्या काव्यांत म्हणतो— माणसाचा आत्मा हा एक प्रकारचा वायु आहे. दुसरें कांहीं नाहीं. आत्मा व प्राण एकच आहेत. ती एक पोकळी आहे.

आजचे शास्त्रज्ञ म्हणतातः—प्राण्याचें शरीर एका पेशीपासून अनेकविध पेशींत उत्क्रांत झालें आहे. त्याच्या मुळाशीं कार्बन, ऑक्सिजन, हायड्रोजन व नायट्रोजन या द्रव्यांनीं बनलेलें प्रोटोप्लाझम नांवाचें द्रव्य आहे. ह्या सर्वांच्या अंतर्भागांत सर्व शरीराच्या सर्व भागांस कार्यप्रवण करणारें सूक्ष्म द्रव्य (nucleus) असून तें सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साहाय्यानें दृश्यमान होतें. यालाच पाश्चिमात्य शास्त्रज्ञ प्राण्यांतील चिच्छक्ति मानतात. परंतु शरीरांतील प्राण निघून गेल्यावर अगदीं तावडतोबसुद्धां हें द्रव्य शरीरांत असूनही शरीरांतील इंद्रियें कार्यप्रवण होत नाहींत. कारण तें मुळांतच जड आहे. प्रोफेसर हक्सले हे हें जीवतत्व एका चिकट परमाणूचें Jelly बनलें आहे, असें म्हणतात. त्यांनीं त्यावर प्रयोग करून पाहिला, पण तें प्रयोगातीत आहे असें त्यांस आढळून आलें. अर्थात् ह्या सर्व जड वस्तु व्यतिरिक्त इंद्रियांना कार्यप्रवृत्त करण्याला अतींद्रिय व चैतन्ययुक्त अशी कांहीं निराळी वस्तु असली पाहिजे ही गोष्ट सिद्ध होते. याच वस्तूचें स्वरूप जाणण्याकरितां आपल्या प्राचीन ऋषींनी मनन, चिंतन, ध्यान व दर्शन यांच्या साहाय्यानें प्रयत्न केले आहेत.

## प्राचीन कवीच्या कांहीं शंका

ॐ ब्रह्मवादिनो वदन्ति। किं कारणं ब्रह्म। कुतः स्म जाताः। जीवाय केन कच संप्रतिष्ठा। केन अधिष्ठिताः केन सुखेतरेषु वर्तीमहे ॥ श्वेताश्वतर उपनिषत् 1.

ब्रह्म ही वस्तु काय आहे ? आम्ही कोठून जन्मास आलों ? कोणत्या तत्त्वामुळें आम्ही जीव धरून आहों ? आम्हाला कोणाचा आधार आहे ? आम्हाला सुख—दुःख प्राप्त होतें हें कशामुळें ? अशा प्रकारच्या ब्रह्माचा विचार करणाऱ्यांच्या शंका आहेत; आणि त्या श्वेताश्वतर उपनिषद निर्माण झालें त्यावेळच्या आहेत. त्याच्याही पूर्वीं केनोपनिषद् कालांतील आचार्यांची हीच शंका होती. ते विचारतातः—

केनेषितं पतति प्रेषितं मनः। केन प्राणः प्रथमः प्रैति युक्तः। केनेषितां वाचं इमां वदंति। चक्षुः श्रोत्रं क उ देवो युनक्ति।

आपल्या विषयाप्रत जाण्याला प्रेरणा झालेलें मन आपल्या विषयाप्रत कोणाच्या प्रेरणेनें गमन करतें? प्राण कोणाच्या प्रेरणेनें आपलें कार्य करतो? कोणी प्रेरणा केलेली ही वाणी लोक बोलतात! कोणता देव चक्षु आणि श्रोत्र यांना प्रेरणा करतो? आणि ह्या प्रश्नाचें उत्तर त्यांनींच दिलें आहे.

श्रोत्रस्य श्रोत्रं मनसो मनः यद्वाचा ह वाचं स उ प्राणस्य प्राणस्य प्राणः चक्षुषः चक्षुः। अतिमुच्य धीराः प्रेत्य अस्मान् लोकान् अमृता भवंति॥ केनोपनिषद्।

श्रोत्राचें जो श्रोत्र आहे, मनाचें जो मन आहे, वाचेची जो वाचा आहे प्राणाचा जो प्राण आहे, चक्षूंचा जो चक्षु आहे, तो यांना प्रेरणा करतो. इंद्रियांचा इंद्रियभाव सोडून देणारे शहाणे लोकच हा इहलोक सोडून गेल्यावर मरणापासून मुक्त होतात.

## वेदकालीन कल्पना

वरील शंका आणि त्याचें समाधान या गोष्टी उपनिषत्कालीन आहेत. इतकेंच नव्हे तर त्या उपनिषत्कालाच्या फार पूर्वी वेदकालांतही लोकांना आल्या होत्या ही वस्तुस्थिति लक्षांत घेतली पाहिजे. त्या कालांत तत्त्वज्ञानाची रूपरेषा इतकी स्पष्ट नव्हती. त्या काळांत आदितत्त्वाच्या कल्पना विश्वदर्शनांतून घेणें साहजिक होतें. विश्वांतील भव्य दृश्यें हाच त्यांच्या कल्पनेचा आधार होता. सृष्टीच्या आरंभीं याच दृश्यांची पूजा ते करीत असत. इंद्र, अग्नि, वायु, सूर्य, उषा व पर्जन्य हीं त्यांचीं उपास्य दैवतें होतीं. पंजाबांतील नदीचीं स्तोत्रें ऋग्वेदांत उपलब्ध होतात, व तीं नदीस्तुति म्हणून प्रसिद्ध होतात. ही आदिद्रव्याच्या अधिष्ठानाची प्रथम कल्पना विश्वांतून निघाली असली पाहिजे. नक्षत्रांनीं भरलेलें आकाश, अंतरालांतील घोंगावणारे वारे, दरवर्षीं नियमित येणारे ऋतु, भरती आहोटी यांचें मूलकारण सृष्टींतच असलें पाहिजे अशी त्यांची कल्पना झाल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. इंद्रादि देवतांची पूजा व त्यांना संतुष्ट करण्यासाठीं दीर्घ कालपर्यंत होणारे यज्ञ यांत त्यांना पुढें पुढें जीविताचें मूळ कारण सांपडेनासें झालें. इंद्र हा देवाचा देव महापराक्रमी, विश्वाचा सम्राट्, पण तो व इतर देव यांजपासून विश्वाचें नियंत्रण होत असेल असें त्यांना वाटेना. इंद्र खरोखर असेल कां? त्याला कोणी पाहिलें आहे? ऋग्वेदांतील आठव्या मंडळांतील शंभराव्या सूक्तांत ही शंका प्रदर्शित केली आहे. इंद्र नाहीं तर ह्या भूतांचा स्वामी कोण असेल? तो प्रजापति असला पाहिजे. हिरण्यगर्भ असें दुसरें नांव त्यांनीं त्याला दिलें.

हिरण्यगर्भः समवर्तताग्रे
भूतस्य जातः पतिरेव आसीत्।
स दाधार पृथिवीं द्यामुते मां
कस्मै देवाय हविषा विदेम॥

ऋ. X. १२१

तो पृथिवी आणि आकाश यांचा आधार आहे. सृष्टीच्या पूर्वी होता. आणि नंतर तो तिचा स्वामी झाला.

पण याहिपूर्वी काय स्थिति असेल? कदाचित् त्यावेळीं अगाध व अपरंपार पसरलेलें फक्त पाणी असेल काय? अहो, त्यावेळीं कांहींहि नसेल. असेल कांहीं तरी.

नासदासीत् नो सत् आसीत्, तदानीं नासीत् रजः नो व्योम अपरः यत्। किमावरी वः कुहकस्य शर्मन् अंभः किमासीत् गहनं गभीरं। न मृत्युः आसीत् अमृतं न तर्हि न रात्र्या अन्हऽ आसीत् अकेतः। ऋ.

त्यावेळीं सत् नसेल, असत् ही नसेल, त्यावेळीं हवा नसेल, आकाशही नसेल, पाणी नसेल. हें सर्व कोणी व्यापलें असेल? कशांत व्यापलें असेल? कोणाचा आधार असेल? त्यावेळीं दिवस रात्र हीं नसतील. मरणहि नसेल आणि अमृतत्वहि नसेल. त्यावेळीं फक्त एकमेव अद्वितीय अशी स्वयंप्रेरित श्वसनयुक्त शक्ति असेल काय?

## आतां औपनिषदीय कल्पना

याच कल्पना आपणास सर्वांत जुन्या अशा बृहदारण्यकोपनिषदांत प्रपंचित केलेल्या दिसतात.

आप एव इदं अग्रे सुः। ताः आपः सत्यमसृजंत, सत्यं ब्रह्म, ब्रह्म प्रजापतिं प्रजापति देवान्। ते देवाः सत्यमेव उपासते।

आरंभीं सर्व उदकच होतें. उदकानें सत्य निर्माण केलें. सत्यानें ब्रह्म, ब्रह्मानें प्रजापति आणि प्रजापतीनें देव उत्पन्न केले. ते देव सत्याचीच उपासना करतात. Thales या या शास्त्रज्ञाचें मत जगाचें आदिकारण पाणी असावें असेंच आहे. मनु, पाणी परमेश्वरानें उत्पन्न केलें असें मानतो. तर बायबलमध्यें परमेश्वराचा आत्मा पाण्याच्या पृष्ठावरून फिरत असतो असा उल्लेख आहे.

कांहीं कालपर्यन्त हें मत बहुजनसमाजाला मान्य होतें असें दिसतें. परंतु पुढें अशी शंका निघाली कीं, " यदि इदं सर्वं अप्सु ओतं प्रोतं च कस्मिन् नु खलु आपः ओताश्च प्रोताः च। वायौ गार्गीति "। बृ. ३·६।

हें सर्व जग उदकानें ओतप्रोत भरलेलें दिसतें. पण उदक कशानें ओत व प्रोत आहे? याज्ञवल्क्य सांगतो, हे गार्गी, हें सर्व उदक वायूनें ओतप्रोत आहे. वायु हा सर्वांचा संवर्ग म्हणजे संग्राहक आहे असें रैक्वमुनीचेंही मत आहे. जेव्हां उदक शोष पावत तेव्हां तें वायुप्रत जातें. रैक्व अध्यात्म दृष्टीनेंही ह्या जगताच्या मूलवस्तूचा शोध करीत होता असें दिसतें. अथ अध्यात्म—प्राणो वाव संवर्गः। मनुष्य झोपल्यावर वाणी प्राणामध्यें प्रवेश करते. चक्षु, श्रोत्र आणि मन हीं देखील प्राणाप्रतच जातात. प्राण या सर्वांचें संवरण करतो. आयुः प्राणः। प्राणावरच आपलें आयुष्य अवलंबून आहे. वायुर्वाव संवर्गः यदा वा अग्निः उद्वायति वायुमेवाप्येति। छां. IV 2 याज्ञवल्क्यापेक्षां रैक्वाला उदक व वायु या दोन पंचमहाभूतांमधील अग्नितत्वाची (तेजस्) ही माहिती होती असें दिसतें. पण अग्नितत्वानें त्यावेळीं जनमनाची विशेष पकड घेतलेली दिसत नाहीं. यावरून रैक्वानें या प्रश्नाची समष्टि आणि व्यष्टि किंवा अधिदैवत व अध्यात्म या दृष्टीनें विचार केला होता असें दिसतें.

पण हा वायु कशानें ओतप्रोत असेल ! अशी पुनः नंतरच्या आचार्यास शंका आलीच. हा वायु अंतरीक्षानें ओतप्रोत असावा असें त्यांना वाटलें. तेव्हां आकाश हेंच जगाचें मूलकारण आहे, असा त्यांनीं सिद्धांत मांडला. पुढें पुढें कोणत्याहि अनुमानांनी त्यांचे समाधान होईना तेव्हां कंटाळून ह्या तत्वज्ञान्यांनीं असें म्हणावयास सुरवात केली कीं, या जगाच्या आरंभीं कांहींच नसेल, असत् असेल आणि या शून्यांतून सत्चा जन्म झाला असेल !

असत् वा इदमग्र आसीत् । ततो वै सद्जायत । तदात्मानं स्वयमकुरुत् । तै. उ. II ६

हें सर्व जग पूर्वीं असत् होतें. सर्वत्र अंधकार होता. हें सर्व जगत् मृत्यूनें ग्रासलें होतें. त्यावेळीं दिवसही नव्हता व रात्रही नव्हती. त्यापासून सत् उत्पन्न झालें. त्यानें स्वतःच आपणाला उत्पन्न केलें. म्हणजे ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळांतून जी विचारसरणी मांडली आहे तीच विचारसरणी उपनिषदांतूनही दृष्टोत्पत्तीला येते. हे दोन्ही विचार–प्रवाह कांहीं कालपर्यंत समांतर दिशेनें वाहात होतें असें स्पष्ट दिसतें.

पण शून्यापासून सृष्टि होणें अशक्य आहे असें जेव्हां त्यांना कळून आलें तेव्हां ही नासदीय वृत्ति टाकून त्यांनीं सद्वृत्तीचा अंगीकार केला. पण कांहीं तत्वज्ञानाच्या मनांत चाललेली खळबळ खालील उताऱ्यांत चांगलीच दिसून येते.

सदेव सोम्य इदमग्र आसीत्। एक मेवाद्वितीयम् । तद्ध एक आहुः । असदेव इदमग्र आसीत् । तस्मादसतः सद्जायत । कुतस्तु खलु सौम्य एवं स्यात् इति ह उवाच । कथं असतः सज्जायेत इति । सदेव सोम्य इदमग्र आसीत् । एकमेवाद्वितीयम् ॥ छां. VI २ ॥

कित्येकांच्या मतानें पूर्वीं असत् च होतें, तर दुसरें विचारित, अहो असत् पासून सत् कसें होईल ? म्हणून आरंभापासून सत् च असले पाहिजे. आणि ते एकमेव असलें पाहिजे. तें नामरूपरहित अव्याकृत असल्यामुळें त्याला या दृष्टीनें असत् म्हटलें तरी चालेल.

( पान ४८ पहा )

● ह्या जगांत जसें ' ही माझी जमीन ' म्हणून जमीनीचे अनेक भाग करतात, परंतु वर असतें तें एकच अनंत आकाश, त्याचे कोणी भाग करूं शकत नाहीं. तद्वत् माणूस अज्ञानानें आपलाच धर्म श्रेष्ठ म्हणून व्यर्थ अहंकार माजवतो. त्या अनादि आणि अनंत भगवंताचें ज्ञान झाल्यावर मग ती खोटी अहंता उरत नाहीं.

आकाश हें या सर्व जगताचें मूल आहे असें मानणारे तत्ववेत्ते आकाश जड असल्यामुळें तें जगताचें मूळकारण म्हणून मानण्यास तयार होईनात. आकाशापलीकडे एक सचेतन शक्ति ह्या विश्वाच्या बुडाशीं असावी असें त्यांना वाटूं लागलें. त्यालाच त्यांनीं आत्मन् असें नांव दिलें.

"आत्मा वा इदमग्र आसीत् । नान्यत् किंचन मिषत् ।" ऐ. उ. बृ. उ. I ४ हें जग उत्पन्न होण्याचे आधीं हा आत्माच सर्व कांहीं व्यापून होता. त्याला स्फुर्ति झाली—नाना तऱ्हेचे लोक उत्पन्न करावेत. नंतर त्यांनें पाण्यापासून एक पुरुष उत्पन्न केला. त्याला त्यानें तापाविलें. तप्त झालेल्या त्याला तोंड, डोळे, नाक इत्यादि अवयव फुटले. कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें उत्पन्न केल्यानंतर हा आत्मा त्या शरीरांत प्रविष्ट झाला. कौषितकी उपनिषदानेंही ह्याच मताचा अनुवाद केला आहे. 'एषः प्राज्ञः आत्मा इदं शरीरं अनुप्रविष्टः' ज्ञानवान् आत्मा शरीरांत शिरल्यावरच पुरुषाला कर्म करण्याची इच्छा व ज्ञान ग्रहण करण्याची बुद्धि झाली. 'केनेषितं पतति प्रेषितं मनः' या वरील प्रश्नाचें उत्तर यांत आलें आहे. हा आत्मवाद इतक्या दीर्घकालपर्यत टिकून राहिला आहे यावरून या मताची निर्दोष प्रणाली प्रत्ययास येते. अर्थात् ही प्रणाली एकाच कालीं पूर्णत्वास गेली असें म्हणतां येणार नाहीं, या आत्म्याच्या स्वरूपाबद्दल निरनिराळ्या आचार्यांचीं निरनिराळीं मतें होतीं असें उपनिषदांतील वचनांवरून दिसून येतें. आत्मा प्रत्येक शरीरीं एकच आहे कीं निरनिराळे आहेत हा वाद अजूनही संपलेला नाहीं. दुसऱ्या प्राण्याला दुःख झालें तर त्याचें दुःख पाहून मलाहि दुःख होतें. माझ्याबद्दल दुसऱ्या व्यक्तीस सहानुभूति वाटते. परकीय देशांत भूकंप झाला, अवर्षण पडलें तर आम्हांलाहि त्या देशांतील लोकांची काळजी वाटते. असें कां वाटतें याबद्दल मानव विचार करूं लागतो, त्यावेळीं साहजिकच अनुमान निघतें कीं, माझ्या शरीरांतील आत्म्याच्या इतर लोकांच्या आत्म्याशीं घनिष्ठ संबंध असावा. कदाचित् दोन्ही आत्मे एकाच विश्वव्यापी आत्म्याचे आविष्कार असावेत. आणि याच अनुमानावरून या बृहदात्म्याची या ब्रह्माची कल्पना निघाली. यांतूनच विश्वव्यापी आत्मा किंवा ब्रह्म व व्यक्तिगत प्रत्यगात्मा, तसेंच समष्टि आणि व्यष्टि या कल्पना पुढें उद्‌भूत झाल्या. या ब्रह्मवादाचा विकास उत्तरोत्तर कालांत आचार्यांच्या वादविवादांत दिसून येतो. आत्म्याची अथवा ब्रह्माची कल्पना दृढमूल होईपर्यंत कित्येकांच्या मनांत जगताच्या मूल द्रव्याबद्दल अजूनही शंका होत्याच. कौरव्यायणाचा पुत्र म्हणतो—'ॐ खं ब्रह्म.' अहो आकाश हेंच ब्रह्म आहे. कारण आकाश बृहत् आहे. आत्म्याचें स्थान शरीरांत आहे असें ठरल्यानंतर अध्यात्म्याचे दृष्टीनें 'प्राणोब्रह्म' प्राण हेंच ब्रह्म असें मानलें गेलें. कौ. १-१. जीवन म्हणजे प्राण आणि प्राण म्हणजे जीवन. प्राण हा देह आहे. प्राण ही संज्ञा आहे. प्राण हा आत्मा आहे, अशी त्यांची भावना होती. प्राणिशास्त्र, मानसशास्त्र व अध्यात्म या दृष्टीनें त्या कालची ही कल्पना बरीच विकसित

स्वरूपाची होती असें दिसतें. वायु हा सर्वांचा अंतक आहे असें रैक्काचें मत होतें. पण त्यांचा आदि कोण हें तो सांगत नाहीं. ग्रीक तत्त्ववेत्ता Aanximenes याचें मत वायु हाच सर्वांचा आदि व अंत होय. Air is both the beginning and end of all things असें होतें. पुढें पुढें या ऋषींना असें आढळून आलें कीं संज्ञेनंतरही कांहीं काळ चैतन्य नांवाची वस्तु शरीरांत शिल्लक राहते. त्याला त्यांनीं जीव नांव दिलें. हाच जीवात्मा, प्रत्यगात्मा आणि हें विश्व उत्पन्न करणारा, त्याची स्थिति आणि लय यांचा नियंता हा परमात्मा. या परमात्म्यापासूनच हे सर्व प्राणिमात्र उत्पन्न झाले आहेत. उत्पन्न झाल्यावर परमात्म्यामुळेंच ते जिवंत राहतात. आणि शेवटीं ते त्यालाच जाऊन मिळतात. त्या परमात्म्याला, त्या ब्रह्माला, जाणणें हें मनुष्यमात्राचें कर्तव्य आहे. तै. उ. ३. १.

आत्मा व ब्रह्म हीं एकच आहेत हें निश्चित केल्यावर 'ब्रह्म वा इदं अग्रे आसीत्' हा सिद्धांत आचार्यांनी मांडला. तरी सुद्धां कांहीं विचारवंताना आत्मा व ब्रह्म यांमधील भेदाचें स्पष्टीकरण हवें होतें. 'को नु आत्मा किं ब्रह्म' हें त्यांचें पालुपद होतेंच. छांदोग्यांत म्हटलें आहे. 'प्राचीनशालः, औपमन्यवः, सत्ययज्ञः पौलुषिः, इंद्रद्युम्नो भाल्लवेयः, जनः शार्कराक्ष्यः, बुडिलः आश्वतराश्विः ते ह एते महाशालाः महाश्रोत्रियाः समेत्य मीमांसांचक्रुः को नु आत्मा किं ब्रह्म इति V.' "प्राचीनशाल, सत्ययज्ञ, इंद्रद्युम्न, जन आणि बुडिल हे श्रुतिसंपन्न महापंडित आत्मा म्हणतात ही काय वस्तु आहे, ब्रह्म म्हणजे काय याबद्दल विचार करूं लागले. कोणालाच हा प्रश्न सुटेना. तेव्हां ते अरुणीचा मुलगा उद्दालक याजकडे गेले. उद्दालकानें त्यांना कैकयपुत्र अश्वपति राजाकडे नेलें. अश्वपती राजाला आढळून आलें कीं त्यांपैकीं कोणी अजून आकाशालाच आत्मा मानतो, तर कोणी आदित्याला, वायूला, पृथिवीलाच आत्मा मानतो. अश्वपतीनें त्यांना वैश्वानररूपी आत्म्याची उपासना करण्याचा उपदेश केला.

पुढील आचार्यांनीं आत्म्याचें स्वरूप निश्चित् करण्याचा आणखी प्रयत्न केला. आत्मा अव्यक्त आहे. पण साधकांना तो व्यक्त होतो. तो जसा विश्वव्यापी आहे तसा तो प्राण्याच्या हृदयांत राहण्याइतका मोहरीइतका सूक्ष्म आहे, तो सर्व शरीरांत भरून राहिला आहे. म्हणूनच 'प्राणो वै ब्रह्म,' 'वाग्वै ब्रह्म,' मनो वै ब्रह्म' प्राण ब्रह्म आहे, वाणी ब्रह्म आहे, मन, चक्षु हृदय हीं सर्व ब्रह्मच होत. असें लोक मानूं लागले. इंद्रियांच्या दैवतांनाही ब्रह्म मानावें. ब्रह्माची अध्यात्म आणि अधिदैवत व्यष्टि आणि समष्टि या दोन्हीं प्रकारांनी उपासना करावी. ब्रह्म आकाशापेक्षांहि मोठें तसेंच तें अणुपेक्षांही अणु आहे. 'अथ यदिदं अस्मिन् ब्रह्मपुरे दहरं पुंडरीकं वेश्म दहरो अस्मिन् अंतराकाशः तस्मिन् यदन्त : तद् अन्वेष्टव्यं तत् वाव विजिज्ञासितव्यम्। छां. VIII,

तदक्षरं अस्थूलं अनणु, अह्रस्वं, अदीर्घ....

ह्या ब्रह्मपुर नांवाच्या नगरामध्यें मन, बुद्धि, इंद्रियांनीं युक्त असें लहानांत लहान

पुंडरीक कमळ आहे. त्यांत अंतराकाश आहे. त्या अंतराकाशाच्याही आंत या नगराचा स्वामी जो आत्मा तो अवस्थित आहे. या आत्म्यामध्येंच त्या आत्म्याचा शोध केला पाहिजे.

अजूनपर्यंत आत्म्याचें स्वरूप भावनात्मकच मानलें जात होतें. परंतु एवढी ही सृष्टीची उभारणी, तिचें नियंत्रण भावात्मक स्वरूप कसें करूं शकेल अशी शंका कांहीं ज्ञात्यांना आली, तेव्हां—

'आत्मा वा इदं अग्रे आसीत पुरुषविधः।'

असा सिद्धांत त्यांनीं मांडला. पुरुषविध आत्म्याची अस्पष्ट कल्पना मुण्डकोपनिषदांतही आढळते.

पुरुष एव इदं विश्वम्।

हें आकाश या पुरुषविध आत्म्यापासून प्रसृत झालें. आकाशापासून वायु, वायूपासून तेज, तेजापासून जल, आणि जलापासून पृथ्वी अशीं ही पंचमहाभूतें प्रकट झालीं.

तस्मात् एतस्मात् आत्मनः आकाशः संभूतः। आकाशात् वायुः, वायोः अग्निः, अग्नेः आपः, अद्भ्यः पृथिवी।

कित्येकांच्या मतें आत्म्यापासून विस्तार-आकाश होणें हें केवळ उत्पत्तिकार्य नसून (Emanation) आहे. पुरुषसूक्तांतील विश्वोत्पत्तीची प्रक्रिया हें विस्तारकार्याचें ढळढळीत उदाहरण आहे. भगवद्गीतेंत श्रीकृष्णानें आपलें सर्वव्यापित्व व अतिशयित्व पुढील श्लोकांत सांगितलें आहे. "मत्त एवेति तान् विद्धि" ७. १२. मां एभ्यः परमव्ययम १३. हें सर्व जग माझ्यापासून उद्भूत झालें आहे, व मी यापलीकडचा आहे. (Transcendental.) निर्गुण आत्म्यापासून सगुण जगाची उत्पत्ति होणें अशक्य आहे. तें सत्कार्यवादाच्या विरुद्ध आहे. म्हणून सृष्टि ही ब्रह्माचें कार्य नव्हे, भ्रम आहे असें मानलें जातें. एवढ्या पायरीपर्यंत त्यावेळेचें तत्त्वज्ञान आलें नसेल. सत्कार्यवाद, गुणपरिणामवाद, विवर्तवाद हे पुढील कालांत जन्मास आले. परंतु आत्मवादाचा विकास औपनिषदीय कालांतच जवळ जवळ पूर्णत्वास पोंचला होता. आत्म्याला एकेका अंगानें न ओळखतां त्याला सर्व अवयवांनीं ओळखलें पाहिजे. याच्याच प्रेरणेनें इंद्रियें हीं आपापल्या विषयाप्रत प्रवृत्त होतात. सूर्य-चंद्राच्या आक्रमणाला हीच चिच्छक्ति प्रवर्तक आहे. या चिच्छक्तीच्या ज्ञानानें सर्व विश्व ज्ञात होतें. 'येन ज्ञातेन सर्वं विज्ञातं भवति।' ब्रह्माचें ज्ञान भूमा म्हणजे परमसुखाचें साधन होय. नव्हे तेंच परमसुख. ह्या पुरुष विध आत्म्यापासून श्वेताश्वतरोपनिषदांतील रुद्राची कल्पना निघाली. "एको हि रुद्रो न द्वितीयाय तस्थुः। य इमान् लोकान् ईशते ईशनीभिः। हा अंतरात्मा शिवरूपानें अंगुष्ठमात्र पुरुष होऊन सर्व लोकांच्या हृदयांत अवस्थित आहे.

## वेद व उपनिषदें यांतील विचाराचें साम्य

वरील विवेचनावरून साधारणपणें असें दिसून येईल कीं आत्म्यानुसंधानाच्या बाबतींत वेद उपनिषदांच्या अगदींच मागे होतें असें म्हणतां येणार नाहीं. आरंभीं आरंभीं वेदकालीन जनता इंद्र-वरुणादि निसर्ग देवतांना मानीत होती. देवता—बाहुल्यावर त्यांचा विश्वास होता. इंद्रदेव हा पराक्रमी होता, त्याला शरीर

होतें, त्यांच्या डोक्याला सोन्याचे केस होते व त्याला शुभ्र दाढी होती. तो हंडाभर सोम पीत असे. रुद्र हा तुफान, वादळें उत्पन्न करणारा देव होता. तो पर्वतावर अरण्यांत राहात असे इत्यादि कल्पना त्यांना संमत होत्या हें खरें. परंतु पुढें या जगताच्या आदि-कारणाबद्दल अधिकाधिक विचार करतां ह्या सृष्टीचा नियंता कोणीतरी एकच एक देव असला पाहिजे. तो प्रजापति कोण ? इंद्राला तर कोणीहि पाहिलेलें नाहीं. ऋ VIII १००. या एकेश्वरी विचारापर्यंत ते येऊन पोंचले. जगाच्या आरंभीं कांहीं होतें का ? कीं कांहींहि नसेल ? असत् असेल. असत्पासून सत् कसें उत्पन्न होईल, ही विचारमालिका परणतस्वरूपाची नाहीं असें कोण म्हणेल ? परमात्म्याची कल्पना त्यांना सुचली होती. मरणोत्तर आत्मा कोणत्या स्थितींत असतो, प्राण्याचें जीवन कोणत्या प्रकारचें असेल ? मागें राहिलेल्या नातलगांनी, मृताकरीतां कोणत्या प्रार्थना करावयाच्या इत्याहि गोष्टीचें वेदांतील वर्णन कठोप-निषदांतील नचिकेताच्या यमाशीं झालेल्या संभाषणाची आठवण करून देत नाहींत काय ? तपामुळें एकच एक प्रज्ञाघन देव प्रकट झाला. तपाची ही कल्पना उपनिष-दामध्येंही वारंवार आढळते. सातपःअत-प्यत। प्र उ.। एतं यजुर्वेदं अभितप्तम्। छां. iii २ पुरुषं अभ्यतपत्। ऐत i. ४. परमेश्वर एकच असून लोक त्याला इंद्र अग्नि, मरुत् अशीं निरनिराळीं नांवें देतात. ऋ. i. १६४ विश्वाला व्यापून परमेश्वर आणखी दहा अंगळें शिल्लकच उरला आहे. या पुरुषसूक्तांतील कल्पने-वर उपनिषदांतील Emanatory (संभूतत्व) व Transcedental (अतिशयित्व) सिद्धांत आधारलेले आहेत. श्वेताश्वतर उपनिषदांतील रुद्राची, शिवाची किंवा बृहदारण्यकांतील पुरुषविध आत्म्याची कल्पना वेदांतील तुफानी वादळासारख्या घोंगावणाऱ्या रुद्राच्या (रोदिति) किंवा हिरण्यगर्भाच्या कल्पनेवर आधारलेली स्पष्ट दिसतें. अग्निसंस्काराच्या दहाव्या मंडळांतील ऋचेंत म्हटलें आहे, अजः भागः तपसा त्वं तपस्व। तं ते शोचिः तपतु। याचा जो भाग अज आहे त्याला तुझ्या शुद्ध ज्वालांनीं तपन कर. उपनिषदांतील एकच एक वस्तु अज आणि अमर आहे आणि ती म्हणजे-आत्मा. उपनिषदांतील बऱ्याच विचारांचे ऋग् वेदाच्या दहाव्या मंडळाच्या विचारांशीं बऱ्याच प्रमाणांत साम्य आढळतें. दुनिया गोल आहे हेंच खरें ! कदाचित् या दोन्ही वाङ्मयाचा काल जवळ जवळ असेल असें म्हणावें काय ?

उपनिषदांतील तत्वज्ञान वेदांतील विचारांपेक्षां अधिक परिणत स्वरूपाचें आहे याबद्दल कोणाचें दुमत असणें शक्य नाहीं. प्रत्येक प्राणी 'आत्मौप येन पश्यति' या न्यायानें परमेश्वराच्या स्वरूपासंबंधीं विचार करतांना त्याच्यावर तो आपल्याच स्वरूपाचा पौरुषेयत्वाचा आरोप केल्याशिवाय त्याला समाधान वाटत नाहीं. प्रस्तुत लेखांत आत्मसंशो-धनाची वेद आणि उपनिषदें यांत दिसून येणारी एक प्रगमनशील विचारप्रणाली हिचें फक्त दिग्दर्शन केलें आहे, ही सिद्धांतरूपानें मांडलेली नाहीं हें सूज्ञवाचकांना सहज लक्षांत येईल.

---

# ए. आर. सावंत अॅन्ड ब्रदर्स

३६३, मंगळदास मार्केट समोर, मुंबई नं. २.

ARSA PRODUCTS

❀ होजियरी ❀ तयार कपडे ❀ फर्निशिंग फॅब्रीक्स

व इतर सर्व तऱ्हेच्या कापडाचे व्यापारी

रिटेलर्स व होलसेलर्स     टे. नं. २२८४४



दृष्टींतील तेज म्हणजेच जीवनाच्या उत्कर्षांतील प्रमुख अंग होय

म्हणून दिव्य दृष्टि देणाऱ्या स्वस्त आणि टिकाऊ चष्म्याला प्रमुख स्थान मिळतें.



त्याकरितां—

# शिसा ऑप्टिशिअन्स

( चष्म्यांचे व्यापारी )

हें एक नांवाजलेलें दुकान आहे.

यांच्या येथें डोळ्यांच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासले जातात.

छबीलदास रोड, दादर ( W. R. ), मुंबई २८.



॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

# भास्कर लक्ष्मण नार्वेकर

नवीन फॅशनप्रमाणें, सोन्या–चांदीचे, कल्चर मोत्यांचे दागिने तयार मिळतील व ऑर्डरप्रमाणें तयार करून दिले जातील. तसेंच श्री. साईबाबांचीं सोनें–चांदीचीं लॉकेटस् व चांदीचे तयार फोटो मिळतील. एक वेळ भेट देऊन खात्री करा. सुंदर फॅशनेबल दागिने तयार करून घ्या.

१८४, ठाकुरद्वार रोड, मुंबई २.

परमेश्वराला निष्कामभावानें जें समर्पण केलें जातें,
तें **सुवर्ण** होऊन परत मिळतें.

# सोनियाचें गाणें

: लेखक :

श्री. ना. वा. गुणाजी

गेल्या म्हणजे ( वर्ष ३६–अंक २ रा) श्रीसाईलीलेच्या एप्रिल–मे–जून १९५६ च्या अंकांत '**तें अमृत आतां कोठें मिळेल**' हा प्रा. हे. वि. इनामदार एम्. ए. यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत आरंभीं रवींद्रनाथ ठाकूर यांची गोष्ट दिलेली आहे. सदरहु गोष्टींत आणि तिच्या विवेचनांत कांहीं चुका व अपसिद्धान्त आढळून आल्यामुळें हा लेख लिहीत आहे. आरंभीं ती गोष्ट आणि त्यांतील टीकाविषयक भाग तेवढा देत आहे.

"तुम्हाला रवींद्रनाथ ठाकूर यांची ती गोष्ट माहीत आहे कां?

—विजयादशमीची मिरवणूक निघाली होती. भालदार, मानकरी, सरदार व असंख्य जनसमूह यांच्या समवेत राजाधिराजांची स्वारी मिरवत चालली होती. याचकांच्या अंगावर धन उधळीत होती. सर्वजण राजाला दुवा देत होते, त्यांच्या नांवाचा जयजयकार करीत होते.

या सर्व मनोहर दृश्यापासून थोडें दूर, रस्त्याच्या कडेला एक भिकारी उभा असलेला राजानें पाहिला. 'सुंभाचा करगोटा, रकट्याची लंगोटी' अशी संत नामदेवाप्रमाणें त्याची स्थिति होती. हातांत जीर्ण, मलीन झोळी व डोळ्यांत दैन्य! या सर्व धुमाळींत आपली वर्णी लागणें कठीण या कल्पनेनें तो दूर उभा असावा असें राजाला वाटलें.

राजानें झटकन माहुताला खूण केली. तो खालीं उतरला व त्या भिकाऱ्याजवळ गेला. भिकाऱ्याला आश्चर्य वाटलें, आनंद झाला. राजा आतां आपल्याला निदान एखादी सुवर्ण–मुद्रिका दान करील या अपेक्षेनें, आतुरतेनें त्यानें आपली झोळी पुढें केली. पण झालें भलतेंच! राजानेंच त्याच्या पुढें आपला हात पसरला. एका राजेश्वरानें यःकश्चित भिकाऱ्याजवळ याचना करावी! केवढा विलक्षण प्रसंग! भिकारी स्तंभित झाला, निराश झाला, चरफडला. त्यानें मोठ्या

मिनंतवारीनें झोळींतले दोन दाणे राजाच्या हातावर ठेवले. राजानें प्रसन्न मनानें स्वीकारले व पुन्हां अंबारींत बसून तो निघून गेला. भिकाऱ्यानें खोपटांत आल्यावर झोळी पालथी केली, तों काय आश्चर्य! ज्वारीच्या त्या छोट्या ढिगांत दोन सुवर्णकण चमकत होते. मोगऱ्याच्या पुष्पराशींत सोनचाफ्याचीं दोन फुलें कोणी टाकावींत तसे! त्यानें राजाला दिलेल्या दाण्याएवढेच कण होते, ते. लहान नाहींत व मोठेहि नाहींत. अगदीं तेवढेच! धान्याच्या त्या राशीकडे पाहून तो भिकारी पश्चात्तापानें ढसढसां रडला!

—विश्वमोहिनी सुवर्णरथांत बसून आमच्या दाराशीं आली कीं, आम्हींहि तिच्यापुढें हात पसरतों; पण तिनेंच आपल्याजवळ याचना केली कीं, आपण मुलुखाचे कृपण होतों. तिला कमींत कमी काय देतां येईल याचा विचार करतों. पण **'द्यावें तसें घ्यावें'** हा तर सुखाचा मूलमंत्र आहे; किंबहुना दुसऱ्याला दिल्या-शिवाय घेतां येत नाहीं, अशी एकच गोष्ट या जगांत आहे—ती म्हणजे सुख!

'द्यावें तसें घ्यावें—म्हणजे सुख' इतकें वाक्य लेखाच्या आरंभीं कंसांत घातलें आहे.

आतां या लेखावर विवेचन करण्यापूर्वी श्री. रवींद्रनाथ ठाकूर यांचे विषयीं कांहीं माहिती सांगणें आवश्यक आहे. आपल्या गीतांजलीनें जगांत प्रसिद्ध पावलेले आणि 'आशियाचे कविसम्राट्' हा बहुमोल मान संपादन केलेले सुप्रसिद्ध वंगकविश्रेष्ठ श्री. रवींद्रनाथ टागोर यांची माहिती सर्वांना आहे. येथें प्रसंगानुसार त्यांचेविषयीं दोन शब्द सांगणें अप्रासंगिक होणार नाहीं.

श्री. रवींद्रनाथाचें कुल बंगल्यांतील फार थोर व प्राचीन कुलांपैकीं एक श्रेष्ठ कुल होय. या कुलांत फार थोर असे अनेक महात्मे होऊन गेले. यांचेपैकीं फार थोर असे महात्मे रवींद्रनाथांचे वडील महर्षि देवेंद्रनाथ ठाकूर होत. यांच्या अंगचे, दया, क्षमा, शांति आणि धर्मादि शास्त्राचें ज्ञान आणि लोकांत धर्मबुद्धि जागृत व्हावी याविषयीं उत्कंठा इत्यादि गुणामुळें लोकांनीं त्यांना 'महर्षि' ही अन्वर्थक पदवी दिली होती. हे ब्राह्मसमा-जाचे राजाराम मोहन रॉय यांचे नंतरचे द्वितीय मोठे पुढारी होत. अशा सत्पुरुषाच्या पोटीं रवींद्रनाथांचा जन्म १८६१ सालीं झाला. त्यांच्या मातुःश्रीहि फार थोर घराण्यांतील होत्या. "शुद्ध-बीजापोटीं, फळें रसाळ गोमटीं" ही श्री. तुकारामाची उक्ति या ठिकाणीं बरोबर लागू पडते. रवींद्रनाथाचें शालेय शिक्षण फारसें झालें नाहीं आणि सुखाचेंहि झालें नाहीं. ही गोष्ट त्यांच्या वडिलांच्या लक्ष्यांत येतांच त्यांनीं त्याची शाळा बंद केली आणि खासगी शिक्षक ठेवून त्याच्या शिक्षणाची व्यवस्था केली. त्यामुळें त्यांचें शिक्षण फार झपाट्यानें झालें. तेव्हां युनिव्हर्सिट्यांचा केव्हांहि त्याचे शिक्षणाशीं संबंध आला नाहीं. परंतु मोठा ग्रंथकार किंवा कवि होण्याला युनिव्हर्सिटी शिक्षणाची अपेक्षा असतेंच असें नाहीं. रवींद्रनाथाची काव्यप्रतिभा फार लहान-पणींच जागृत झाली. त्यांचीं प्रथम-प्रथमचीं काव्यें अनुकरणात्मक व व्यवहार-विषयांवर रचिलेलीं होतीं. प्रेमोत्साह वाढविणारीं अशीं काव्यें त्यांच्या हातून पूर्व वयांत बरींच निपजलीं. वयाच्या २५

व्या वर्षांपासून सुमारें ३५ वर्षांपर्यंत त्यांनीं प्रेमविषयक कविता बरींच लिहली. त्यानंतर त्यांचे विचार अधिक गहन विषयांकडे वळून त्यांनीं अध्यात्म, तत्त्वज्ञान इत्यादिकांवर काव्यें करून पूर्णता संपादन केली.

आपल्या वयाच्या १७ व्या वर्षी इंग्रजी वाङ्मयाचा अभ्यास करण्यासाठीं ते इंग्लंडास जाऊन एक वर्षभर राहिले. पुढें २३ व्या वर्षी त्यांचा विवाह झाला. त्यानंतर आपल्या वडिलांच्या आज्ञेप्रमाणें ते आपल्या इनाम गांवावर बोलपूर येथें जाऊन राहिले आणि शेतीभातीची व्यवस्था पाहूं लागले. खेड्यापाड्यांतील बरेंच वर्षांच्या राहण्यानें त्यांना तेथील लोकांविषयींहि बराच अनुभव आला. बंगाल्यांतील गावडे लोकांवर त्यांचें अत्यंत प्रेम असे आणि त्यांचे पासूनहि सहनशीलता, सरलता आणि सहानुभूति यांचे धडे त्यांनीं घेतले असें ते सांगत असत.

पुढें लवकरच त्यांचेवर दोन तीन सांसारिक दुःखप्रसंग आले. पण त्यामुळें त्यांचें मन न खचता ते अधिकच उदात्त झाले. त्यांच्या उदात्त विचारांचें फल 'गीतांजली' होय. या विचारांनीं त्यांचें मन पूरित झाल्यानंतरच गीतांजलींतील गीतें त्यांच्या हृदयांतून मुखावाटे बाहेर पडलीं, व तीं त्यानीं लिहून काढलीं. यानंतर ते पुनः इंग्लंडला गेले तेव्हां त्यांनीं स्वतःच आपल्या बंगाली गीतांजलीस इंग्रजी स्वरूप दिलें. आणि या ग्रंथाला स्वीडन येथील विद्वत्सभेनें एक 'नोबेल प्राईज' (अजमासें १२०००० रु. चें) १९१३ सालीं दिलें. तेव्हांपासून त्यांची कीर्ति दिगंत पसरली. पुढें त्यांनीं बोलपूर गांवीं 'शांतिनिकेतन' नांवाचा आश्रम स्थापून त्यांत शाळा ठेविली. हा आश्रम प्राचीन ऋष्याश्रमाप्रमाणें आहे. तेथेंच 'श्रीनिकेतन' म्हणून शेती बागाईत कामाची व्यवस्था आणि त्या शिक्षणाची व्यवस्था केलेली आहे. शांतिनिकेतनांत 'विश्वभारती' नांवाचें मोठें विद्यापीठ काढून प्राचीन देशांतील तत्त्वज्ञान आणि शास्त्र यांचा अभ्यास करवून घेण्याची व्यवस्था केलेली आहे. आणि आशियांतील व इतर देशांतील मोठमोठे विद्वान् पंडित तेथें येऊन आपल्या ज्ञानाचा फायदा सर्वांना देत आहेत.

श्री. रवींद्रनाथांची ग्रंथसंपत्ति अलोट—फार दांडगी आहे. यांत निरनिराळ्या तऱ्हेचीं रत्नें निर्माण झालीं आहेत. नाटकें आहेत, कादंबऱ्या आहेत, लघु आणि मोठ्या कथा (कथा ओ काहिणी) आहेत, निबंध आहेत, प्रबंध आहेत, सर्व कांहीं आहे. आणि काव्यरत्नांची तर समृद्धीच आहे. या सर्वांतला मुकुटमणि म्हणजे '**गीतांजली**' होय.

गीतांजलीतील कांहीं गीतांचा अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केला आहे. त्यांत मला असें आढळून आलें आहे कीं, त्यांच्या मूळ बंगाली काव्यांत—गीतांत जी गोडी—(अर्थ व प्रसाद याची) ती इंग्रजी अगर इतर भाषांतल्या त्यांच्या भाषांतरांत अगर रूपांतरांत आढळून येत नाहीं. स्वतः रवींद्रनाथांनींच आपल्या गीतांजलीचें—गीतांचें इंग्रजी भाषांतर केलेलें आहे. तीं त्यांचींही भाषांतरेंहि मूळ गीतांपुढें फिकीं अशीं वाटतात.

अशा स्थितींत त्यांच्या एखाद्या गीता- वरून कोणी कांहीं गोष्ट रचून सांगितली तर मुळची गोडी (अर्थ व प्रसाद) कितपत उतरेल याची शंका आहे. या दृष्टीनें वर नमूद केलेल्या टीकाविषयक गोष्टीचा विचार करूं.

मूळ टीकाविषयक लेखाचा आरंभ असा होतो कीं—तुम्हांला रवींद्रनाथ ठाकूर यांची ती **गोष्ट** माहीत आहे का?

येथें हें सांगितलें पाहिजे कीं, ही रवींद्र नाथांची गोष्ट नसून त्यांचें **गीत** किंवा **गान** आहे, आणि वाचकांना तें नीट यथार्थ समजावें म्हणून तें मूळ बंगालींत पण हिंदी (देवनागरी) लिपींत खालीं देतों. मराठींत त्याचे यथामति भाषांतरहि देतों; पण ही सूचना देऊन ठेवितो कीं, त्यांनीं भाषांतरापेक्षां मूळ गीताकडेच अधिक लक्ष देऊन वाचावें. इंग्रजी गीतांजलींत हें ५० वें गीत आहे. त्याचें मूळ असें:—

१—आमि भिक्षा करे फिरतेछिलेम
ग्रामेर पथे पथे,
तुमि तखन चलेछिले
तोमार स्वर्णरथे।
अपूर्ब्ब एक स्वप्नसम
लगतेछिल चक्षे मम
कि विचित्र शोभा तो मार
कि विचित्र साज।
आमि मने भावतेछिलेम
ए कोन महाराज॥

**अर्थ**—गांवाच्या (खेडेगांवाच्या) रस्तोरस्तीं मी भिक्षा मागत फिरत होतों. त्यावेळीं तूं तुझ्या सुवर्णरथांत बसून येत होतास. माझ्या डोळ्यांना हा देखावा एक अपूर्व स्वप्नाप्रमाणें वाटला. तुझी शोभा किती विचित्र आणि साज (शृंगार) हि तसाच विलक्षण! हे महाराज कोण, असा मी मनांत विचार करूं लागलों.

२. आणि शुभक्षणे रात पोहालो
भेबेछिलेम तबे,
आज आमारे द्वारे द्वारे
फिरते नाहि हबे।
बाहिर हते नाहि हते
काहार देखा पेलेम पथे,
चलिते रथ धनधान्य
छडावे दुईधारे
मुठा मुठा कुडिये नेब
नेब भारे भारे॥

**अर्थ**—आतां (अंधारी) रात्र संपून शुभक्षण (दिन) उगवला असें तेव्हां मला वाटलें. आतां मला दारोदार (भिक्षा मागत) फिरण्याची जरूरी राहिली नाहीं. रस्त्यावर कुठेंहि पाहिलें तर रथ बाहेरून आणि आंतून दोन्हीं बाजूनीं धनधान्य फेंकींत चालला होता. कोणी कोणी ते मुठीमुठीनें वेचून नेत, तर कोणी कोणी भाऱ्याभारानें नेत असत.

३—देखि सहसा रथ थेम गेल
आमार काछे एसे,
आमार मुखपाने चेये
नामले तुमि हेसे।
देखे मुखेर प्रसन्नता
जुडिये गेल सकल व्यथा,
हेनकाले किसेर लागि
तुमि अकस्मात्
"आमाय किछु दाओगो" बले
बाडिये दिले हात॥

**अर्थ**—माझ्याजवळ येऊन रथ एकदम थांबला असें मी पाहिलें. माझ्या चेहऱ्याकडे पाहून तूं हांसून खालीं उतरलास. तुझ्या मुखाची प्रसन्नता पाहून माझी सर्व व्यथा पार नाहींशी झाली. इतक्यांत कशामुळें कोणास ठाऊक, तूं ' मला कांहीं देशील कां ' असें म्हणून आपला हात पुढें केलास.

४—मरि, ए कि कथा राजाधिराज
' आमाय दाओगो किछु '।
शुने क्षणकालेर तरे
रैनु माथा नीचु।
तोमार किबा अभाव आछे ?
भिखारी भिक्षूकेर काछे ?
ए केवल कौतुकेर बशे
आमाय प्रबञ्चना।
झुलि हते दिलेम तुले
एकटि छोट कणा॥

**अर्थ**—ओ हो! " मला कांहीं देशील कां " ही कसली थट्टा राजाधिराज ? हें ऐकून मी माझा माथा (मस्तक) क्षणभर खाली घातला. (आणि म्हणालों) तुझ्या जवळ काय अभाव आहे (कांहींहि नाहीं) म्हणून तूं भिखारी होऊन भिक्षुकाच्या मागें लागलास ? केवळ कौतुकानें तूं माझी प्रवंचना (फसवणूक) करतोस ! (शेवटीं नाईलाजानें) झोळींतून काढून एक लहान कण (तुला) दिला—

५—जबे पात्रखानि घरे एने
उजाड करि—एकि
भिक्षामाझे एकटि छोटो
सोनार कणा देखि।
दिलेम जा राज—भिखारीरे
स्वर्ण हये एल फिरे.
तखन कांदि चोखेर जले
दुटि नयन भरे
तोमाय केन दिइनि आमार
सकल शून्य करे॥

**अर्थ**—जेव्हां भिक्षापात्र घरीं आणून पाहिलें तों, हा काय चमत्कार! हा चक्क प्रकाश कसला ? भिक्षापात्रांत एक

(पान ५८ पाहा)



● लोखंडी तरवारीला परिसाचा स्पर्श होतांच ती सोन्याची होते, आणि आतां तिनें कुणाची हिंसा करितां येत नाहीं. भगवंताच्या चरण-कमलाला स्पर्श केल्यानंतर त्या माणसाच्या हातून कोणतेंहि अनुचित कार्य होत नसतें.

सोन्याचा कण दिसला. राजभिकाऱ्याला (परमेश्वराला) मी जें समपर्ण केलें तें सुवर्ण होऊन परत आलें. तेव्हां दोन्हीं डोळ्यांत अश्रु भरून येऊन मी रडून आकांत केला कीं—माझें सर्व शून्य करून म्हणजे माझें सर्वस्व मी तुला कां समर्पण केलें नाहीं ?

आतां **गीत** तर आटपलेंच. पुष्कळ प्रयत्न करून 'गीता'चें भाषांतर बरोबर (मूळ अर्थाबरहुकूम) करण्याची खटपट केली आहे. पण तें बरोबर साधलें आहे अशी मी हमी देत नाही. वाचकांनीं मूळ गीतच वाचावें, त्याचें मनन करावें आणि अनुसंधान ठेवावें इतकी विनंति करीत आहे.

आतां आपण टीकाविषयक गोष्ट आणि मूळ गीत यांची तुलना करून पाहूं.

(१) प्रथम, वर सांगितलें आहे कीं, रवींद्रनाथाची ही गोष्ट नसून, त्यांचे तें गीत आहे.

(२) गीतेंतील किंवा गोष्टींतील मुख्य पात्र एक भिखारी आहे. गोष्टींत त्याचें वर्णन असें केलें आहे कीं—'सुंभाचा करगोटा, रकट्याची लंगोटी' असा नामदेवाप्रमाणें, आणि हातांत जीर्ण मलीन झोळी व डोळ्यांत दैन्य! मूळ गीतांत भिखाऱ्याचें असें कांहींच वर्णन नाहीं, सबंध गीतभर नुसता भिखारी असा उल्लेख आहे.

(३) दुसरें मुख्य पात्र राजाधिराजाचें. गोष्टींत यांचे वर्णन असें आहे कीं, भालदार, मानकरी सरदार व असंख्य जनसमूह यांच्या समवेत राजाधिराजाची मिरवणूक (हत्तीच्या) अंबारींत बसून चालली होती. 'शब्द थोडे, पण अर्थ फार गोड मधुर व स्पष्ट' असें वर्णन करण्याची रवींद्रनाथाची हातोटी. त्याप्रमाणें त्यांनी याप्रसंगाचें वर्णन भिकाऱ्याच्या मुखें असें केलें आहे कीं, तुझ्या स्वर्णरथांतून तूं येत होतास, हा देखावा मला अपूर्व स्वप्नासारखा वाटला. तुझी शोभा किती विचित्र आणि साज (शृंगारहि तसाच) हें महाराज कोण बरें असावें असा मी मनांत विचार करूं लागलों.

(४) दोघांची भेट— गोष्टींत सांगितलें आहे कीं, या सर्व धुमाळींत आपली वर्णी लागणें कठीण या कल्पनेनें तो (भिखारी) दूर उभा राहिला असावा असें राजाला वाटून त्यानें झटकन माहुताला खूण केली, आणि आपण खालीं उतरून त्या भिकाऱ्याजवळ गेला. मूळ गीतांत असें कांहीं नाहीं. त्यांत असें सांगितलें आहे कीं, माझ्या (भिकाऱ्याच्या) जवळ येऊन रथ एकदम थांबला.

(५) **याचना.** गोष्टींत सांगितलें आहे कीं, राजा आतां आपल्याला निदान एखादी सूवर्णमुद्रिका दान करील या अपेक्षेनें, आतुरतेनें त्यानें आपली झोळी पुढें केली. मूळ गीतांत असें कांहीं वर्णन नाहीं. उलट त्यांत असें सांगितलें आहे कीं—माझ्या चेहेऱ्याकडे पाहून तूं खालीं उतरलास.

(६) **याचना** (राजाची) गोष्टींत पुढें असें सांगितलें आहे कीं—पण झालें भलतेंच. राजानेंच त्याच्यापुढें आपला हात पसरला. मूळ गीतांत असें सांगितलें आहे कीं, '**मला कांहीं देशील का**' असें म्हणून राजानें आपला हात पुढें केला.

(७) **भिकाऱ्याची मनःस्थिती**-गोष्ट एका राजेश्वरानें यःकिंचित भिकाऱ्याजवळ

याचना करावी ? केवढा विलक्षण प्रसंग. भिकारी स्तंभित झाला, निराश झाला, चरफडला.

मूळगीत-यांत निराळीच कथा आहे. भिखारी राजाला म्हणतो, तूं माझी थट्टा करतोस काय ? तुझ्याजवळ काय अभाव आहे म्हणजे कांहीं नाहीं म्हणून तूं भिखारी होऊन भिक्षुकाच्या मागें लागलास-कौतुकानें तूं माझी प्रवंचना करतोस इत्यादि.

(८) गोष्ट—त्यानें मोठ्या मिनतवारीनें झोळीतले **दोन दाणे** राजाच्या हातावर ठेविले.

गीत—यांत मिनतवारीनें असें वर्णन नसून झोळीतून '**एकटि छोट कणा**' म्हणजे एक लहान दाणा काढून दिला. 'एक लहानसा दाणा' या शब्दांनीं भिकाऱ्याची मनःस्थिति कशी होती याचा बोध होतो.

(९) **स्वीकार**. गोष्ट—( ते दोन दाणे ) राजानें प्रसन्न मनानें स्वीकारले व पुनः अंबारींत बसून तो निघून गेला. गीत-यांत असें कांही वर्णन नाहीं. कारण कवीच्या मतें वर्णन करण्याजोगें महत्वाचें नाहीं.

(१०) **शेवट**—गोष्ट—झोळींत दोन सुवर्णकण पाहून तो भिकारी धान्याच्या त्या **राशीकडे** पाहून पश्चात्तापानें ढसढसां रडला !

गीत—यांत 'धान्याच्या त्या राशीकडे' पाहून हें वर्णन नाहीं. झोळींत थोडेसें धान्य असेल, त्यांतलाच एक छोटा दाणा काढून दिला आणि जें कांहीं होतें तें सर्व आपण कां देऊन टाकिलें नाहीं म्हणून त्यानें रडून आकांत केला.

**सिद्धान्त**. या गोष्टीवरून जो कांहीं काढण्यांत आला आहे. म्हणजे '**द्यावें तसें घ्यावें**' हा तर सुखाचा मूळमंत्र आहे, हा बरोबर असून तो अपसिद्धांत होईल. कारण गोष्टींत किंवा मूळ गीतांत असें स्पष्ट सांगितले आहे कीं, दोन कण किंवा एक कण जें कांहीं देण्यांत आलें तें सुवर्णरूप होऊन, म्हणजे त्याची किंमत कितीतरी पटीनें वाढून, द्यावें तसें नसून, कितीतरी पटीनें अधिक परत मिळतें. म्हणून याविषयाचें तात्पर्य किंवा सिद्धांत असा मांडला पाहिजे कीं **परमेश्वराला निष्काम भावानें जें समर्पण केलें जातें तें 'सुवर्ण' होऊन परत मिळतें**. म्हणून या गीतांला **सुवर्णगीत** असें नांव देण्यांत आलें आहे.

## श्रीसाईबाबांची चणकलीला

श्रीसाईसच्चरित, अध्याय २४ यांत ग्रंथकर्ते हेमाडपंत (श्री. आण्णासाहेब दाभोळकर) यांनी श्रीबाबांचा असाच थट्टाविनोदप्रकार वर्णन केलेला आहे. तोहि वाचन मनन करण्यास योग्य असल्यामुळें येथें देण्यांत येत आहे.

दर रविवारीं शिरडीस मोठा बाजार पूर्वीपासून भरत होता व असतो. श्रीबाबा हयात असतांना श्री. आण्णासाहेब एका रविवारीं मशीदींत जाऊन, खाली मान घालून नामस्मरण करीत बाबांची पादसंवाहनसेवा करीत बसले होते. इतर बरीच श्रेष्ठ भक्त मंडळी हजर होती. त्यावळीं आण्णासाहेबांच्या कोटाच्या अस्तनींत कांहीं चणे अडकून बसलेले दिसले. आणि हें काय म्हणून त्यांनीं डावें कोपर लांब

करतांच एकदम चणे (फुटाणे) गडगडून खालीं पडले ते पांच पंचवीस दाणे मंडळीनें टिपून घेतले.

हा विषय थट्टेस कारण झाला. जो तो तर्क करूं लागला कीं, हें इतकें फुटाणे तेथें आले कसे आणि मावले कसे? आण्णासाहेबासहीत सर्व जण आश्चर्यमग्न असतां काय संवाद झाला तो ऐका.

बाबा म्हणाले—याला (आण्णाला) एकटे खाण्याची वाईट संवय आहे. आज बाजार आहे, ती संधि साधून फुटाणे रगडीत हा येथें आला, त्याची संवय मला माहित आहे. हें फुटाणे या संवयीचा पुरावा आहे.

आण्णासाहेब—बाबा, कोणाला न देतां एकटें खाण्याचें मला ठाऊक नाहीं. मी शिरडीचा बाजार पाहिला नाहीं, बाजारांत गेलो नाहीं तर चणे घेणार कसे? जवळपास असलेल्या मंडळीस दिल्याशिवाय मी कोणतीहि वस्तु तोंडांत घालीत नाहीं.

बाबा—जवळपास असलेल्यांना तूं देतोस हें खरें. पण तसें कोणी सन्निध नसेल तर त्याला तूं काय करणार आणि मी काय करणार? पण मला तरी तूं आठवतोस काय? मी नेहमीं तुझ्याजवळ नाहीं काय! तेव्हां मला तूं केवळ (ग्रास) खाण्या आधीं अर्पण करितोस काय!

फुटाण्याच्या मिषानें बाबांनीं शिकविलेलें हें सकृद्दर्शनीं अल्प वाटणारें पण अत्यंत महत्त्वाचे तत्त्व आण्णासाहेबांच्या शब्दांतच सांगूं या.

परि या कथेचें सार काय।
तेथेंच आपण घालूं ठाय॥
पांचापोटीं कोणताहि विषय
बाबाशिवाय सेवूं नये॥६९॥
मनांत देतां ही शिकवण।
वेळोवेळीं होईल आठवण॥
देतां घेतां साईचरण।
अनुसंधान राहील॥७०॥
हे शुद्ध ब्रह्म सगुण मूर्ति।
नयनासमोर राहील निश्चिती॥
उपजेल भक्ति मुक्ति विरक्ति।
परम प्राप्ती लाभेल॥७१॥
नयनीं देखता सुंदर ध्यान।
हरेल संसार भूकतहान॥
हरपेल ऐहिक सुखाचें भान।
मन समाधान पावेल॥७२॥

ही चणकलीला सांगतांना आण्णासाहेबांना भागवत दशम स्कंध, अध्याय ८०–८१ यांत सांगितलेली सुदाम–कथा आठवली. ती त्यांनीं मूळकथेंत थोडासा फेरफार करून यापुढें सांगितली आहे. या कथेंतील तत्त्व या लेखाच्या मथळ्यांत दिलेल्या सिद्धान्तास पोषक असल्यामुळें तीही येथें थोडक्यांत दिली आहे.

**सुदाम्याचे पोहे.** बलराम आणि कृष्ण हे सांदीपनी गुरूच्या घरीं असतां एकदां समिधा आणण्यासाठीं त्यांना वनांत पाठविलें होतें. त्यानंतर गुरुपत्नीनें त्याच कामावर सुदामालाहि पाठविलें; आणि तिघांकरितां त्यांचेकडे भुकेच्या शमनार्थ चणे दिले. पुढें रानांत कृष्ण भेटला असतां तो म्हणाला–दादा मला तहान लागली आहे. सुदाम्यानें उत्तर दिलें कीं, अनशपोटीं पाणी पिऊं नये, थोडी विश्रांति घ्यावी. पण हें मजपाशीं चणे आहेत, ते तूं खा असें तो कांहींच बोलला नाहीं. कृष्ण हा थकलेला असल्या-

मुळें तो सुदाम्याच्या मांडीवर पहुडला. त्याचा डोळा लागलेला आहे असें पाहून सुदाम्यानें चणे खाण्यास सुरुवात केली. दादा, काय हो खातां, हा आवाज कसला, असें कृष्णानें मध्येंच विचारिलें. सुदामा म्हणाला—खायला येथें काय आहेरे ? थंडीनें दांत कुडकुडतात. विष्णुसहस्रनामहि स्पष्ट म्हणतां येत नाहीं, दांत कुडकुडण्याचा आवाज आहे. सुदाम्याचें हें उत्तर ऐकून सर्वसाक्षी कृष्ण म्हणाला,—दादा मला असें एक स्वप्न पडलें कीं, एकाची वस्तु दुसरा खात असतां, त्याला काय खातोस असें विचारतां, काय माती खाऊं असें त्यानें उत्तर दिलें. 'तथास्तु' असें दुसऱ्यानें उत्तर दिलें. दादा हें स्वप्नच बरं कां, आपण माझ्याशिवाय कधीं तरी खाल काय, पण स्वप्नाच्या नादांतच तसा प्रश्न मी विचारला. श्रीकृष्णलीला व त्याचे स्वरूप यांची कांहीं माहिती सुदाम्याला असती तर त्यानें असा प्रकार केला नसता. पण पुढें तो श्रीकृष्ण परतम्याचा सखा असूनहि त्याला अठरा-विश्व दारिद्र्य भोगावें लागलें, ही गोष्ट एकटेंच खाण्याची ज्यांना संवय आहे त्यांनीं नीट लक्ष्यांत ठेवावी. त्याच सुदाम्यानें जेव्हां स्वस्त्री-कष्टार्जित मूठभर पोहे श्रीकृष्णाला प्रेमानें अर्पण केले, तेव्हां प्रसन्न होऊन श्रीकृष्णानीं त्याला कसें ऐश्वर्यसंपन्न केले त्याविषयीं कविवर्य मोरोपंत म्हणतात कीं,

"ऋणतरी मुष्टिभरी पोहे
त्यांच्या व्याजांत हेमनगरी ती।
मुदलांत मुक्ति देणें
हे कोण्या सावकारिची रीती ॥

वरील गोष्टींत किंवा गीतांत भिकाऱ्यानें एक कण दिला तो त्याला **सोन्याचा** कण होऊन परत मिळाला, या कथेंत सुदाम्यानें मूठभर पोहे दिलें, त्याला परत सुवर्ण नगरी मिळाली, आणि शिवाय मुक्तिंहि मिळाली. तेव्हां परमेश्वराला निष्काम भावानें आपलें सर्वस्व समर्पण करावें हाच धडा आम्हीं घ्यावा.

**ॐ नमो भगवते श्रीसाईरमणाय**

## वाचकांसाठीं आणि विक्रेत्यांसांठीं—

**पुढचा अंक १ जानेवारीस 'नवविधा-भक्ति' अंक, पुढें १ एप्रिलला 'श्री रामनवमी-अंक' आणि पुन्हां १ जुलैस 'गुरुपूर्णिमा-अंक' अशा कालक्रमानें साईलीलेचे अंक प्रसिद्ध होतील.**



# शिरडी वृत्त

## जून १९५६

या महिन्यांत श्रीसाईदर्शनासाठीं दररोज भक्तांची बरीच रीघ होती. कलाकारांनी श्रीसमोर हजेरी दिली. कांहीं कार्यक्रम पुढीलप्रमाणें—

**कीर्तन**:—श्री. ह. भ. प. सदानंद बुवा पिंजरकर अकोला ( वऱ्हाड ), श्री. सौ. पद्माबाई देशपांडे, चाळीसगांव ( पू. खा. ) श्री. श्री. बा. ऊर्फ बाबुराव देव ( स. ट्रस्टी सा. बा. सं. ) ठाणे.

**प्रवचन**:—श्री. डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर कुर्ला मुंबई (स. प्रे. सा. बा. सं.)

**पोवाडे**:—श्री. शरद वामन मुठे. ( महाराष्ट्र कलापथक दादर ) शाहीर कानिटकर गोरेगांव ( आरे कॉलनी ) मुंबई.

**गायन-वादन**:—श्री. चंद्रकांत वाडेकर, श्री. एन. सी शिंदे, क्यासलराक ( बेळगांव ) श्री. दामुअण्णा बेलापूर (सनईवादन) श्री. दामोदर पनके गायन-शिक्षक यवतमाळ, श्री. बालुभाई, भट बडोदा. श्री. शंकरराव पोटे, ताडदेव मुंबई, श्री. बन्सिबुवा बिकानेर, सौ. विमल देशपांडे मु. सिलोड ( औरंगाबाद ) श्री. मोतीसिंग भरतपूर–गायन जलतरंग तबला हार्मोनियम सितार वगैरे. श्री. कोमलसिंग भरतपूर, कुमारी सावित्री भरतपूर श्री. देवसिंग राठोड सोलापूर, श्री. प्रभाकरपंत देव सोलापूर.

**शिर्डी येथें नवीन उपक्रम**:— संस्थानचें जागेंत नगरच्या एज्यूकेशन सोसायटीमार्फत माध्यमिक शिक्षण क्लास. प्रारंभ–संस्थानचे मॅनेजिंग ट्रस्टी श्री. नागेशराव सावंत यांचे हस्तें पूजन श्री साईप्रतिमेचे झाले. फर्निचरकरतां संस्थानकाकडून रु. ७५० देणगी दाखल दिलेले आहेत.

या महिन्यांत संस्थानचे धर्मार्थ दवाखान्यांत ५०० रुग्णावर उपचार करण्यांत आले. रुग्णांची संख्या कमी असण्याचें कारण ( डॉक्टर २० दिवस बाहेरगांवी गेले होते. ) दवाखान्यास देणगी श्री. मनी दस्तुर दादर मुंबई रु. २५ फक्त.

## जुलै १९५६

या महिन्यांत श्रीसाईबाबांचे दर्शनासाठीं थोड्याशा कमी प्रमाणांत बाहेरगांवचे भक्त लोक आले होते. त्यापैकीं कांहीं कलाकारांनी श्रीपुढें आपल्या कलेची हजेरी दिली ती येणें प्रमाणें:—

**कीर्तन**:—श्री. सिताबाई कोळंबेकर मु. कोळंबा जि. पू. खानदेश, श्री ह. प. प. शंकरबुवा आसकर नागपूर. कीर्तनें श्री. ह. भ. प. दत्तदास गोविंदबुवा ओरसकर मु॥ सावंतवाडी कीर्तन श्री. ह. भ. प. भिकाजी बुवा पाबळकर पुणे कीर्तन सं. गवई मराठे याची दोन कीर्तन

**नकला व जादुचे प्रयोगः—**श्री. मल्हारी भागुजी दोडके मु. अकोला (वऱ्हाड) श्री. चिंतामण रंगनाथ कुलकर्णी पुणे. (जादू प्रयोग.)

**गायनः—**सौ. सुशिलाबाई टेंबे, गिरगांव मुंबई. श्री. विनायकराव पेंढारकर मुंबई. श्री. पंडित दिनानाथ सुरतकर, सुरत. पंडित जगन्नाथबुवा सुरतकर. साकोरी, श्री. मास्तर भार्गवराम आचरेकर पुणें, श्री. एन. देवासकर मुंबई, श्री. लक्ष्मण देवासकर, श्री. नरेंद्र देवासकर. श्री. पांडुरंग खानोलकर मुंबई. श्री. फकिराप्पा कुंदगोळकर. वगैरे गायकानीं श्रीपुढें हजेरी दिली.

आषाढी महा एकादशी निमित्त श्रींचे पालखीची गांवांतुन मिरवणूक व कीर्तन कार्यक्रम झाले.

संस्थानचे धर्मार्थ दवाखान्यात ११५२ रुग्णावर उपचार या महिन्यांत करण्यात आला.

# ऑगस्ट १९५६

**या** महिन्यांत श्रीसाईदर्शनासाठीं बाहेरगांवचे भक्त बरेच आले होते. त्यांतील कांहीं कलाकारांनीं श्रीसमोर हजेरी दिली ती पुढीलप्रमाणें :—

**कीर्तन :—**श्री. ह. भ. प. रामकृष्ण नारायण पाटील, मु. अरळी. जि. उस्मानाबाद, श्री. ह. भ. प. अशोकबुवा, अकोला, वऱ्हाड. श्रीमती सीताबाई कोळंबेकर, मु. कोळंबे जि. जळगांव, पु. खा. श्री. ह. भ. प. रामचंद्रबुवा नाशिककर, मु. नाशिक, श्री. बा. ऊर्फ बाबुराव देव, वकील, ठाणें (सं. ट्र.) श्री. ह. भ. प. विठ्ठलबुवा विप्र. पंढरपूर. सं. गवई मराठे यांची आषाढ व॥११ श्रीसंत नामदेव पुण्यतिथी, श्री. सावतामाळी पुण्यतिथी श्रा. शु. ११ व १५ ऑगस्ट. गोकुळ-अष्टमी अशी सात कीर्तनें या महिन्यांत झालीं.

**पोवाडे गायनः—**श्री. शंकर भागुजी सोनावणे, नाशिक.

**जादुप्रयोग :—**श्री. चिंतामण रंगनाथ कुलकर्णी, पुणें.

**गायनः—**श्री. दिलीपचंद कथ्थक जयपूर कलावंत–गायन, हार्मोनियमवादन तबलावादन, व नृत्य वगैरे श्री. मास्टर वसंत अमृत सुरतवाले मु. राजकोट कवाली काव्य व शास्त्रोक्त संगीत हार्मोनियम स्वतः वाजवून. सौ. सावित्रीबाई लाखे, जेजुरी, पुणें. सौ. वारुबाई लाखे जेजुरी पुणें. श्री. तुळशीदास बोरकर पुणें. सौ. जयश्रीबाई बोरकर, पुणें.

**श्रीगोकुळ अष्टमीः—** श्रीमंदिरांत जन्मोत्सव कीर्तन. गांवांतून रथाची मिरवणुक. गोपालकाला कीर्तन दही हंडी वगैरे.

आगस्ट १५ स्वातंत्र्य–दिनानिमित्त झेंडावंदन, दिपोत्सव. रात्रौ श्रीमंदिरात कीर्तन.

या महिन्यांत संस्थानच्या धमार्थ दवाखान्यास श्री. एस. ललिता उपेंद्र मु. कालोल जि. सुरत देणगी रुपये ३३ तेहतीस फक्त. मि. एच. पी. दस्तुर दिल्ली, देणगी रुपये २० वीस फक्त. या महिन्यांत एकूण १२०० बाराशे रोग्यावर उपचार करण्यांत आले.

## गुरुपौर्णिमाउत्सव

श्रीसच्चिदानंद सद्गुरु श्रीसाईबाबा-महाराज मु॥ शिर्डी ता० कोपरगांव ।जि. नगर यांचा गुरुपौर्णिमाउत्सव मिति आषाढ शु॥ १५ शके १८७८ माहे जुलै दिनांक २२ सन १९५६ रविवार या दिवशीं मोठ्या थाटांत साजरा झाला.

उत्सवास प्रारंभ शनिवार दिनांक २१। ७।५६ रोजी होऊन सोमवार दिनांक २३।७।५६ रोजी उत्सव समाप्त झाला. असा तीन दिवस उत्सव झाला.

उत्सवास मुंबई, पुणें, सोलपूर, ठाणे, मद्रास, हैद्राबाद, म्हैसूर, बेंगलूर, हुबळी, कारवार, बेळगांव, पूर्वखानदेश, पश्चिम खानदेश, वऱ्हाड, नागपूर वगैरे ठिकाणाहून बरेच भक्त लोक, कुटुंबांतील मंडळी मुलबाळांसह येऊन श्रीसाईबाबांचे समाधी पूजन दर्शन तीर्थ प्रसाद घेऊन आपापले गांवी परत गेलें.

उत्सवांत गर्दी होऊन भक्त लोकांची उतरण्याची गैरसोय होऊं नये म्हणून मुद्दाम श्रीसाईबाबासंस्थान कमेटीनें मोठा मांडव देऊन त्यांत कापड खोल्या तयार केल्या होत्या. तसेंच दिवाबत्ती, साफसफाई, स्वच्छता, खाण्यापिण्याची सामानाची उत्तम सोय केलेली होती. त्या करितां मुद्दाम संस्थान कमेटीचे आ. खजिनदार, म्यानिजिंग ट्रस्टी, दुय्यम सेक्रेटरी, इतर मेंबर्स, ट्रस्टी वगैरे अधिकारीवर्ग अगोदर १।२ दिवस शिर्डीस हजर होता. उत्सवाचे बंदोबस्तासाठीं पोलीस होमगार्डही हजर होते.

उत्सवाचा कार्यक्रम दिनांक २१।७।५६ शनिवार रोजीं श्रींचे समाधीस पहाटे नेहमीं-प्रमाणें मंगलस्नान आभिषेक पूजा अर्चन वगैरे. दोन प्रहरी ४ ते ७ पर्यंत मुंबईचें प्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. दासबुवा परुळेकर यांचे सुश्राव्य कीर्तन झालें. रात्रौ श्रींचे पालखीची गांवांतून मिरवणूक काढणेंत आली.

दिनांक २२।७।५६ रविवार हा दिवस मुख्य गुरुपौर्णिमेचा. या दिवशीं पहाटे नेहमींप्रमाणें श्रींचे समाधीस मंगलस्नान होऊन सामुदायिक पूजा अभिषेक वगैरे. दोन प्रहरी ४ ते ६ पर्यंत संस्थानचे प्रे. डॉ. गव्हाणकर यांचे सुश्राव्य किर्तन झालें. पुढें श्रींचे रथाची मिरवणूक गांवांतून ६ ते ८ पर्यंत काढणेंत आली. त्यानंतर श्री. ह. भ. प. दासबुवा परुळेकर मुंबई यांचे कीर्तन रात्रौ ८ ते ११ पर्यंत झाले. नंतर. रात्रभर बाहेरगांवचे निरनिराळे कलाकार (गायन वादन सनई पखवाज तबला) वगैरे कार्यक्रम उजाडे पर्यंत झाले.

सोमवार दिनांक २३।७।५६ रोजीं नेहमीप्रमाणें समाधीस्नान अभिषेक पूजा झाली. नंतर १० ते १२॥ पर्यंत श्री. ह. भ. प. दासबुवा परुळेकर मुंबई यांचे गोपालकाला कीर्तन. दही हंडी प्रसाद वाटून उत्सव समाप्त झाला, हें जाहीर करण्यात आले. उत्सवास दोन दिवस श्रींचा प्रसाद म्हणून जुन्या वस्तु व कापड विक्री करण्यात आली. सोमवार दि. २३ ७।५६ रोजी रात्रौ सं. सं. ट्रस्टी श्री. श्री. बा. देव ठाणे यांचे कीर्तन ८ ते १० पर्यंत झालें. येणें प्रमाणें उत्सव आनंदानें पार पडला.